# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ३१/०३/२००६

आज दि. ३१/०३/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची खास महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १४ दि. २४/०३/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १९) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २०) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २१) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २२) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २३) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३०) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३१) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३२) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३३) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३४) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३६) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३७) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३८) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४०) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४१) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४२) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४५) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४६) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४९) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५०) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५१) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५२) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५३) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५४) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५६) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५७) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५९) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६२) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६३) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ३) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| ४) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ५) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ७) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ८) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ९) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| १०) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| १२) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| १३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| २) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार, सर्वांना गुढीपाडव्या निमित्त नव्या वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. महापालिकेच्या सभागृहात महासभेकरिता उपस्थित असलेले मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त श्री. सुदाम गायकवाड साहेब, मा. स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब, मा.महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ. सुरेखा गायकवाड, मा. सभागृह नेते श्री. हेरल बोर्जिसजी, मा. विरोधी पक्षनेते श्री. परशुराम पाटील, सर्व गट नेते, सर्व प्रभाग समित्यांचे अध्यक्ष, सर्व सन्मा. नगरसेवक/नगरसेविका, महापालिका सचिव श्री. हरेश पाटील, सर्व सन्माननिय उपायुक्त व खात्याचे अधिकारी, सर्व वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व प्रेक्षक गॅलरीत उपस्थित असलेले नागरिक बंधू भगिनींनो. सर्वप्रथम आपणास सर्वांना अभिमान वाटण्यासारखी एक गोष्ट आपल्या समोर येत आहे. आपणा सर्वांना माहित आहे. नुकत्याच मेलबॉर्न येथे पार पाडलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत वेटलिफ्टींग खेळात कु. सिम्पल कौर भुमरा हिने कांस्य पदक मिळविले आहे. हि आपल्या देशासाठी जेवढी अभिमानाची गोष्ट आहे. तितकीच आपल्या मिरा भाईंदर शहरावासियांना, कारण कु. सिम्पल कौर या मिरा रोड येथे राहतात व त्यांनी आपल्यापुढे या पुर्वी अनुदान मिळविण्यासाठी देखील अर्ज केला होता. परंतु आपण या विषयी निर्णय घेउन यापुढे अशा होतकरु विद्यार्थ्यांचे, खेळाडू यांना सहकार्याचा हात पुढे करावा व त्या विषयी एखादे धोरण निश्चित करावे असे मला वाटते. कारण जेव्हा हेच खेळाडू, हेच विद्यार्थी आपल्या, देशाचे नाव गौरव करतात तेव्हा आपल्या मिरा भाईंदर शहराचे नावदेखील उज्वल होते हे विसरुन चालणार नाही. मागील बजेटमध्ये आपण महापौर सहायता निधी २५ लक्षाची तरतूद केली आहे. मी माझे चालू एक महिन्याचे मानधन त्यांना देत आहे. आताच चीन व थायलंड दौरा पुर्ण करुन २० तारखेला मी येथे हजर झाले. चीन (बिजींग) व थायलंड (बॅंकॉक) येथे आयोजित आर्थिक स्वायत्तता व दारिद्रय निर्मुलन या विषयावरील कार्यशाळा - दि. ११ मार्च ते १९ मार्च २००६ रोजी आयोजित केली सदर कार्यशाळेत आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण मला पाठविलेत. त्या कार्यशाळेतील विषयांबाबत आपणास माहिती करुन द्यावे असे मला वाटते व या माहितीव्दारे आपण मिरा भाईंदर शहराच्या विकासाकरिता काय करु शकतो व एखादा असा प्रकल्प उभा करु या कि चीन, थायलंड देशामधील लोकांना ही त्याचा हेवा वाटेल व आपल्या शहराला आपल्या भारत देशाला ही गौरवासारखी गोष्ट ठरेल. दि. ११ ते १९ मार्च २००६ चीन (बिजींग) व थायलंड (बॅंकॉक) येथे आयोजित आर्थिक स्वायत्तता व दारिद्र्य निर्मुलन या विषयावरील कार्यशाळा ज्यामध्ये पायाभूत सुविधा, आवाक्यातील घरबांधणी व मूलभूत सुविधा यांचे विशेष उल्लेख. सदर कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील पुढील मान्यवर उपस्थित होते. सौ. मंगला कदम मा. महापौर पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकाच्या मा. महापौर सौ. निर्मला साबळे, सौ. सई खराडे मा. महापौर कोल्हापूर महानगरपालिका, श्री. विनायक पांडे मा. उपमहापौर नाशिक महानगरपालिका, श्री. ज्योतसिंग मा.आमदार उत्तरांचल, श्री. माधव धोमकोंडवार सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य. याशिवाय भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे अधिकारी तसेच कर्नाटक, नागालॅंड, अरूणाचल प्रदेश, केरळ या राज्यामधील वरिष्ठ अधिकारी मंत्रीगण, महापौर गण इत्यादि उपस्थित भारतातून होते. तसेच, परदेशातुन दक्षिण आफ्रिका, केनिया, नामिबिया, मलावी, टांझानिया या देशांचे मंत्री, महापौर, विशेष अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन एयुएस एच एस ऑस्ट्रेलिया आणि आयएचएस इंडिया या अशासकिय संस्थेने (एनजीओ) केले होते. सदर संस्थेस भारत सरकारकडून अनुदान मिळते. या संस्थेचा उद्देश निर्णयक्षमता, कार्यक्षमता वाढवणे व यासाठी विविध देशांमध्ये कार्यशाळा, प्रशिक्षण इ. आयोजन करणे विकासनशील व अविकसित देशांचे लोकप्रतिनिधी/अधिकारी यांना विशेषतः समाविष्ठ केले होते. दि. १२ मार्च रोजी कार्यशाळेत प्रारंभ झाला. प्रथम श्री. व्हिक्टर ग्रिनस्पून यांनी थायलंड देशाचा परिचय करून दिला. पुरातन इतिहास असणारा थायलंड कधीही पारतंत्र्यात गेला नाही. सुमारे ९०० वर्षाचा ज्ञात इतिहास, राजेशाही व्यवस्था अद्यापही अस्तित्वात आहे. सध्या राम-९ हे राज्यावर आहेत. १९३२ पर्यंत निव्वळ राजेशाही त्यानंतर घटना राजेशाही, लोकनियुक्त राज्यपध्दती, पंतप्रधान व मंत्रीमंडळ. आज ही तिथे राज्यशाही पद्धत असली तरी लोकशाहीला महत्व दिलेले आहे. श्री. थेप कोई सेंग - यु एन एस्केप चे दारिद्रय निर्मुलन प्रमुख युनायटेड नेशनच्या सप्टेंबर २००० - मिलेनियम डिक्लरेशन नुसार सर्व सभासद राष्ट्रांनी दारिद्रय निर्मुलनाचा निश्चय केला व त्यासाठी एकूण ८ उद्दिष्टे ठरवण्यात आली. १९९० ते २००५ या वर्षासाठी त्यांनी धोरण निश्चित केले. निम्मी गरिबी निर्मुलन सर्वसाधारण पणे तिसऱ्या जगाची (अविकसीत, विकसनशिल) प्रगती ७.२० टक्के प्रतिवर्षी होते. चीन या देशात ९.५० टक्के दरवर्षी प्रगत आहे तर भारत साधारण ७.०० आर्थिक प्रगती आहे. अफगाणिस्तान, नेपाळ, बांगलादेश, आफ्रिकी देश यांची प्रगती इतर देशांचे तुलनेत फार कमी आहे. सन १९९० मध्ये अंदाजे ९३१ दशलक्ष गरिब होते. सन २००० मध्ये त्यांची संख्या अंदाजे ६७९ दशलक्ष होती. म्हणजेच सुधारणा झाली परंतु कमी प्रमाणात. गरिबीची व्याख्या करणे फार कठीण आहे. युनो नुसार सन १९९३ चे दर विचारात घेऊन दररोज माणसे १ डॉलर कमाई आवश्यक अन्यथा गरीब, गरीबीचे तिन मुख्य पैलू - १) कमी उत्पन्नाची साधने २) सुविधांचा प्रभाव ३) निर्णय प्रक्रियेत स्थान

नाही, प्रतिष्ठा नाही. राष्ट्राचा निरोगी विकास हाच गरिबी निर्मुलनाची प्रभावी उपाय आहे. यासाठी प्रथम विकास कसा करायचा हे ठरवणे आवश्यक आहे. प्रत्येक देशानुसार, प्रदेशानुसार किंवा स्थानिक गरजानुसार विकासाचे स्वरुप भिन्न असेल. परंतु समाजातील प्रत्येक घटकाला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे व अत्यंत पारदर्शक पध्दतीने, सर्व सहमतीने विकास कामे हाती घेतली पाहिजे. शैक्षणिक- शिक्षणामध्ये मुल्यशिक्षण महत्वाचे आहे. समाजाची नितीमत्ता उच्च राखणे त्यामुळे शक्य होईल व यातून खऱ्या अर्थाने गरिबी निर्मुलन शक्य होणार आहे. थायलंडमध्ये कोडी (सीओडीआय) कम्युनिटी ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट यामध्ये गरीब वस्तीमध्ये विकासाचे कार्यक्रम घेतले जातात. शासनाचे ५० दशलक्ष डॉलर भांडवल गुंतवणूक केली जाते. विकास कामासाठी थायलंड, जपानकडून ८० टक्के लोन घेते व २० टक्के सर्वसाधारण जनतेच्या टॅक्स मधून खर्च केला जातो. वस्तीमधील बचतगट आवश्यक प्रत्येकांची अल्पबचत गरजेची वस्ती सुधारणा, स्थानांतरण, पायाबाबत सुविधा व विकास यासाठी निधी पुरवला जातो. जपान जेव्हा ८० टक्के कर्ज थायलंडला देते तेव्हा त्याच्यामध्ये असे नियम टाकले गेलेले आहेत की, दहा वर्षापर्यंत त्यांना कुठल्याही प्रकारचा व्याज दर लागणार नाही. दहा वर्षाच्या आत जर कर्ज फेडले तर व्याज दर न घेता दहा वर्षाच्यानंतर व्याज दर लावला जाईल. अशा प्रकारे ८० टक्के जपान, थायलंडला कर्ज पुरवठा करते. त्यातूनच थायलंडची बहूतेक विकासकामे झालेली आहे. प्रतिवर्षी सहा हजार डॉलर पर्यंत घरासाठी खर्च मिळतो. मोठ्या प्रमाणात थायलंडमध्ये बेकारांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो आणि यासाठी कर्जही उपलब्ध करुन दिले जाते. त्याशिवाय बिल्डर्स यांना प्रकल्पासाठी वित्त पुरवठा करणेत येतो. व्याजदर ५.६ टक्के आहे. गरीबांसाठी त्याहूनही कमी दर. देशात तसेच शहरात रोजगार करुन इच्छूनाऱ्यांना कर्ज देवून त्याना रोजागाराची संधी उपलब्ध करुन दिली जाते. युनो एस्केप चे डॉ.अब्दूल कयुम यांनी अशिया पॅसिफीक क्षेत्रामध्ये रस्ते बांधणी, पायाभुत सुविधा निर्मीती यावर माहिती दिली. वाहतुकीची साधने विकसीत केल्यामुळे दारिद्र्य निर्मुलन प्रभावीपणे होऊ शकते असे त्यानी निदर्शनाला आणले. बँकॉक मध्ये गेल्या दशकात झालेली प्रगती ही उत्तम वाहतूकीची साधने निर्माण केल्यामुळेच झाली व याचा समाजाच्या तळागाळापर्यंतच्या लोकांना निश्चितच फायदा झाला आहे. थायलंड मध्ये बॅंकॉक येथे उड्डाणपूल, सहा पदरीमार्ग, द्रुतगती मार्ग, दुमजली रस्ते, स्काय ट्रेन, भुमिगत रेल्वे, जमिनीवरील रेल्वे. शहर बस वाहतूक, खाजगी बस वाहतुक, टॅक्सी, रिक्शा व खाजगी गाडया अशी बहू आयामी वाहतूक व्यवस्था आहे. वाहनांची प्रचंड संख्या असूनही वाहतूक सुरळीत चालते कारण तिथे लोकांनी शिस्तप्रियता याला प्राधन्य दिलेले आहे. त्यामुळे कोणीही कुठल्याही कायद्याचा उल्लंघन न करता तिथे सुरळीतपणे वाहतुक व्यवस्था चालते. बॅंकॉक मेट्रोपॉलिटीयन अॅथोरीटी क्षेत्रफळ १५३० कि.मी., रस्ते ४०७६ कि.मी., द्रुतगती मार्ग १४८ कि.मी., रिंगरोड १०० कि.मी., बी.टी.एस. स्काय ड्रेन बीओटी तत्वावर ३० वर्षाच्या कालावधीसाठी ३ डब्याची गाडी क्षमता २५०० प्रवासी प्रति दिशेला दररोज, लांबी २३ कि.मी., २३ स्टेशन एकूण खर्च १२२० दशलक्ष डॉलर. दररोज भुमिगत ट्रेनच्या मुळे वीस लाख रूपये तोट्यात ही ट्रेन चालत असूनसुद्धा हे शहर हे राज्य ही सुविधा जनतेला चांगल्या प्रकारे देतात. भुमिगत ट्रेन २० कि.मी., १८ स्टेशन, ६ डब्बे, खर्च ९३००० दशलक्ष डॉलर (भुसंपादन वेगळे) लोकसंख्या सुमारे ११ लक्ष, वाहने ६ लक्ष, थायलंड देशाच्या १५ टक्के लोक बॅंकॉक या राजधानीच्या शहरात वास्तव्य करतात. बॅंकॉक शहराचे मुख्य उत्पादनाचे स्त्रोत म्हणजे पर्यटन व्यवसाय. दि. १७/३/०६ रोजी श्री. वॅटसन यांनी चीन देशाची आम्हाला थोडक्यात माहिती दिली ती खालील प्रमाणे आहे :- लोकसंख्या १.३० अब्ज, क्षेत्रफळ ९३ लाख चौ.कि.मी., सकल राष्ट्रीय उत्पन्न ११,७२० कोटी, युवान खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यानंतर परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढली. १९७८ मध्ये सुमारे ३०० दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली होते. ते प्रमाण सतत कमी होत सन २००० मध्ये ३२ दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली होते. चीन देशाचा पूर्व भाग विकसीत राष्ट्रांप्रमाणे सर्व उत्तम सुविधा असणारा असून मध्यभाग त्या मानाने कमी विकसीत आाहे. तर पश्चिम भाग अविकसीत आहे. या सर्वांचा विकास करण्याचा कार्यक्रम चीन देशाने हाती घेतला आहे. पायाभूत सुविधा निर्माण करून परदेशी गुंतवणूक आकर्षित करणेत येत आहे. परदेशी शिक्षण घेऊन पुन्हा चीनमध्ये उद्योग स्थापन करणाऱ्या चीनी विद्यार्थांना अनेक सुविधा, करमाफी इ. दिली जाते व चीनची बौध्दिक विकास होण्यास सहकार्य केले जाते. चीनमध्ये गेल्या २० वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. नियोजनाबद्दल पायाभूत सुविधा निर्माण केल्या व प्रचंड मोठी गुंतवणूक रस्ते, रेल्वे, दूरसंचार यामध्ये केली गेली. थालयंड व चीन दोन्ही देशामध्ये खाजगीकरणाचे माध्यमातून या पायाभूत सुविधा निर्माण केल्या. शासनाचे प्रभावी नियंत्रण आहे आणि या प्रकाराचे नियंत्रण कसे ठेवायचे यासाठी क्षमतावाढ करण्याचे उद्देशाने सदर कार्यशाळा आयोजित केलेली होती. या दोन्ही देशांनी गेल्या ५ ते १० वर्षाची भरीव प्रगती पाहून त्याच पध्दतीने भारतासारख्या विकसनशील राष्ट्राने स्वतःची प्रगती करणे शक्य होईल. अशाप्रकारे चीन व थायलंड दौरा पूर्ण करून येउन आपल्यासमोर ही माहिती ठेवली आहे. चीनला जाऊन रविवारी परत आले तिथले रस्ते, तिथली शिस्त, कामकाजाची पध्दत अतिशय सुंदर वाटली आणि ह्या दोन विषयांमध्ये जास्तीत जास्त त्यांनी प्राधान्य देउन मुक्त अर्थव्यवस्था त्यांनी आपल्या देशात कशा प्रकारे राबवली आहे ह्याचे उत्तम उदाहरण त्यांच्या या कार्यशाळेमुळे आम्हाला पहायला मिळाले आणि दाखवून दिलेले आहे. तसेच तेथिल पाण्याच्या बाबतीत थोडक्यात आपल्याला सांगू इच्छिते, चीन व थायलंड या देशामध्ये फार मोठया प्रमाणात पाणी टंचाई जाणवते.

हॉटेल लॉजींग मधून पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. विकत घ्यावे लागणारे पाणी पाउच, बॉटल मधून दिले जाते. पाण्याचा दर हा. १००० लिटरला जवळ-जवळ १८ ते २० रुपये इतका पडतो व हे पाणी कमर्शिअल आणि हॉटेलच्या वापरासाठी जर असेल तर तो चारपट दर तिथे मोजावा लागतो. अशाप्रकारे सुंदर रस्ते, चौफेर रस्ते आणि तिथे हिरवळीची सुद्धा त्यांनी मुबलक अशी व्यवस्था पाण्याची हिरवळीसाठी करून दिलेली आहे. आपलाही भारत देश या प्रगतीत कुठल्याही प्रकारे कमी नाही. शेवटी, आपल्या देशाबद्दल आपल्याला अभिमान आहे तरीसुद्धा हे सर्व पाहत असताना तेथील विकास आपल्याही देशात व्हावा आपल्या शहरात व्हावा ही एक मनोमन आणि प्रामाणिक इच्छा आहे. यासाठी आपले सर्व सदस्य, अधिकारी गण या योजनेमध्ये चांगल्या सुविधा स्वीकारण्यासाठी आपल्या सर्वांना एकत्र येउन ही सुविधा आपल्या शहराला देता येईल याचा आपण नक्कीच प्रयत्न केला पाहिजे. आजची सभा ही शैक्षणिक शाळांना अनुदान देण्यासाठी बोलवली गेली आहे. आपण सर्वांनी चर्चेमध्ये सामील होउन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडाल अशी मला अपेक्षा आहे. धन्यवाद. पुन्हा एकदा नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

(नगरसचिव ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

तत्पुर्वी विषयाला सुरूवात करण्यापुर्वी आपल्या महानगरपालिका हद्दीतील नुकत्याच मेलबोन येथे पार पडलेल्या राष्ट्रकूल स्पर्धेत वेटलिफ्टिंग खेळात कु. सिंम्पल कौर भुमेरा हीने कांस्य पदक मिळवलेले आहे. तिचा ह्या ठिकाणी प्रथम सत्कार आयोजित केलेला आहे.

**रक्षाबेन शाह :-**

मा. महापौर मॅडम, सत्कारापुर्वी मला एक सुचना मांडाची आहे.

**मा. महापौर :-**

सत्कार होउ द्या.

**रक्षाबेन शाह :-**

मा. महापौर मॅडम सत्कार होउ द्या पण भाईंदरमध्ये आरोग्याचा लोकांना गॅस्ट्रोचा त्रास आहे. गॅस्ट्रोचे पूर्ण महाराष्ट्रामध्ये .....

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, पहिल्यांदा सत्कार होउ द्या.

**रक्षाबेन शाह :-**

सत्कार होउ द्या पण गॅस्ट्रोचा विषय आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपण सत्काराचा विषय मांडलेला आहे तर पहिल्यांदा सत्कार करू द्या. सत्कारानंतर कामकाजाचाच विषय आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या, आपण बसुन घ्या.

**रक्षाबेन शाह :-**

सत्कार करण्याकरिता मी नाही, म्हणत नाही. गॅस्ट्रोचा विषय सभेसमोर मांडणे गरजेचा आहे. आपण सत्कार करण्याकरिता बोलवता आणि आपल्या सदस्या कैलासबेन जानी........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या, आपण बसुन घ्या. सत्कार झाल्यानंतर आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल.

**नगरसचिव :-**

कु. सिंम्पल कौर भुमेरा ह्यांना सिल्व्हर पदक मिळाले आहे. त्यांना मी सभागृहात बोलवत आहे.

(मा. महापौर मॅडम ह्यांना कु. सिम्पल कौर भुमेरा ह्यांना पुष्पगुच्छ देउन त्यांचा सभागृहासमोर सत्कार केला.)

**जयंत पाटील :-**

मॅडम महापालिकेतील सर्व सदस्यांतर्फे आणि या शहरातील सर्व लोकांतर्फे आपले हार्दिक स्वागत आणि हार्दिक अभिनंदन.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझे एक महिन्याचे मानधन मी कु. सिम्पल कौर भुमेरा ह्यांना देण्याकरिता जाहिर करतो.

**नगरसचिव :-**

यापुर्वी मा. महापौर मॅडम ह्यांनी देखिल त्यांचे एक महिन्याचे मानधन कु. सिम्पल भुमेरा ह्यांना देण्याचे घोषित केलेले आहे. तसेच, सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी देखिल त्यांचे एक महिन्याचे मानधन देण्याचे घोषित केलले आहे.

**अनिता पाटील :-**

मॅडम मी सुद्धा जाहिर करते की, माझे एक महिन्याचे मानधन कु. सिम्पल भुमेरा ह्या मुलीला देण्यात यावे.

**आसिफ पटेल :-**

मॅडम सभागृहामध्ये प्रत्येक सदस्यांचे एक महिन्याचे आहे ते मानधन त्यांना देण्यात यावे.

**जयाबाई भोइर :-**

मा. महापौर मॅडम, माझा देखील एक महिन्याचा मानधन या मुलीस देण्यात यावा.

**रक्षाबेन शहा :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, सगळेजण आपआपल्या हिशोबाने मानधन देत आहे. हा मिरा भाईंदर शहराचा गौरव आहे व मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे त्यांना स्कॉलरशीप देण्यात यावी आणि त्यांचे पुढील भविष्य सुधारावे आणि आणखीन सुधरेल तसे काही कार्य करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी त्यांच्या मानधनाची रक्कम श्रीम. सिम्पल भुमेरा ह्यांना निधीदाखल देत आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या सत्काराला अनुसरुन मला असे वाटते मी सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांच्याशी बोलले होते की, आपण सत्कार करतो. आपल्या पालिकेचे एक प्रतिक त्यांना देतो. शाल देतो. श्रीफळ देतो. ह्या सगळ्या गोष्टी आहेत. परंतु, ज त्यांच्या फाईलला अटॅच राहते असे प्रमाणपा आपण त्यांना कधीच कोणाला देत नाही. गेल्यावर्षी सुद्वा आपण दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. तेव्हा त्यांना आपण नेमके सन्मान पत्र दिले नव्हते. गेल्या वर्षीच्या सर्व विद्यार्थ्यांना आणि ह्या मुलीला सुद्धा तसे सन्मान पत्र आपल्या पालिकेकडून देण्यात यावे असे मी मागे स्थायी समिती सभापती साहेबांबरोबर बोलले होते. पण आपण ह्याची कृपया नोंद घ्यावी ते प्रमाणपत्र त्यांच्या कधीतरी कामात येते.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, आपण सहायता निधीमध्ये पन्नास लाखची तरतुद केलेली त्यातून आपण काहीतरी रक्कम आपल्यातर्फे घोषित करा. घोषित करा आणि इम्पलीमेंन्ट नंतर द्या. मा. महापौर निधीतर्फे काहीतरी रक्कम घोषित करा.

**मा. महापौर :-**

बजेटमध्ये महापौर सहायता निधी म्हणून पंचवीस लाख रूपये तरतुद केलेली आहे. हा सहायता निधी उभा करण्यासाठी जरी वेळ लागला तरी मी आता, खेळाडू हा आपल्या शहराची शान आहे म्हणून ह्यातून पंचवीस हजार रुपये देण्याचे मी डिक्लर करत आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, माझ्याही एक महिन्याचा मानधन ह्यांना देण्यात यावा.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, या खेळाडूंना श्रीम. रिटा शहा (नगरसेविका) आणि निर्मला निकेतन हायस्कूल संचालिका तर्फे मी पाच हजार रूपयाची मदत कु. सिम्पल भुमेरा ह्यांना डिक्लर करते.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मान पत्राचा निर्णय अजून घेतला नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम ह्यांनी मांडलेली सुचना आहे तर पुढच्या वेळेपासुन सन्मानपत्र व प्रशस्तीपत्रकसुद्धा विद्यार्थ्यांना व खेळाडूंना जे जे गुणवान पात्र आहेत अशांना दिला जाईल. ह्याच्या पुढून आपण ही सुधारणा करून घेउ.

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १०६ चे वाचन केले.)

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्या परवानगीने बोलू इच्छिते की, सदस्यांची भावना आपण ऐकून घ्यावी. पुर्ण महाराष्ट्रमध्ये गॅस्ट्रो प्रकरण घडत आहे. कमीत कमी पंधरा ते वीस प्रकरण माझ्या एरियामध्ये आहे. त्यात सन्मा. नगरसेविका कैलासबेन जानी ह्या चार दिवसापासून गॅस्ट्रोच्या आजराने हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहे. एवढे प्रकरण घडताना आरोग्य विभागातर्फे काय काय कार्यवाही केलेली आहे ती कार्यवाही लोकांना सांगण्यात यावी. त्याचा खुलासा करावा आणि भविष्यात काय करणार आहे? त्याचाही खुलासा करावा. तीन पंप एकसारखे शहाड टेमवरून बंद झाले आणि आता सुरूवात झाली. लोकांना पाण्याचाही त्रास आहे. त्यात मिश्रण पाणी येत आहे. लोकांना आपण घरोघरी निरोप देण्याकरिता जसे उकळून पाणी प्या किंवा त्यात औषध टाकून आपल्याला पाणी मिळत आहे. अशी काय सुविधा केलेली आहे. त्याची चर्चा येथे सभागृहामध्ये व्हायला पाहिजे व लोकांची सुविधा व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, सन्मा. सदस्या रक्षाबेन शाह ह्यांनी आज जी मिरा भाईंदर मध्ये गॅस्ट्रोची साथ आहे. लागण लागलेली आहे. ते निश्चितच खरे आहे. मिरा भाईंदरमध्ये भाईंदर पुर्व विभागामध्ये प्रभाग क्र. २२ याच्यामध्ये कमीत कमी आठ ते दहा रूग्ण आज या गॅस्ट्रोच्या आजारावर उपचार घेत आहे. कस्तुरी हॉस्पीटल मध्ये चार रूग्ण आहेत. सुदैव हॉस्पीटलमध्ये चार रूग्ण आहेत आणि बाकीचे दुसरे अन्य रूग्णालयामध्ये भरती आहेत. आज मिरा भाईंदर शहरामध्ये इतकी भयावह परिस्थिती आहे व जिथे जिथे गॅस्ट्रोच साथ आहे. कावीळची साथ आहे. त्यावर देवीची सुद्धा साथ आहे. प्रशासन याबाबत झोपेचे सोंग घेउन बसलेले आहेत का? का, प्रशासनाला माहिती नाही की, मिरा भाईंदरमध्ये आजपर्यंत जी आरोग्य सेवा आपण पुरवतोय ती आरोग्य सेवा ह्या बाबतीत आता जी साथ लागू आहे त्याबाबतीत कशा पद्धतीने पुरवायला पाहिजे, लोकांशी कशा पद्धतीने संपर्क साधायला पाहिजे, जेव्हा आपल्याला लोकांना काही सांगायचे रिक्षावरुन तर टॅक्सची वसुली असेल तर रिक्षामधून माईकवरून सर्वीकडे बातमी फीरवतो. त्या पद्धतीने अशा सुचना नागरिकांना द्यायला नको का? नागरिकांना पॅम्पलेट काढून सांगायला नको का, वेळच्यावेळी पाणी उकळून प्या. अन्न गरम करून खा. अशा ज्याकाही सुविधा आहेत त्याची दक्षता बाळगायची आहे. त्या सांगायला नको का? प्रशासन एवढे ढिम्म का बसले आहे? आज मिरा भाईंदर मध्ये एक नाहीतर बरेचसे असे रूग्ण आहेत जे आपल्यापर्यंत आलेले नाहीत. प्रशासन या संदर्भात काय निर्णय घेईल? काय निर्णय घेत आहे? ते त्वरीत कळवावे. मा. महापौर मॅडम, आम्हाला अरोग्य सेवेच्या संदर्भात याबाबत प्रशासन काय निर्णय घेईल आणि सध्या जी परिस्थिती आहे त्याबाबत काय आहे, ते लवकर कळवावे.

**डॉ. रमेश जैन :-**

मा. महापौर मॅडम की, परमिशन से बोलना चाहता हूँ, यह तीन दिनो से मेरे पास कम से कम ४० पेशन्ट्स गॅस्ट्रो के आ रहे है। उसमे से दो केस सिरीयस है। किशनदास से मॉर्निंग मे मुझे फोन आया एक श्रद्धा हॉस्पीटल मे भी सिरियस केस है और परसो स्थायी समिती की सभा हूई थी उसमे डिसकस किया गया था की, हमलोग वहा अनाउन्समेंन्ट करेंगे लेकिन अभीतक कोईभी अनाउन्स किया नही। पानी की असुविधा है। पानी बराबर नही आ रहा है। पानी गंदा आ रहा है। उसके लिए तुरंत कार्यवाही की जाए।

**मा. महापौर :-**

शहरामध्ये गॅस्ट्रोचे बरेच रूग्ण आढळून आलेले आहेत. पाणी दुषित असल्यामुळे हा आजार उदभवतो. आरोग्य विभागाला या संबंधित त्याच दिवशी निर्देश देण्यात आलेले आहेत. तरीसुद्धा रिक्षा या माध्यमातुन, टी.व्ही., केबल या माध्यमातून जनतेमध्ये जागृती हेण्यासाठी या प्रसार माध्यमातून पॅम्पलेट, रिक्षा आणि टी.व्ही. जाहिरात देउन लोकांना जागरुक करण्यात यावे व शहरामध्ये ठिकठिकाणी रिक्षा फिरवून अॅनाउन्समेंन्ट करण्यात यावे क, आरोग्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच, सोसायटीमध्ये, बिल्डींगमध्ये, टी.सी.एल. पावडर पुरवण्याची व्यवस्था करण्यात यावी असे आरोग्य विभागाला मी निर्देश दिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

वैद्यकिय सेवेबद्दल काय? आपण त्यांना वैद्यकिय सेवो कशा पुरवणार? आज जे रूग्ण जिथे तिथे घरामध्ये आहेत, हॉस्पीटलमध्ये आहेत त्यांना आपण वैद्यकिय सेवा कशाप्रकारे पुरवणार आहोत? आज हॉस्पीटलमध्ये किती रूग्ण आहेत? त्याची आपण पहाणी करून घ्या. आज वर्तमानपत्रामध्ये बातम्या येत आहेत. प्रत्यक्ष हॉस्पीटलमध्ये पहाणी करायला आपले कोणते अधिकारी गेलेले आहेत?

**रक्षा शहा :-**

टी.सी.एल. पावडर कधीपर्यंत पुरवणार आहात?

**मा. महापौर :-**

पुर्ण शहरामध्ये आपले ठिकठिकाणी आरोग्यकेंद्र आहेत. फिरता दवाखाना आहे. त्यामार्फत गॅस्ट्रोच्या रूग्णांना तिथे तिथे औषध उपलब्ध करून देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

हे तिथे होत नाही. हॉस्पीटलला गेल्याशिवाय त्याच्यावर इलाज होत नाही. आरोग्य केंद्रामध्ये त्या सुविधा नाही. त्यांना अतिदक्षता विभागामध्ये ठेवणार आहात का, मॅडम.

**मा. महापौर :-**

जेव्हा रूग्णाला गॅस्ट्रो झालेला आहे.......

**रतन पाटील :-**

आपल्या गोळ्यांमुळे रूग्णांना फरक पडत नाही. ही गॅस्ट्रोची साथ आहे.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, ह्याच्यामध्ये असे आहे की, जे आपले आरोग्य केंद्र सुरू आहेत. महापालिका ह्याच्याकरिता करोडो रूपये खर्च करते. स्वतंत्र आरोग्य केंद्र काम करतात. पेपरमध्ये जेव्हा बातमी येते तेव्हा त्याचा खुलासा होतो. हे आधी, आरोग्य केंद्राच्या लक्षात आले होते की, नाही. हा विषय आहे आणि त्यांच्या लक्षात आले असेल तर त्यांनी आयुक्त साहेबांच्या, महापौरांच्या नजरेत आणले होते की, नाही? हा विषय आहे. ह्याच्या

आधी स्थायी समितीमध्ये जेव्हा चर्चा झाली. तर त्याच्यावर आपण कोणती कृती केली त्या कृतीचे अजुनपर्यंत निवेदन झालेले नाही. आज खरोखर त्या आजारावरच औषधे तुमच्याकडे आहेत की, नाही. औषधाची फवारणी सुरू झाली आहे की, नाही? गॅस्ट्रोच्या केसचा त्या रूग्णाला खर्च परवडणार नाही. म्हणून महापालिका त्या रूग्णाला काही आर्थिक मदत करेल का? अशी चर्चा व्हायला पाहिजे. नाहीतर पेपरवाल्यांनी पेपरवाल्यांचे काम केले. जी वस्तुस्थिती आहे ती नजरेसमोर आणली आपल्यापेक्षा गावाच्या बाहेर गेली. आपले कर्तव्य काय? आपण त्याच्यासाठी काय उपाययोजना केली आणि काय करणार आहात. खरोखर, जे रूग्ण दुषित पाणी पिउन आजारी झालेले आहेत. तर त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसणार. मग ह्या सभेत त्याचा निर्णय व्हायला पाहिजे. जो गॅस्ट्रोचा रुग्ण आहे ते सिद्ध होईल आणि त्याला आम्ही आर्थिक मदत देउ. अशा पद्धतीची चर्चा होणे गरजेचे आहे. घाईत आणले, ऐकले आणि सोडून दिले. मॅडम, असा विषय व्हायला नको. आपण निच्छित सांगा की, आरोग्य अधिकाऱ्याने त्याचे निवेदन करावे. आजच्या घटकेला त्यांच्याकडे किती रूग्णांची नोंद झालेली आहे किंवा कुठून कुठून त्यांच्याकडे रूग्ण आलेले आहेत? आपल्या खाजगी दवाखान्यातून आणि महापालिकेच्या दवाखान्यातुन किती रूग्ण आहेत. ह्याचे ही विष्लेषण होणे गरजेचे आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, रिक्षामार्फत आपली जी सुचना आहे तर जेव्हा आपली रिक्षा फिरते ती रिक्षा एका जागेवर उभी राहून त्यांनी अनाउन्स करावे. रिक्षा चालत असताना ॲनाउन्स करतात त्यामुळे ऐकायला मिळते गॅस्ट्रोचा रूग्ण तो तेवढा ऐकतो आणि पुढच्याला ऐकायला मिळते हॉस्पीटलमध्ये आहे. तसे होउ नये म्हणून रिक्षा कॉर्नरला उभी राहून प्रत्येक जागोजागी उभी राहून त्यांनी ॲनाउन्स केले पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, रिक्षा गल्लीगल्लीमध्ये जायला पाहिजे. कारण मेन रोडवर अनाउन्स करुन फायदा नाही. रिक्षा गल्ली गल्लीमध्ये फिरवा म्हणजे पब्लिकला समजेल की, हा रोग सगळीकडे आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. २२ मध्ये बी. पी. रोड, विजय पंजाब समोर पाईप लाईन लिकेज आहे. तो लिकेज कधीच निघत नाही. त्याच्यावर ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे आणि त्याचे दुरूस्तीकरण लवकरात लवकर झाले पाहिजे आणि पाण्याचे लिकेज बंद झाले पाहिजे. त्या पाण्यामुळे लोकांना घाण पाणी येत आहे.

**मा. महापौर :-**

पाणी विभागाच्या अधिकाऱ्याने ह्याचा खुलासा करावा.

**सुरेंद्रप्रसाद तिवारी :-**

मा. महापौर मॅडम, जो हॅन्डबिल छापते हो वह गुजराथी और हिंन्दी मे भी छपईए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, आज आम्ही गेले सहा महिने झाले, भाईंदर सेकंडरीचा मी सदस्य आहे. मी फक्त आता आमची शाळा दुरूस्ती करण्याकरिता आम्ही वर्गाची मागणी केलेली आहे. आज गेले सहा महिन्यापासून मी अधिकाऱ्याच्या मागे लागलेलो आहे. परंतू, तिथे जे गोडाउन झालेले आहेत ते गोडाउन खाली करून आम्हाला या पुढच्यावर्षी जुन महिन्यामध्ये जेव्हा शाळा चालू होतील तेव्हा आमच्या मुलांना बसण्याकरिता म्हणून मी दोन रूमची मागणी केलेली आहे आणि आपल्या म्युनिसिपालीटीची शाळा आहे व आज पाच सहा महिन्यापासून मागणी करुनसुद्धा आणि आर्थिकदृष्ट्या........

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य आरोग्य संदर्भात प्रश्न चालू आहे व आरोग्याच्या संदर्भात आम्हांला क्लेरीफिकेशन मिळाले नाही. आरोग्याच्या संदर्भात आपण काय उपाययोजना करणार त्याच्या संदर्भात निर्णय होऊ द्या. मग नंतर तुमच्या शाळेचा विषय या. आपल्या शाळेच्या विषयासाठी फार घाई चालली आहे हे आम्हांला माहिती आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आज मी सहा महिन्यापासून मागणी केलेली आहे. हे अधिकारी स्थायी समितीच्या सभेलासुद्धा येत नाही. आपल्या मा. महासभेमध्येसद्धा हजर राहत नाही आणि आत्ता बसले आहेत ते आपल्या खुर्चीच्या मागे आहेत, तोंड लपवून. आज आम्ही सहा महिन्यापासून मागणी करत आहोत म्हणजे आमच्या शब्दाला काही किंमत नाही का? आम्ही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करत नाही. आम्ही भाडे द्यायलासुद्धा तयार आहोत. तरीसुद्धा हे शिक्षण अधिकारी, ते त्यांच्या खिशातले आम्हांला काही देतात का? आज सहा महिने झाले, मागणी करुनसुद्धा ते दोन शब्दाच्या ओळीचे पत्र देत नाही. आम्ही जेव्हा ही शाळा तोडली तेव्हा ह्या महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना आम्ही आमच्या शाळेचे वर्ग दिलेले होते आणि नाममात्र एक रुपयासुद्धा भाडे घेतलेले नाही. आत्ता ह्या सहा महिन्याकरिता आम्ही मागणी करतोय आणि हे अधिकारी आपल्या घरातले काय देतात का? हे भ्रष्ट अधिकारी आपल्याकडे आणून ठेवले आहे आणि आमच्या

नगरसेवकांची कामे हे का करत नाही? हे कशाला वेळ लावत आहेत? मॅडम, आपण रुलिंग द्या की, सोय ताबडतोब आठ दिवसामध्ये झाली पाहिजे. आत्ता शैक्षणिक वर्ष चालू होईल. त्यावेळी आमच्या मुलांना बसायला जागा नाही आणि आमची मुलं जर अशीच बसली तर त्यांना मी पावसात बसवेन. हे काय चालले आहे? हे अधिकारी असे करतात. स्वार्थापोटी हे प्रायव्हेट शाळांची ताबडतोब रेकमेंन्डेशन करुन देतात आणि आम्ही दोन वर्ग मागितले तर हे देतनाही. आम्ही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करत नाही. आम्ही महिन्याचे भाडे द्यायलासुद्धा तयार आहोत. मॅडम, आपण संबंधित अधिकाऱ्याला रुलिंग द्या आणि आदेश द्या की, आठ दिवसामध्ये ही कारवाई झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

भाईंदर सेकंडरी स्कुलचे दुरुस्तीचे काम चालू असतांना त्यांना दोन वर्ग उपलब्ध करुन देण्याची मागणी आहे. तर आयुक्त महोदय, सन्मा. सदस्यांना चार दिवसामध्ये दोन वर्ग लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यांत यावे.

**मिलन पाटील :-**

धन्यवाद!

**मा. महापौर :-**

आरोग्य विभागाचे डॉ. पडवळ ह्यांनी संबंधित सदस्यांना आरोग्य विषयक समाधानकारक माहिती देऊन पुर्ण खुलासा करावा.

**डॉ. पडवळ (विशेष कार्य. अधिकारी) :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलतो की, मागच्या काही दिवसामध्ये आपल्याकडे गॅस्ट्रोचे रुग्ण कस्तुरी हॉस्पीटल, श्रद्धा हॉस्पीटलमध्ये आहेत. कालच श्रद्धा हॉस्पीटलमध्ये सात रुग्ण भरती झाल्याचे आपल्याला माहिती मिळालेली आहे आणि त्यापैकी चार भाईंदर वेस्टचे आरोग्य केंद्र आणि तीन गणेश देवलनगर या रेलपोस्टच्या अंडर आहेत आणि त्या ठिकाणी आपले डॉक्टर्स स्वतः आणि ए.एन.एम. ह्यांना आपण प्रत्येक इंडीव्हीज्युअल केसची माहिती घेऊन कशा प्रकारे त्यांना हा आजार उद्‌भवला आहे ह्याची माहिती घेण्यासाठी पाठवलेले आहे आणि त्यानुसार आजुबाजूच्या शंभर-एक घरात प्रत्येक केसच्या आजुबाजुला शंभर घरामध्ये चौकशी करुन आणखीन कोणी गॅस्ट्रोचा रुग्ण आहे का, ह्याची चौकशी करुन त्याप्रमाणे आपण त्यांना ओ.आर.एस. पाकिटे चुरा आणि मेट्रो टेब्लेट इ. डिस्ट्रीब्युट करतो. आपल्याकडे सर्व आरोग्य केंद्रामध्ये मेडीसिनचा साठा उपलब्ध आहे. हा जो गॅस्ट्रोचा आजार आहे, तर योग्य वेळी जर पेशन्ट आपल्याकडे आला तर आपण त्याला ओ.पी.डी. बेसीसवर गोळ्या वगैरे देऊन आणि ओ.आर.एस. पॅकेट देऊन याला मॅनेज करु शकतो. परंतु, पेशन्टने जर औषधे घेण्यांस विलंब लावला तर उलटी आणि संडासमधून पाणी शरीराच्या बाहेर जाऊन डीहायड्रेशन होते. अशा अवस्थेत त्याला ॲडमिट करुन सलाइन लावणे गरजेचे असते. म्हणजे अशा पद्धतीत रुग्ण सिरियस म्हणता येईल असा असतो. परंतु, दोन ते तीन सलाइनमध्ये नॉर्मलला येऊन त्याला ओ.आर.एस. म्हणजे तोंडाने ओ.आर.एस. देऊन आणि गोळ्या देऊन व्यवस्थित बरे करता येते.

**रक्षाबेन शाह :-**

डॉक्टर साहेब, स्थायी समितीची सभा चालू असतांना श्रीम. कैलासबेन जानी ह्या स्थायी समितीच्या सदस्या आहेत. त्यांना स्थायी समितीची सभा चालू असतांना हा प्रॉब्लेम झाला आणि त्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झाल्या हे आपणांला माहिती आहे का?

**डॉ. पडवळ (विशेष कार्य. अधिकारी) :-**

होय, माहिती आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

जो रुग्ण है उनको इंजेक्शन से भी फरक नही पडता है। डिहायड्रेशनकी बोटल लगाने के बाद भी फरक नही पड रहा है। उनका सिधा क्रिएटीव्ह लेव्हल बढ रहा है। पोटेशन लॉस हो रहा है, बढ रहा है। ऐसा सब हो रहा है। दो-चार पेशन्ट ॲडमिट हो गए है। श्रद्धा हॉस्पीटलमे भी गॅस्ट्रो के पेशन्ट ॲडमिट है। इतना सिव्हीर इन्फेक्शन है।

**डॉ. पडवळ (विशेष कार्य. अधिकारी) :-**

अगर पेशन्ट को लाने मे देर हो जाती है तो इलेक्ट्रो लाईट इम्बॅलन्स होकर फिर वह सिरीयस केस हो जाता है। इसलिए हम मायकिंग कहेंगे की, जैसे ही आपको एन.ए. लुजमोशन या उलटी हो जाये तो तुरंत आप आरोग्य केंद्र मे जाकर जल्दी से दवा ले। ताकि कंडीशन ज्यादा बढकर उनको ॲडमीट करनेकी जरुरत ना आए।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जो खुले रुटपर जो खाद्य पदार्थ, वह इतनी गंदी जगह पर बनाए जाते है और गंदे वातावरण मे वहाँपर खिलाया जाता है। उसके उपर आप क्या कडक कार्यवाही करते हो? चायनीज वगैरे जो हातगाडी पर जो पदार्थ है उसके उपर महापालिकेने कुछ कार्यवाही की है क्या?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आत्ता सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, उघड्यावर जे अन्न वगैरे विकतात त्यांच्यावर आण काहीतरी बांधिलकी आणावी आणि दुसरा प्रश्न म्हणजे गॅस्ट्रो झाला तो नुसता मिरा भाईंदरमध्ये झाला आहे असे नाही. काल पण, मला ईस्टमधून फोन आला. आपल्याकडे खुप चांगल्या पद्धतीने कार्यपद्धती चालू आहे. घरोघरी जाऊन त्यांना पावडर वगैरे दिलेले आहे. त्याची माहितीसुद्धा मला मिळाली आहे. केबल टी.व्ही येते, तेही प्रशंसापात्र आहे. परंतु, गॅस्ट्रोचा आजार हा संपुर्ण महाराष्ट्रामध्ये झालेला आहे, मुंबईमध्येही आहे. मिरा भाईंदरमध्ये सुद्धा सुरु झालेला आहे. त्याऐवजी दुसरा एक रोग आपल्या मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये उफाळून आलेला आहे, तो म्हणजे बर्ड फ्ल्यु. त्याच्याबद्दलही आपण अगोदरपासून प्रिकॉशन घ्यायला पाहिजे. कारण तो रोग आत्ता महाराष्ट्रामध्ये पसरलेला आहे आणि तो रोग आपल्या दारी येऊ नये ह्याच्याकरिता प्रिकॉशन आपण अगोदरपासून घ्यायला पाहिजे आणि आरोग्य विभागाने जी ही गॅस्ट्रोवर खुप चांगली प्रशंसापात्र कार्यवाही केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

**रमेश जैन :-**

साहब, प्रिकॉशन इज बेटर दॅन केअर, उस तरह काम किया जाए। पाणी को उबालके पिया जाए ऐसे लोगो तक मॅसेज भेजो और टी.सी.एल. पावडर बाटा जाए।

**रक्षाबेन शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण कार्यरत नाही असे माझे म्हणणे नव्हते आणि डॉक्टर ही कार्यरत आहेत.

**रोहीदास पाटील :-**

सभागृह कशाची अपेक्षा करते की, तुमची फक्त ऐकायची भुमिका आहे का? सभागृह याची अपेक्षा करते की, जिथे प्रभाग अधिकाऱ्यांचे ऑफीस आहे. त्या ठिकाणी किती कचरा आहे. जिथे दुधाचे दुकान आहे त्याठिकाणी किती कचरा आहे. महापालिकेने काय मनावर घेतले? महापालिकेचे अधिकारी सतर्क झाले. म्हणजे काय कामाला लागले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आणीबाणीची परिस्थिती समजून घेतली का? ते सांगा ना. तुमचे रोजचे काम चालूच आहे. महापालिकेचे रोजचे कामकाज चालू आहे. आता गॅस्ट्रोची साथ फाईन्ड आउट झाल्यानंतर महापालिका सतर्क झाली म्हणजे काय झाले? ते सांगा. कोणत्या वॉर्डामध्ये आपण औषधे वाटली, ते सांगू शकता? मॅडमनी सांगितलेले हे सभागृह नेते समजून घेतले का? सांगा असे की, तुम्ही ह्या वॉर्डमध्ये ६ नंबर प्रभागामध्ये ज्या ठिकाणी तुमचे ऑफिस आहे. ज्या ठिकाणी तुम्ही बसता. तुमच्या मागे तुम्ही कधी बघितले का? अशी कधी नोट दिली का, अधिकारी म्हणून. डॉक्टर म्हणून तुम्ही असे सांगितले आहे का की, बंदरवाडी शाळेची इतकी मुले शिकतात, प्राभाग कार्यालय चालते. आरोग्य केंद्र चालते आणि आरोग्य केंद्र चालत असताना त्याच्या तिन्ही बाजूला घाण आहे. तुम्ही नाक बांधून बसता. तुम्हाला प्रश्न कोण विचारणार?

**डॉ. पडवळ (विशेष कार्य. अधिकारी) :-**

याबाबत वेळोवेळी स्वच्छता निरिक्षकांना सूचना देउन.....

**रोहीदास पाटील :-**

हे असे सांगा या सभागृहात निवेदन करा की, बंदरवाडीच्या शाळेसमोर पुन्हा पुन्हा सांगून सूद्धा साफसफाई होत नाही. औषध फवारणी होत नाही. आपण गोळ्या दिल्या म्हणजे पेशन्ट बरा होईल असे नाही. गोळ्या द्यायची पाळीच आली नाही पाहिजे. इतके आरोग्य स्वच्छ राहिले पाहिजे.

**डॉ. पडवळ (विशेष कार्य. अधिकारी) :-**

बंदरवाडी प्रभाग ऑफिस जे आहे. त्याच्यापुढे संध्याकाळच्या सुमारास चायनीसच्या गाडया लागलेल्या असतात.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील ह्यांनी जो मुद्दा उचलला तो मुद्दा खरोखर सत्य आहे. त्याच्यामध्ये मॅडम, मेन परिस्थिती अशी आहे की, प्रभाग क्र. २१ मध्ये आमच्याकडे मार्केट लागते. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेवरील झाडू कामगार दिवसा चारदा झाडू मारतात. परंतू, मुख्य परिस्थिती अशी आहे की, ते रात्री दहा साडे दहाला ही झाडू मारतात. रात्रभर ते काम चालू असते. परतु, आपले मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जे नागरिक आहेत. आपली जनता आहे. आता अर्धा तास झाला कचरा काढून ते कचरा भरुन जातात आणि अर्ध्या तासानंतर तिथे परत कचरा पडतो. असे मी बोलणार नाही की, प्रशासन काम करत नाही, प्रशासन काम करते. पण त्याच्यामध्ये जनतेचाही हातभार असायला पाहिजे. तर आपण आपल्या स्टाफला निर्देश द्या की, असे जो कचरा टाकणार त्याच्यावर आपण कायदेशीर नाहीतर कॉर्पोरेशनतर्फे काहितरी कार्यवाही करा. त्यांना पकडा. मागे देखील मी सर्व स्टाफला बोलावले होते की, तुम्ही आता कचरा काढून जातात हे मी स्वतः नजरेने बघते आणि ती लोक तेथे परत कचरा आणून टाकतात. मग ह्याच्यावर आपण काहीतरी ठोस निर्णय द्या.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, विषय आरोग्याचा आहे. या विषयाबाबत मी कमिशनर साहेबांबरोबर बोलली आहे. परंतु, नाईलाजाने तोच तोच विषय मला वारंवार येथे आणावा लागतो किंवा बोलावे लागते त्याबद्दल मी तुम्हाला सॉरी म्हणेन. आरोग्याच्या संदर्भामध्ये मी एक तक्रार केली होती की, जय अंबे इंडस्ट्रीमध्ये, आपल्याला औद्योगिक पट्टा आहे. उद्योग धंदे चालले पाहिजे ते ठिक आहे. परंतु, इतक्या मोठ्या आवाजाच्या मशिनरीज तिथे लावल्या जातात आणि तिथे मशीन लावण्याच्या अगोदर मी आपल्या अधिकाऱ्यांना कल्पना दिली होती की, अमुक एक ठिकाणी आणखीन दोन मशीनरी येणार आहेत. त्या आल्या आणि लागल्या सुद्धा कारण हा जो आवाज आहे, हा आवाज सुद्धा आरोग्याला घातक आहे. जरी तो गॅस्ट्रोशी संबंधीत नसेल तरी माणसाच्या आरोग्याला घातक आहे. त्यांनी त्यांचे दरवाजे कधी पुर्वेला असतात ते पश्चिमेलाही करून घेतलेले आहेत. गेली पंधरा दिवस मी या विषयावर बोलते. स्थायी समितीमध्ये सचिव हजर आहेत. परंतु, त्याच्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्या कारखान्यांचे लिमिट काय असावे? किती वाजेपर्यंत त्यांनी त्या मशीनरी चालवाव्यात. ह्याचे काहीतरी धैर्य आणि धोरण आपण ठरवले पाहिजे. कारण हा सुद्धा नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. ह्यांनंतर मी दुसरी एक तक्रार केली होती. मला वाटते, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील (दादा) चा वॉर्ड आहे आणि त्या रस्त्याने येणारे वहूतेक सर्व नगरसेवकांना माहित असेल की, त्या इंद्रलोक कॉम्पलेक्सच्या येथे पहिल्यांदा मोठे मोठे ठोकले आणि गाई बांधल्या जातात. ठराविक वेळेला सकाळी ७.०० ते ८.०० च्या दरम्यान, आज मी गाई मोजल्या. तेरा गाई तिथे त्या जागेवर मिळाल्या. त्या गाईंना तिथे उभे करतात, दुध काढतात आणि सोडून देतात. दिवसभर ती मोकाट जनावरे कुठे ही फिरतात. पुन्हा संध्याकाळी मी वेळ सांगते सायं. ५.०० वा. पुन्हा तिथे त्या गाई आणतात त्यांचे दुध काढतात आणि पुन्हा ती जनावरे सोडून दिली जातात मी जेव्हा तक्रार केली तेव्हा आपल्या पालिकेने जे मोठेमोठे खिळे होते किंवा जे रोवण्याचे भाग होते ते काढले. आता तिथे सायकलचे टायर रोवले आहेत. त्यावेळेला जनावरांना तिथे घेउन यायचे दुध काढायचे आणि काम झाल्यावर जनावर मोकाट रस्त्यावर फिरतात. मोकाट जनावरांचा त्रास आपल्याला नाही आहे का? तो काय धंदा करतो ह्याच्याशी मला काही करायचे नाही. परंतु, ती जनावरे मोकाट फिरत असतात. छातीवर पाय दिलेला अभिनवचा विद्यार्थी मी बघितलेला आहे. या सर्व गोष्टी आपल्याला धोकादायक आहेत आणि या छोट्या गोष्टी असेल परंतु, आपण त्याचे परिणाम जाणून घेतले पाहिजे. मला असे वाटते की, हा विषय मा. महासभेमध्ये यायला नको होता. कारण स्थायी समितीमध्येच मी दोन वेळा ह्या विषयी बोलले आहे आणि मा. आयुक्त साहेबांना ही सांगितले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या वॉर्डातही एक गाईचा गोठा आहे आणि हस्यास्पद अशी गोष्ट आहे की तो विभाग कोणाकडे आहे हे कळत नाही. जेव्हा त्या गोठ्याबद्दल मी नेहमी तक्रार करतोय आणि अतिक्रमणामध्ये तक्रार केल्यानंतर त्यांनी मला उत्तर दिले की, आम्ही अतिक्रमण हटवले तर अतिक्रमण काय हटवले? त्या गाईच्या गोठ्याच्या वर टाकलेले छप्पर, माझी ड्यूटी संपली. आता आरोग्य विभागाकडे जा. म्हणजे शेवटी ही कोणाची जबाबदारी आहे. तो भर रस्त्यात गायी उभ्या करतो. शेण तिथे टाकतो. समोर देऊळ आहे. कोणत्या अधिकाऱ्याची जबाबदारी आहे हे कोणी ह्या महापालिकेत बघायला तयार आहे? अतिक्रमण विभागाने काम केले, छप्पर काढले. गाई उचलण्याचे काम ठेकेदाराचे आहे. शेण उचलण्याचे काम आरोग्याचे आहे. म्हणजे याठिकाणी या शहराचे काय चालले आहे. कुठेतरी ह्या लोकांचा संबंध आहे की नाही, कोणाला न्याय मिळणार नाही का? जेव्हा तेथून त्यांना हटविले तेव्हा तो आता रेल्वेच्या हद्दीमध्ये गेला आहे. म्हणजे येथून हटविल्यानंतर तो आता आमच्या हद्दीत नाही रेल्वेच्या हद्दीत आहे. दोन फूटावर रेल्वेची हद्द सुरू होत आहे म्हणजे रेल्वेच्या हद्दीमध्ये असले तरी आमच्या वॉर्डामध्ये घाण येत नाही का? ह्या शहरामध्ये हे काय चाललेले आहे? अधिकारी जबाबदारी घ्यायला तयार नाही.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, माझ्या वॉर्डातून मी तक्रार केली होती की, एका मुलीला गाईने मारले. त्या गाई पकडले आणि नंतर सोडून दिले. तर त्या गाईला कशाकरिता सोडण्यात आले? एस. व्ही. रोडवर जागा कमी आहे. तिथे पूर्ण दिवसभर गाई हिंडत असते. तर गाई उचलतात की, उचलून परत त्या गाई `कशाला सोडल्या जातात? त्याचबरोबर कुत्र्यांचा त्रास ही भरपूर वाढलेला आहे. सर्व ठिकाणी, सगळीकडे लोक बोलतात की, कुत्र्यांचा त्रास भरपूर आहे. तर तो त्रास ही नाहीसा करा.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलू इच्छिते की, कस्तुरी इंडस्ट्रीमध्ये गेल्या दोन तीन महिन्यापुर्वी मी सर्व्हे केला होता तिथे बरेचसे आपले बालकामगार मजदुर होते. ते आजारी होते. तिथे आजही तुडूंब गटारे भरलेली आहेत. आपण तिथे जाउन बघा. तिथे मुळीच साफसफाई होत नाही. तुडुंब गटारे भरलेली आहेत. तिथे आमच्या महिला कामगार आहेत. त्या काम करतात. त्यासुद्धा नेहमी आजारी असतात. त्याच्यासाठी ज्यावेळी डॉ. बावस्कर आपल्या येथे कार्यरत होते त्यावेळी आम्ही तिथे जाउन कार्यक्रम केला होता. आरोग्य शिबीर राबवले होते आणि माझ्याकडे एका पत्रकाराने '' समदुत पत्रकार उपाध्याय'' ह्यांनी

तक्रार केली होती. म्हणजे पत्रकारसुद्धा आपल्याकडे येउन अशी माहिती देतात. आपल्याला वाईट वाटते की, तिथे आजसुद्धा व्यवस्थित साफसफाई केली जात नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडमच्या आमच्या लक्षात येत आहे. आपले सन्मा. सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब नेहमी म्हणत असतात की, ''आंधळा दळतोय आणि कुत्र पिठ खातोय'' आम्ही बोलतोय बोलतोय पण प्रशासनाला त्याचे काही वाटत नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, ह्याच्यावर आमचे ऑब्जेक्शन आहे. म्हणजे आज आपण आपली सभा फक्त विशेष कामकाजासाठी बोलावलेली आहे. सुदैवाने चांगली गोष्ट घडली की, जागतिक गिणती खेळाडूचा आपण सन्मान केला. त्याच्यानंतर एक अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न सन्मा. सदस्यांनी उपस्थित केला त्याच्यामध्ये सात आठ नगरसेवक सातत्याने बोलले. एकदा मा. महापौरांनी या विषयावर त्यांचे निवेदन दिलेले आहे. कामकाजाची जर पद्धत बघितली तर मा. महापौरांनी निवेदन दिल्यानंतर सहसा त्याच्यावर आपण पुन्हा फेरचर्चा करत नाही. ठिक आहे, अति लोकशाही असल्यामुळे आपण हे करतोय आणि आपल्याला मान्य आहे. त्याचा आम्ही आदर करतो. परंतु, आता सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी म्हणाले की, ''आंधळ दळतोय आणि कुत्र पिठ खातोय'' म्हणजे प्रशासनाला काहीच वाटत नाही का, या शहरामध्ये प्रशासन नाही का? सगळ्या गोष्टी आपण प्रशासनाकडून करून घेता. सगळ्या सुविधा प्रत्येक नगरसेवक, प्रत्येक गटनेता मा. महापौरांकडे, मा. आयुक्तांकडे, मा. उपमहापौरांकडे, मा. स्थायी समिती सभापतींकडे सगळ्यांकडे येतात आणि आपली काम करुन घेत आहात आणि अशापद्धतीने पुन्हा प्रशासनाला हिणवण्याच्या गोष्टी करतात. मा. महापौर साहेबा हे बरोबर नाही. म्हणून आम्ही आपल्याला विनंती करतोय की, ह्या संदर्भात जे काही आरोग्य विषयक, जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. या शहरामध्ये सात रुग्ण गॅस्ट्रोचे सापडले ही भयावह गोष्ट आहे. पण येथे काही बर्ड फ्ल्यू झालेला नाही. बर्ड फ्ल्यू झाला असता, मॅडम बर्ड फ्ल्यू ची जेव्हा हाक आली. सर्वीकडे बातम्या झळकल्या तेव्हा आम्ही पण कोबडी खाण्याचे बंद केले. आता पुन्हा सुरू केले. आरोग्य ठिक आहे. मा. महापौर मॅडम, आपल्याला विनंती आहे की, ह्या विषयावर आपली जी आरोग्य विषयक चर्चा असेल, सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे, प्रशासनाने निश्चितपणे नोदवायला पाहिजे आपण सभागृहाला ॲश्युरन्स दिले पाहिजे आणि ह्या कामकाजावर आपण स्थगिती घेउन जो महत्वाचा विषय विषयपटलावर आहे त्या विषयामध्ये हात घालायला पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील व सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया या सदस्यांनी त्यांची मांडलेली सुचना, मोकाट सोडलेली जनावर ह्यांचा बंदोबस्त विभागीय अधिकारी श्री. पाणपट्टे साहेब ह्यांनी त्वरीत दोन दिवसामध्ये ह्यांचा बंदोबस्त करून हयाची सुचना आम्हाला कळविण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ज्या विषयासाठी आजची ही खास सभा बोलावलेली आहे. जेव्हा हा विषय स्थायी समितीमध्ये आला. दि. ३०/०७/२००५ रोजी स्थायी समितीमध्ये हा विषय आला आणि त्याची टिपणी बघितल्यानंतर स्थायी समितीमध्ये धोरण निश्चित करणे आहे. अनुदानाबाबत निर्णय घेणे असा हा विषय स्थायी समितीमध्ये आला आणि स्थायी समितीमध्ये धोरणात्मक काय निर्णय ठरले आहे. ह्याची माहिती त्या ठरावामध्ये नाही आणि निर्णय झाला की, ह्या ह्या संस्थेला अनुदान द्यायचे त्या संदर्भामध्ये महापालिकेमध्ये जे नगरसेवकांचे हक्क आहे. मी एक प्रश्न दि. १६/१२/०५ रोजी मा. महासभेत सचिवांना पत्र दिलेले आहे आणि ह्या बाबतीमध्ये जी अनुदान देण्याची पद्धत आहे. त्या पद्धतीमध्ये खुलासा व्हावा. मा. महासभेच्या प्रश्नामध्ये मी प्रश्न दिलेला आहे. तीन महिने झाले आहे. दि. १६/१२/०५, १६/०१/०६, १६/०२/०६ आणि १६/०३/०६. या तीन महिन्यामध्ये मला या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. आपण उपविधी तयार केली. या उपविधीमध्ये क्लिअर लिहिलेले आहे की, आयुक्तांनी संबंधित सभागृहामध्ये किंवा संबंधित विभागाने प्रश्नाचे उत्तर देणाऱ्याने ताबाडतोब पहिल्या सभेमध्ये त्याचे उत्तर दिले पाहिजे. एखादे उत्तर देणार नसेल तर आयुक्त साहेबांनी त्याबद्दल पुढच्या सभेमध्ये मागणी करून त्याचे उत्तर दिले पाहिजे. त्यानंतर तीन सभा झाली. तीन सभेमध्येही मला या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही आणि येणार नाही. त्या प्रश्नाच्या संबंधामध्ये मी परवा सचिव साहेबांना भेटलो. सचिवांनी आग्रह धरला की, आपण लेखापालला भेटा मी त्यांच्याकडे हे पत्र पाठवलेले आहे. मी लेखापालकडे गेलो. लेखापाल साहेबांनी सांगितले की, माझ्याकडे प्रश्न आलेला नाही. हा प्रश्न शिक्षण अधिकाऱ्यांशी संबंधित आहे. मी शिक्षण अधिकाऱ्यांकडे गेलो. शिक्षण अधिकारी ह्यांनी सांगितले मी आत्ताच कामावर आलेलो आहे. माझ्या घरात मयत झालेले आहे. तुम्हाला दोन दिवसात उत्तर देतो. पुन्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडे गेलो त्यांच्याकडून मला पत्रही मिळालेले नाही. असे नमुद केलेले आहे. तीन दिवसापुर्वी आयुक्त साहेब मी तुम्हालाही भेटलो. आपण मुख्य कार्यालय, सचिव ह्या सर्वांना बोलावून घेतले व तरीही आपण या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. ते तुमच्याही लक्षात आलेले आहे. जेव्हा एक कोटी रूपयाच वाटपाचा विषय येईल त्यामध्ये अनेक नगरसेवकाच्या संस्था याठिकाणी चालतात. अनेक नगरसेवक चांगले काम

करतात. म्हणून मागणी करणे हा त्यांचा हक्क आहे व ते मागणी करतात आणि महापालिका त्यांना पैसे देत आहे. पा हे दिलेले पैसे उद्या त्याचा नगरसेवक धोक्यात येउ नये. हे दिलेले अनुदान योग्य पद्धतीने दिलेले आहे. मा. महासभेच्या निर्णयाप्रमाणे दिलेले आहे किंवा आपल्या ऑडीटरने ह्यावर टिपणी दिली पाहिजे. असे कुठलेही निवेदन न करता फक्त स्थायी समितीने दिलेला निर्णय हा महापालिकेच्या मा. महासभेमध्ये आणतात. ही प्रशासनाची भूल आहे. म्हणून आयुक्त साहेब, आज जेव्हा हा प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावामध्ये प्रशासनाने मा. आयुक्त साहेबांनी हे जे अनुदान देणे योग्य आहे की, नाही. दिले पाहिजे पण कोणत्या अटीशर्तीमध्ये दिले पाहिजे. आलेली अनुदान पडताळणीचे काम कोणाचे आहे? कोणी पडताळणी केलेली आहे आणि ही केलेली पडताळणी योग्य आहे असा रितसर खुलासा या मा. महासभेमध्ये माझ्या प्रश्नाच्या संदर्भात झाला पाहिजे आणि नंतर या सभेमध्ये चर्चा झाली पाहिजे. कारण हा विषय महापालिकेचा आहे आणि या विषयाच्या अजेंड्याला धरून आहे. म्हणून सचिव साहेब, आपण दिलेल्या माझ्या प्रश्नाचे कुठल्या संबंधित खात्यातून उत्तर दिले नाही. त्याचा येथे खुलासा व्हावा. ही पहिल्यांदा माझी मागणी आहे.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य आलेले पत्र सन्मा. मुख्यालाकडे दिलेले आहे. आम्हाला ज्या तारखेला मिळाले त्याच्या दुसऱ्या तारखेला दिलेले आहे. त्याची पोच आमच्या सचिव कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सचिवांनी जे उत्तर दिले तर सचिवांचे काम आहे की, संबंधित खात्याकडून उत्तर मागवून सभागृहांमध्ये संबंधित जो जो प्रश्न आहे त्याला उत्तर दिले पाहिजे. मुख्य कार्यालयाने उत्तर दिले नाही. आपणांस दिले नाही. मला दिले नाही. ही बाब माझी नाही. ही सचिव साहेबांची बाब आहे. सचिवांनी आता येथे मुख्यकार्यालयांच्या उपायुक्तांना सभागृहामध्ये उभे करुन मी दिलेल्या प्रश्नाचे मला उत्तर द्यावे. कारण हा गंभीर विषय आहे. साहेब, माझा जो प्रश्न आहे तो ह्या संबंधित विषयाशी आहे आणि लोकशाहीमध्ये फायद्याच्या मुद्यावर श्रीम. सोनिया गांधी यांना राजीनामा द्यावा लागला आहे. असा हा विषय पुन्हा महापालिकेच्या नगरसेवकांवर ही गदा येउ नये म्हणून माझी आपणाला विनंती आहे की, पहिल्या माझ्या प्रश्नाचा आपण रितसर खुलासा करावा. नंतर या प्रश्नावर पुढे जावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, अनुदानाचा जो विषय विषयपटलावर आहे. आयुक्त साहेब आपल्या प्रशासनाचे आमच्या नगरसेवकांवर काही लक्ष नाही आणि हा जो अनुदानाचा प्रश्न आहे. त्याबाबत एकच मुद्दा घेतला गेला आहे. तर साहेब, अनुदानाकरिता आमचा विरोध राहणार नाही. तत्पुर्वी आपल्याला आम्ही असे विचारू इच्छितो की, आम्ही विचारतो की ह्याच्यामध्ये नियमानुसार आपल्याला अनुदान देता येते की नाही किंवा ह्याच्यामध्ये पुढे नगरसेवकांना खुप अडचणी येतील का नाही? ह्याचा आपण खुलासा करावा.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, शिक्षण अधिकाऱ्यांना पुढे येउन बसण्यची विनंती करावी. शिक्षण अधिकाऱ्यांना समोर येउन बसण्याचा आग्रह करावा. ते खुर्चीच्या पाठून लपून लपून बघत आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, माझ्या मताप्रमाणे स्थायी समितीमध्ये असे ठरले होते की, आपल्या ज्या मराठी माध्यमाच्या शाळा आहेत त्यांनाच अनुदान देण्याचे ठरले होते आणि तेही कसे, आपल्या ज्या २९ शाळांमध्ये जेवढ्या मराठी शाळा आहेत. त्यातुन ज्या मराठी शाळांना आपण अनुदान देणार त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विना डोनेशन, विना अनुदानाने वर्गामध्ये घेतील. अशा अटीवर आपण त्यांना अनुदान द्यायचे असे ठरले होते. मग ह्याच्यामध्ये २१ इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत तर आपल्या मराठी शाळेचे विद्यार्थी इंग्रजी शाळेमध्ये जाणार आहेत का? आपले असे ठरले होते की, फक्त मराठी माध्यमांनाच अनुदान द्यायचे आणि ह्याच्यामध्ये २१ इंग्रजी माध्यम आहे, सार्वजनिक संस्था आहेत. ह्यांना अनुदान देण्याची काय गरज आहे? काही गरज नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, आज आपण अनुदानावा जो विषय आणला आहे त अनुदान देण्यासाठी आपण काय क्रायटेरिया फिक्स केलेली आहे त्याची माहिती अगोदर आम्हाला असावी. दूसरी गोष्ट, ज्या संस्थांना आपण अनुदान देणार आहोत. त्यांचे संचालक कोण आहेत? त्यांच्या नावाची माहिती आम्हाला मिळावी. तसेच ज्या शाळांना आज आपण कित्येक वर्षापासुन अनुदान देत आहोत. त्यांच्या कार्यपद्धतीची व कार्यप्रणालीची माहिती शिक्षण अधिकाऱ्यांकडे आहे की नाही. पहिल्यांदा त्याचा त्यांनी खुलासा करावा आणि माझे पुढचे प्रश्न अजून बाकी आहेत. मला ते प्रश्न मांडायचे आहेत. ह्याकरिता शिक्षण अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगावे की, अनुदान देण्यासाठी त्यांनी काय क्रायटेरीया फिक्स केलेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या पाली येथे शाळा आहे.....

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सन २००५-०६ हे आर्थिक सोडताना शैक्षणिक अनुदान देण्यासंबंधी आपला विषय आलेला आहे. मुळात आपण याविषयामध्ये विषयाचा जो नियम आहे आणि येथे आपण दिलेल्या लोकांनी मागणी केलेली आहे. ह्याच्यामध्ये खुप मोठी गल्लत झालेली आहे. आपण बघून घ्या. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२१) आपण वाचा आणि आपण आपल्या टिपणीमध्येच दिलेले आहे. शाळा कॉलेज इत्यादी संस्थांना, शैक्षणिक संस्थाना हे लक्षात घ्या. शाळा, कॉलेज इत्यादी संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे आणि ह्याच्यामध्ये जवळ जवळ दहा-पंधरा संस्थांची नावे आहेत. त्यांचा शाळेशी कितपत संबंध आहे. ही माहिती आपल्याला आम्हाला द्यावी लागणार आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र नगरपालिका / नगरपरिषद अधिनियम १९६५ चा १६ जर आपण पाहिली तर सध्या लाभपदाबद्दल बरीच चर्चा आहे. ऑफिस ऑफ प्रॉफीट. नगरपालिका अधिनियम १९६२ च्या (१६) चा (ग) जर आपण वाचून पाहिलात तर आपल्याला कळेल कारण, ह्या ज्या अनुदान देणाऱ्या संस्था आहेत किंवा अनुदान घेणाऱ्या संस्था आहेत, त्याच्यामध्ये बरेचसे इथे बसलेले नगरपालिकेचे सदस्य आहेत. म्हणजे लाभपदाचा फायदा त्यांना होईल. श्रीम. सोनिया गांधी आमच्या कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांनी राजीनामा दिला आणि कदाचित जर ह्या बाबतीत ते अडकू शकत असतील तर त्या संबंधी खुप मोठा महत्वाचा विषय आहे. आपण नियम १९६५ चा १६ (ग) आपण बघून घ्या. तर विषय असा आहे की आपण १९४९ चे कलम ६६ चे (२१) आज हा जो विषय आहे या विषयावर आपले बरेचसे नगरसेवक बोलणार नाहीत. त्यांना अडचणीचे होणार आहे. परंतु, मला यात कुठलीही अडचण होणार नाही. वर्तमानपत्रामध्ये सुद्धा याविषयी बातमी आलेली आहे. माझ्या मताप्रमाणे आणि माझ्या माहितीप्रमाणे खिरापत वाटण्याचा प्रकार आहे. आयुक्त साहेब, जनतेच्या प्रामाणिक कदात्यांच्या पैशाचा विनियोग कशा तऱ्हेने व्हायला पाहिजे आणि कशा तऱ्हेने होउ नये. हे होउ नये याप्रकारे मध्ये आजचा हाविषय मांडणार आहे. मा. महासभेने कुठलेही धोरण, या विषयावर महापालिकेचे कुठलेही धोरण अजून ठरले नाही. म्हणजे मुळात धोरण ठरायला पाहिजे. धोरण ठरल्यानंतर मग त्या त्या शाळांना आम्ही कीती अनुदान, कसे द्यायचे, कुठल्या शाळांना द्यायचे किंवा कुठल्या शाळांना अनुदान देउ नये ह्याच्यामध्ये चांगल्या शाळा आहेत. मी मान्य करतो त्यांना मदत मिळणे गरजेचे आहे. आय ॲग्री, पण सरसकट आपल्या ज्या शाळा दिलेल्या आहेत त्या शाळांचा आपण जर पराक्रम पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, ह्यातल्या बहूसंख्य शाळा ह्या अनधिकृत आहेत. कुठल्यातरी चार रूम घेतल्या आहेत आणि त्या चार रूम मध्ये शाळा थाटल्या आहेत. त्या शाळांवर एम. आर. टी. पी. ॲक्ट अंतर्गत, त्या शाळांवर, त्या इमारतींवर आम्ही केसेस केलेल्या आहेत. त्या कोर्टामध्ये पेन्डींग आहे आणि असे असताना त्या शाळांना जेव्हा आम्ही अनुदान देतो तेव्हा त्या शाळेच्या त्या इमारतीच्या अनधिकृतपणावर ते अधिकृत आहेत असे आम्ही शिक्कामोर्तब करतो. हा महत्वाचा विषय आपण लक्षात घ्या. म्हणजे एखादी शाळा अनधिकृत आहे, एखादी इमारत अनधिकृत आहे आणि ती इमारत वाचविण्यासाठी तिथे शाळा झालेल्या आहेत आणि त्या शाळांना आज आपण अनुदान देतो. आपल्या मराठी शाळेची परिस्थिती एवढी काय चांगली नाही. परवाच्या दिवशी स्थायी समितीमध्ये आमचे सन्मा. नगरसेवक केशव घरत ह्यांनी विषय काढला, घोडबंदर शाळेचा. म्हणजे पावसाळ्याच्या अगोदर जर ती शाळा झाली नाही तर आपल्या विद्यार्थ्यांना रस्त्यावर बसण्याची पाळी येईल. असे असताना, आपल्याकडे पैशाची कमतरता असताना किंवा अन्य काही कारणामुळे....

**केशव घरत :-**

चेना येथील शाळा आहे.

**जयंत पाटील :-**

होय, चेना येथील शाळा. तर आपली शाळा सुधरवायची आपल्या विद्यार्थ्यांना वेळेवर पुस्तक मिळत नाहीत. त्यांना वेळेवर कपडे मिळत नाही. असे असताना इतर शाळांना आम्ही अनुदान देतोय, आपल्या शाळेतील सातवी परिक्षा विद्यार्थी पास होतात. मोहन पाटील साहेब, मी आपणांस सांगतोय. त्या विद्यार्थ्यांना इतर शाळेत जाताना त्यांच्याकडून प्रचंड डोनेशन घेतले जाते. त्या शाळांची नावसुद्धा ह्या लिस्टमध्ये आहे. म्हणजे आपण कुठलेही नियम ठरवलेले नाही. आपल्या महापालिकेच्या शाळेतून सातवी नंतर जे विद्यार्थी जातात त्यांना डोनेशन शिवाय कुठेही प्रवेश मिळत नाही. मग ह्या ज्या शाळांना आपण अनुदान देणार आहोत त्या शाळांची ही जबाबदारी त्यांच्याजवळ द्यायला पाहिजे की, आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना तुम्ही तिथे मोफत घेतले पाहिजे आणि कुठल्याही तऱ्हेचा त्यांना त्रास न होता दहावी पर्यंतचे शिक्षण त्यांना चांगल्या तऱ्हेने मिळाले पाहिजे. आपण ही अट टाकणे गरजेचे आहे. मुळात ह्या ज्या शाळा आहेत, ह्या किती वर्षापासून आहेत? आमच्याकडे नावं आलीत आणि आम्ही अनुदान लिहीले, सर्व लिहीले. ठिक आहे. त्याच्यामधला आपला उद्देश वाईट नाही. ह्या शाळेतला विद्यार्थी शिकायला पाहिजे. ह्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना चांगले यश मिळाले पाहिजे अशी आमची भावना आहे. परंतु, ह्या शाळांचे जे ट्रस्टी आहेत त्यांचे ही हे विचार आहेत का? आमचे विचार आहेत. त्यांचे विचार नाही. त्यांना फक्त पैसे मिळणे गरजेचे आहे. तेव्हा त्यांच्यावर आपण काय

नियम ठेवणार आहोत? शाळा किती वर्षापासुन आहे? त्या शाळांचा रिझल्ट काय आहे? त्या शाळांची प्रगती कशी काय आहे आणि त्या शाळा महानगरपालिकेचे रिर्टन फाईल करतात का? त्या शाळा रजिस्टर्ड आहेत का? नियमानुसार आहेत का? त्या शाळेमध्ये आपतकालिन व्यवस्था आहे का? उद्या जर त्या शाळेमध्ये एखादा आग लागण्यासारखा प्रसंग घडला किंवा काही घडले तर त्या विद्यार्थ्यांना बाहेर पडण्यासाठी आपतकालीन व्यवस्था जर नसेल तर अशा शाळांना अनुदान देउन आपण आपले नुकसान करत आहोत असे मला वाटते आणि माझे असे सरळ मत आहे की, १९४९ चे कलम ६६(२१) नुसारच आपण अनुदान द्यावे आणि इतर ज्या संस्था आहेत त्या संस्था ह्या नियमामध्ये बसत नाही असे माझे मत आहे. आपण या संबंधी माहिती द्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी मा. महासभेमध्ये प्रश्न विचारलेला आहे. सचिवांनी मुख्यकार्यालयाकडे......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अगोदर आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. मी मा. महासभेमध्ये प्रश्न विचारलेला आहे. माझा मा. महासभेचा प्रश्न आहे. तीन महिने झाले मला अजून उत्तर मिळलेले नाही आणि आपण हा विषय आज सभेसमोर आणलेला आहे. उद्या कुठल्याही प्रकारची कार्यवाही आमच्यावर येउ नये म्हणून आपण पहिल्यांदा मी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा करा. हा मा. महासभेचा प्रश्न आहे. माझ्या स्वतःच्या अखित्यारीमधला प्रश्न नाही. तीन महिन्यापुर्वी मी हा प्रश्न दिलेला आहे आणि सचिवांनी सांगितले की, मुख्य कार्यालयाकडे हा प्रश्न पाठवलेला आहे. सांगावे मुख्य कार्यालयाने काय उत्तर आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, अगोदर माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले तर बरे होईल.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाचे उत्तर मिळाले तर बरे होईल म्हणजे हा एवढा वाद निर्माण ही होणार नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण २९ शाळा आहेत. त्याच्यामध्ये अंदाजित नउ हजार चारशे एवढी मुले शिकत आहेत. मॅडम, असे असताना आपल्याकडे ९४०० विद्यार्थ्यांसाठी २१० एवढ्या शिक्षकांची गरज आहे. पण आपल्याकडे फक्त १९१ शिक्षिक उपलब्ध आहेत पैकी ४ किंवा ५ शिक्षक हे शिक्षण अधिकाऱ्यांनी आपल्या स्वतःच्या सेवेसाठी सर्व शिक्षण अभियान या नावाखाली त्यांनी आपल्याकडे ठेवले आहेत. असे असताना आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य काय असेल ते आपण समजू शकता आणि त्यांना कुठल्या प्रकारचे शिक्षण किंवा परिक्षेचे वेळेस त्यांना काय भेटत असेल हे शिक्षण अधिकाऱ्यांनी सांगावे. दुसरी गोष्ट अशी की, ह्याच्यामध्ये जेवढ्या शाळांनी अनुदान देण्याचे धोरण निश्चित केलेले आहे. त्याच्यामध्ये माँ भारती विद्यामंदिर ही एक शाळा मॅडम, गेल्या वेळेस मा. महासभेमध्ये आपल्याकडे बोलले होती व निवेदन मी केले होते. काही शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही. मुलांना शौचास जायचे असेल तर तिथे पाण्याची सोय नाही. अशा शाळेला आपण वर्षानुवर्षे अनुदान देत आहोत. तर त्या अनुदानाचा पैसा ती लोक कुठे वापरत आहेत. ह्याचा योग्य वापर होत नाही हे निश्चित आहे. असे असताना देखिल श्री. सुर्यवंशी साहेबांनी तिथे दोन ते तीन वेळा जाउन भेट दिलेली आहे. त्यांच्या स्वतःचा रिपोर्ट आहे का, मुलांकडून फी घेतली जाते. तेवढी फी त्यांनी घेउ नये. शिवाय मुलांना फी ची पावती दिली जात नाही. तर ऑडीट रिपोर्ट कुठून आला? तो रिपोर्ट बोगस असावा असे माझे मत आहे. म्हणून ही माँ भारती शाळा जी आहे त्याचा अनुदान ह्यामधून रद्द करण्यात यावा आणि माझ्या या गोष्टीला अनुसरून, माझ्याकडे चित्रफितची कॅसेट आहे, ती कॅसेट मी सन्मा. सदस्यांना दाखवायची विनंती करेन की, हे बघून आपण निच्छित करावे की, अशा शाळांना आपण जे अनुदान देत आहोत ते योग्या आहे का? श्री. सुर्यवंशी साहेबांनी हे अगोदर निच्छित केले होते का? ते बघितले होते का? की, त्या शाळेला आपण कुठल्या आधारावर अनुदान देत आहोत. वर्षानुवर्षे आपण हा पैसा वाया घालवत आहोत. दुसरी गोष्ट, आपल्याला जर अशाच शाळांना अनुदान द्यायचे असेल त्यापेक्षा आपल्या महानगरपालिकेच्या भरपूर अशा शाळा आहेत. जसे आता सन्मा. सदस्य केशव घरत भाउंनी सांगितले की, तिथे शाळेची गरज आहे किंवा मनपा शाळेची दुरावस्था झालेली आहे. तर तशा शाळांना हे अनुदान फिरवण्यात यावे. अशा संस्थांना अनुदान देण्यात येउ नये. दुसरी गोष्ट अशी आहे की, मॅडम, अशा बराचश्या शाळा आहेत ज्याच्या मध्ये निर्मला निकेतन नावाची जी शाळा आहे त्याच्यामध्ये गेल्यावेळेला आमच्या काँग्रेस पक्षाच्या महिला मेळाव्यामध्ये एक गृहस्थ आहे, श्रीम. अर्चना सिंग ह्यांनी तीस मुले, जी अनाथ आहेत त्यांना शिक्षण आणि त्यांचा सगळा खर्च त्या करित आहेत. त्यांच्या पालन पोषणाचा खर्च करत आहे. तर अशा तीस मुलांना निर्मला निकेतन सारख्या शाळेमध्ये किंवा आणखीन दुसऱ्या ज्या शाळा आहेत, निर्मला निकेतनने

तर असे सांगितले आहे की, त्या तीस मुलांना त्यांनी मोफत ॲडमीशन आणि मोफत शिक्षण हे त्यांना त्यादिवशी जाहिर केलेले आहे. असे असताना आणि दुसरी गोष्ट सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काकांनी) ह्यांनी नविन धोरण निश्चित केलेले आहे. पहिले ते दहावी पर्यंत फक्त शंभर रूपये फी मध्ये डोनेशन न घेता. तर अशा शाळांना जे छोटे आहेत आणि ज्यांना खरोखरच गरज आहे आणि जे समाजासाठी सामाजिक बांधीलकी म्हणून काय करू इच्छितात तर अशा शाळांना अनुदान देण्यात यावे व जे फाजील शाळा आहेत त्यांचे अनुदान रद्द करण्यात यावे असा मी ठराव मांडते.

**परशुराम पाटील :-**

अनुदानाबाबत असे आहे की, प्रशासनाने कोणाला अनुदान द्यायचे किंवा नाही ती प्रशासनाची बाब आहे. तर आपण हूकूमशाही करून चालणार नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये जेष्ठ सदस्य जयंत पाटील ह्यांनी आपले शिक्षणाच्या बाबत विचार प्रकट केले होते. सन्मा. सदस्य जयंतदादा पाटील आपण नक्कीच एखाद्या संस्थेला अनुदान देण्याकरिता.......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेते साहेब, पहिल्यांदा माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळू द्या. ह्या सभागृहाने माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. ह्या विषयाशी संबंधित तो विषय आहे. सभागृह नेते साहेब या सभागृहाच्या नगरसेवकाने या विषयासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्याची भावना आपण समजून घ्या. आपण सभागृह नेते आहात.

**हॅरल बोर्जीस :-**

अगर सभागृह मे आपको बोलनेकी अनुमती है तो मुझे भी मा. महापौर मॅडमने बोलनेकी अनुमती दी है। अगर आप बोल सकते हो तो मै भी बोल सकता हूँ।

**रोहीदास पाटील :-**

आपण सभागृह नेते आहात. दुसरे कोण असते तर गोष्ट वेगळी असती. आपण सन्मा. सदस्यांना बोलायला द्या. त्यांना उत्तर देउ द्या ना. आपल्याला संध्याकाळ घालवायची नाही फक्त पाच मिनिटे लागणार.

**रतन पाटील :-**

आपल्याला घाई कुठे आहे? पुर्ण संध्याकाळ दिवसभर घालवायची आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला अनुदान कोणाला द्यायचे किंवा नाही. हा जरी शासनाचा विषय असला तरी सामाजिक बांधिलकी सुद्धा काय आहे. सुनामी सारखे प्रसंगावधान दाखवून त्या माणसाने मुलांकडून पैसे उकळले आहे आणि त्याच्यानंतर त्याने त्या पैशांचा वापर स्वतःच्या कामासाठी केलेला आहे. त्याने कुठे सुनामीग्रस्तांना पैसे पोहचविलेले नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, माझे मित्र सन्मा. जयंत पाटील ह्यांनी पुष्कळ सांगितले की, आपल्या महापालिकेच्या शाळेत मुलांना कपडे दिले जात नाहीत, वह्या पुस्तके दिली जात नाही. पण इथे तर एकदम विचित्र परिस्थिती आहे. मी दोन ते तीन वेळा शाळा दुरूस्तीचे ॲप्लीकेशन देउन सुद्धा अजून पर्यंत शाळा दुरूस्त झाली नाही. त्या शाळांचे कौल वगैरे फुटलेले आहे. तिथे गंभीर परिस्थिती अशी आहे की, ती मुलं तिथे आता पावसाळ्यात बसणार नाही व ह्याच्यापेक्षाही गंभीर परिस्थिती अशी आहे की, त्या मुलांचे रजिस्ट्रेशनमध्ये जातीचा उल्लेख नाही आणि १९/०१/२००२, २४/०१/२००२, १९/०१/२००४ रोजी विस्तार अधिकाऱ्यांनी त्याच्यावर शेरा मारलेला आहे की, येथे जातीचा उल्लेख नाही. एक मुलगा माझ्याकडे तो स्कुल लिव्हींग घेण्यासाठी शाळेमध्ये गेला होता तो मुलगा माझ्याकडे आला की, मी जेव्हा स्कुल लिव्हींग घ्यायला गेलो त्याच्यामध्ये जातीचा उल्लेख नाही तर मी आता काय करावे. ह्यावर मी शिक्षण अधिकाऱ्यांना भेटलो व त्यांनी आता सांगितले की, लपलेले आहेत, मा. महापौरांची खुर्ची अगदी बाजूला सारुन त्यांनी आता आपला मुखडा दाखवला. त्यांना मी दोन ते तीन वेळा भेटलो ह्या व्यक्तीने मला सांगितले की, आम्ही तिथे रजिस्ट्रेशनची नोंद करतो. जी बाई तिथे होती श्रीम. सुचित्रा काशीनाथ पाटील तिला आता कुठेतरी शिफ्ट केले. ह्या बाईच्या कारर्कीदीतल्या ह्या नोंदी आहेत आणि परत आता तिला शिफ्ट केले मी, ह्यांना सांगितले ह्याची इनक्वॉयरी करा. परंतु, मी चौकशी केली असता हे साहेब तिथे पोहचले सुद्धा नाही. आता या मुलांच्या भवितव्याचे काय? त्याचा रजिस्टर नंबर १३०४-१३२५ असा आहे. ही मुल आहेत आणखीन १२२७ ते १२७४ म्हणजे हे रजिस्टरमध्ये नोंद केलेले नंबर आहेत. ह्या मुलांच्या भविष्याचे काय? त्यांच्या स्कुल लिव्हींगमध्ये जातिचा उल्लेख नसल्यामुळे ती मुले मागासवर्गीयाच्या सवलती घ्यायला पोरकी झालेली आहेत. मला शिक्षण अधिकाऱ्यांनी याबाबत उत्तर द्यावे, खुलासा करावा. मॅडम, ही गंभीर बाब आहे याबाबत शिक्षण अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, ज्यावेळेला सन्मा. सदस्य मला भेटले आणि माझ्या निदर्शनात जी गोष्ट आणून दिली त्यावेळेस जी शिक्षिका होती तिला तत्कालीन लेखी पत्र काढले आणि

तिच्याकडून मंगळवारी ते जी.आर. पूर्ण करून घेतले आणि बुधवारी त्यांनी माझ्याकडे रिपोर्ट दिलेला आहे. ज्यावेळी जी. आर. रजिस्टरमध्ये जातीच्या कॉलममध्ये जात नमुद करावी लागते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, मी जातीचे सर्टीफिकेट मागितलेले होते ते त्यांच्या कडून उपलब्ध झाले नव्हते म्हणून अनावधानाने ते राहून गेले. त्यावर मी त्यांना सांगितले की, आपली जी स्लीप असते प्रवेश फॉर्म भरताना ती स्लीप त्यांच्याकडून भरून घ्या आणि त्यात त्यांनी जी जात स्लीपमध्ये भरली त्याप्रमाणे जी. आर रजिस्टरमध्ये नोंदणी करून घ्या. अशापद्धतीने सांगण्यात आले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठला पालक ॲडमिशन घेताना जातीचे सर्टीफिकेट ॲडमीट करतो?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्यांची अशी धारणा होती की, जातीचे सर्टीफिकेट असल्याशिवाय लिहायचे नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असे कुठल्याच शाळेत नाही. आपण चुकीचे सांगता की तिथे सर्टीफिकेट द्यावे लागते.

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मी असे म्हटले की, जातीचे सर्टीफिकेट आणून दिल्या नसल्यामुळे नोंद केली नव्हती. त्यावर मी त्यांना सांगितले की, स्लीप भरून घ्या आणि स्लीप प्रमाणे त्यांनी मंगळवारी नोंदी करुन घेतल्या आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण फक्त नोंद करायची असते. जातीचे सर्टीफिकेट तहसिलदार देतात. आपण फक्त नोंद करायची असते. ती नोंद का झाली नाही?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्या शिक्षिकेचा असा समज होता त्यामुळे मी त्यांना सांगितले आपण स्लीप त्यांच्याकडून भरून तशी नोंद करून घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जातीचा कॉलम मोकळा का राहीला?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

ते भरून घेतले. मंगळवारी पूर्ण करून घेतले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ज्यांनी हे काम केले त्यांना तुम्ही काय पनीशमेंन्ट केले? कोणते पत्र काढले का? ह्या मुलाच्या भविष्याचे काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या अति महत्वाच्या विषयाला खास सभा बोलावलेली आहे. आपल्या उपविधिच्या नियम ८ प्रमाणे त्या महिन्याच्या प्रथम सभेला उत्तर दिले पाहिजे. तीन महिने झाले तरी उत्तर दिलेले नाही आणि आज हा विषय मा. महासभेमध्ये आलेला आहे. मुख्य कार्यालयाच्या उपआयुक्त साहेबांना पत्र दिलेले आहे असे सचिवांनी सांगितले आहे. तर सचिव साहेब त्यांच्याकडून तुम्ही उत्तर घ्या आणि ह्या सभागृहात माहिती द्या. अन्यथा आपण आमच्या अधिकाऱ्याचा दुरूपयोग केला आहे त्याबद्दल आम्ही कोर्टात जाउ आणि ह्या विषयी मा. महासभेत प्रश्न विचारल्या शिवाय आणि मा. महासभेत विषय आणून जबरदस्तीने केलेले आहे. हा विषय होणार नाही म्हणून या विषयाच्या संदर्भामध्ये विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर पहिल्यांदा आयुक्त साहेबांनी किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तर दिले पाहिजे. मा. महापौर मॅडम, ज्या प्रश्नाचे उत्तर विचारले त्या प्रश्नाचे उत्तर पहिल्यांदा दिले पाहिजे नाहीतर आम्ही कोर्टात जाउ.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देखिल अजूनपर्यंत देण्यात आलेले नाही.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर महोदया, जर एक सन्मा. सदस्य तुमच्याकडे नीटनेटका प्रश्न विचारतोय. सभागृह नेते हॅरल बोर्जिस आपल्या सभागृहाचे नेते आहेत. तुम्ही पुन्हा पुन्हा मध्ये मध्ये इशारा करता ते ऐकुन घ्या. ते काय बोलतात. प्रशासन आणि सगळ्यांच्या हिताचा तो विषय आहे. ते काय चुकीचा प्रश्न विचारत नाही. हा पॉलिटिकल विषय नाही. त्यांनी माहिती विचारली आहे. त्यांनी तीन महिन्यापुर्वी पत्र दिलेले आहे त्याचे उत्तर मिळालेले नाही. त्याच्यात अनेक नगरसेवक बाधित होतील की, नाही. ते विचारले आहे. धोरण विचारले आहे. त्याचे उत्तर मिळत नाही आणि अशा पद्धतीने जर तुम्हाला वाटत असेल की, आम्ही बोलाल्यावर कामकाज चालते तर ते योग्य नाही. मग आम्हाला काय बोलायचे आहे ते आम्ही एका मिनिटात बोलू व मोकळे होउ. मला असे वाटते की, या विषयामध्ये मा. महापौर, तुमचे सचिवांचे आम्हाला पत्र मिळाले. शुद्धीपत्रक मिळाले. ह्या शुद्धीपत्रकाचा काही उलघडा होत नाही. तुमचा हेतु काय आहे? आपण कुठे अडकल्या होत्या आणि त्याच्यासाठी शुद्धीपत्रक दिले. संस्थांना शैक्षणिक अनुदान ह्यातली व्याख्या आमच्या लक्षात येत नाही. तुमच्या लक्षात आली असेल तर ठीक आहे. पण तरीसुद्धा हे जे अनुदान आपण एक कोटी रूपयाचे अनुदान केले ते

अनुदान आपण झोपेत केले नाही. ह्याच सभागृहातल्या सर्व नगरसेवकांनी वर बसलेल्या डायसवरील सर्व अधिकाऱ्यांनी एखाद दुसरा वाढला असेल. तुम्हीच महापौर, आयुक्त नव्हते आणि सन २००५ च्या फेब्रुवारी महिन्यामध्ये आपण हा अर्थसंकल्प मंजुर केला त्यावेळी आपण शैक्षणिक अनुदान म्हणून एक कोटी रूपयाची तरतुद केली व आज शेवटचा दिवस आहे. म्हणजे संध्याकाळ होते दिवा विझवायचा की, वर्ष संपले आणि त्या दिवशी आपण ही खास सभा बोलावली. तुमच्या हेतूबद्दल आम्हाला संशय येत आहे. ही सभा कशासाठी आणि ह्या म्हणून आम्ही बोलतोय की, जे शैक्षणिक अनुदान आहे. शैक्षणिक संस्थांना मदत करणे इथपर्यंत ठिक आहे. तुमचा हेतु काय? प्रशासनाचे धोरण काय? ह्याच्यातले कोणतेही नाही. सन्मा. सदस्य तुमच्याकडे पुन्हा पुन्हा माहिती मागतात की, अनुदान हे कसे वाटप होणार आहे? काय आहे? आमच्या डोक्याला जोर देत आमची जी माहिती आहे ती साधारण अशी असायला पाहिजे होती की, ज्यावेळी हे अनुदान मंजुर झाले. तरतुद झाली. एप्रिल महिन्यामध्ये, मे महिन्यामध्ये, जुन महिन्यामध्ये आयुक्त साहेबांनी त्याचे नोटिफिकेशन काढायला पाहिजे. एक नोटिस लावायला पाहिजे होती की, सन २००५-०६ च्या आर्थिक वर्षात शैक्षणिक अनुदान म्हणून तरतुद केल्यानुसार एक कोटी रूपयाचे अनुदान वाटप करणे आहे आणि त्यासाठी ह्या ह्या कॅटेगरीमध्ये ही लोक अर्ज करू शकतात. मुदत १५ दिवस, महिना, दक्ष अधिकारी अमुक अमुक ह्यांना भेटावे. त्यांच्याकडून माहिती घ्यावी, फॉरमॅट घ्यावे व त्यात कोणती संस्था अर्ज करू शकत नाही हे क्लिअर झाले असते. पण आजपर्यंत आयुक्त साहेब, तुम्ही तसे केलेले नाही. मा. महापौर मॅडम, आपण ही केलेले नाही. आपण शिक्षिका आहात म्हणून तुमचा आम्हाला आदर आहे. पण आपण शिक्षिका असताना या शैक्षणिक वर्षाच्या अनुदानाचा पुर्ण वर्ष गेला तरी त्याचा विनियोग करू शकला नाहीत. म्हणून मी असा ठराव मांडत आहे की, फेब्रुवारी २००५ मध्ये सन २००५-०६ सालासाठी अर्थसंकल्प सादर करतेवेळी शैक्षणिक संस्थांना अनुदान देण्यासाठी एक कोटी रूपयाची तरतुद करण्यात आली होती.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, आमचा हरकतीचा मुद्दा आहे.

**रोहीदास पाटील :-**

वर्षभर या विषयावर सत्ताधारी पक्षाने कोणताही विचार केला नाही व धोरण निश्चित केले नाही. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये प्रशासनाने काही केलेले नाही.

**लिओ कोलासो :-**

आमचा हरकतीचा मुद्दा आहे की, अजून सभागृहामध्ये ठराव मांडलेला नाही आणि विरोधी पक्षनेते ठराव मांडता ही सभा कामकाजाची कोणती पद्धत नाही.

**रतन पाटील :-**

असे नाही की, तुम्हीच ठराव मांडला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

असे नाही. सभागृह नेते ठराव मांडतील मग आपण त्या ठरावामध्ये आपली दुरूस्ती मांडा ना.

**रोहीदास पाटील :-**

आयुक्त साहेबांनी नोटीफिकेशन देउन नियमानुसार निविदा मागवायला पाहिजे होत्या. ते त्यांनी मागवल नाही आणि आज दि. ३१/०३/०६ रोजी हा ठराव आणून सत्ताधारी पक्ष आपल्या संबंधित, हीतसंबंधितांना एक कोटी रूपयाचे बेकायदेशीर वाटप करण्याचा प्रयत्न करत आहे व आज हे प्रशासन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष त्यांना पाठिंबा देत आहे. या पूर्वी महापालिकेने कोणतेही शैक्षणिक अनुदान दिले नाही. त्यामुळे सन २००५-०६ साली अर्थसंकल्पात केलेली एक कोटी रूपयाची तरतुद.......

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहीदास (काका) पाटील हे ठराव वाचत असताना अतिशय प्रशासनाला त्याच्यामध्ये घोळण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनाचा स्वच्छ हेतू होता आणि आपण प्रदेश दौऱ्यावर जावे या करिता आजची सभा बोलावण्यात आली. अन्यथा आपला प्रदेश दौरा पंधरा दिवस पुढे गेला असता.

**रोहीदास पाटील :-**

आज महापालिका करतील अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा दुर्लक्षित आहे. त्यांच्या विकासासाठीच हा पैसा वापरावा व पुढील वर्षासाठी वाटपाचे धोरण ठरवावे असा ठराव आम्ही मांडत आहोत. सुचक रोहीदास पाटील व अनुमोदक ओमप्रकाश अग्रवाल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ८५ सन २००५-०६ या वर्षात शैक्षणिक व सामाजिक धार्मिक संस्थांना अनुदान देणेबाबत. मा. स्थायी समितीने शिफारस केलेला ठराव मा. स्थायी समिती ठराव क्र. ९० मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक / धार्मिक संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थोर्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्रीडा इत्यादी उपक्रमाव्दारे समाजास

सेवा सातत्याने देउन समाजउपयोगी कार्यक्रम राबवित आहेत. मिरा भाईदर महापालिका सन २००५-०६ या वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये लेखाशीर्ष अंशदाने या लेखाशिर्षकानुसार रक्कम रूपये एक कोटी अनुदानाची तरतुद करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर क्षेत्रातील संस्थांना त्यांनी दिलेल्या सेवेबाबत प्रोत्साहन देण्यासाठी मिरा भाईंदर महपलिकेमार्फत सानुग्रह अनुदान खालिल संस्थांना देण्यास आजची ही सभा मंजुरी देत आहे. संस्थेचे नाव (१) अमरदीप शिक्षण संस्था, भाईंदर (प) रू. २,७५,०००/- (२) एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट, भाईदर (पू) रू. ५०,०००/-

**रोहीदास पाटील :-**

ठराव मंजुर की तुमचा ठराव....

**मिलन म्हात्रे :-**

त्या संस्थेच्या मालकांची नावे ही द्या. शैक्षणिक संस्थेच्या मालकांची नावे देखील ठरावात येउ द्या.

**रोहीदास पाटील :-**

पहिल्यांदा धोरण ठरवीण्यात यावे.

(सभागृहनेते ह्यांनी शैक्षणिक संस्थांचे अनुदानासह सभागृहासमोर वाचन केले.)

**रोहीत सुर्वणा :-**

संस्थेचे संस्थापक कोण आहेत त्यांची नावे पाहिजेत.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, ज्या संस्थेला आपण अनुदान देत आहोत त्या संस्थेचे संस्थापक कोण आहेत?

(सभागृहात गोंधळ.)

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांचे नाव वाचा.

**रतन पाटील :-**

या महापालिकेची लूट चालली आहे. जनतेच्या पैशांचा हा कसा वापर आहे.

**रोहीत सुर्वणा :-**

या संस्थेचे संस्थापक कोण आहेत? नाव वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

नाव वाचा हिम्मत असेल तर नाव वाचा. सगळ्यांची नावे वाचा.

**रोहीत सुर्वणा :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांचे नाव वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव पास करताना तेवढी देखील हिम्मत ठेवा. सर्व नगरसेवकांची नावे वाचा.

**रोहीत सुर्वणा :-**

नाव वाचा. संस्थेचे संस्थापक कोण आहेत त्यांचे नाव वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव पास केले म्हणजे सर्व झाले का? आपली हिम्मत असेल तर सगळ्यांनी नावे वाचून घ्या.

**रोहीत सुर्वणा :-**

सगळ्या संस्थापकांची नावे वाचा.

**शुभांगी नाईक :-**

संस्थापकांची नावे वाचा. अनुदान कोणाकोणाला देता आहेत आम्हाला संस्थापकांची नावे द्या.

**मिलन म्हात्रे :-**

लाखो रूपयांची खिरापत वाटायला घेतली आहे.

**रोहीत सुर्वणा :-**

हा पब्लिकचा पैसा आहे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण पहिल्यांदा धोरण ठरवा.

**रतन पाटील :-**

ही सर्व लूट चालली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाला आमचा विरोध आहे.

**रोहीदास पाटील :-**

पहिले धोरण ठरले पाहिजे. धोरण ठरवा आणि त्यांची सगळी नाव घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

सामान्य नागरिक कष्ट करून आपला पैसा उभा करतो आणि आपल्या महापालिकेचे कर भरतो आणि तो पैसा आपण लूटतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृह नेत्यांनी ठरावाबरोबर नाव वाचावी. नाहीतर आम्ही नाव वाचू, आमच्याकडे माहिती आहे. प्रशासनाला तुम्हाला पण दिलेली नाही आणि स्थायी समितीलाही दिलेली नाही हे आपण लक्षात घ्या. कुठल्याही संस्थेचे नुसते नाव वाचू नका त्या संस्थेच्या संस्थापकांची व मालकांची नावे वाचा.

**रतन पाटील :-**

सभागृह नेते ज्यावेळी ठराव होता त्यावेळी काय ठरले होते ते सांगा. काय ठरले होते, अनुदान शैक्षणिक मंडळांना द्यायचे व शैक्षणिक संस्थांना द्यायचे असे ठरले होते.

**हॅरल बोर्जीस :-**

वरीलप्रमाणे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्था तसेच, शाळांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी धोरण निच्छित करणे कामी आजच्या मा. महासभेपुढे विषय होता व मा. महासभेने ही जी नावाची यादी मा. महापौर मॅडम, आपल्या सभागृहामध्ये शिफारस केलेली आहे. सभागृहाच्या वतीने मी आयुक्त महाशयांना सांगू इच्छितो की, वरील सर्व संस्थांना शैक्षणिक अनुदान देणेबाबत सर्व प्रशासकीय बाबी मा. आयुक्तांनी पडताळून वरील दिलेल्या सर्व संस्थांना अनुदान देण्याबाबत आजच्या मा. महासभेपुढे ठराव मांडत आहे आणि तशाप्रकारचे सर्व अधिकार मा. प्रशासनाला म्हणजे मा. आयुक्तांना देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, येथे अधिकार द्यायचा प्रश्न येतच नाही. हे अधिकार घेउन आले आहेत.

**शुभांगी नाईक :-**

ह्या गोष्टीला आमचा विरोध आहे. आपण ठराव मांडा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडला त्याच्यात दोन तीन शाळा समाविष्ट करून घेण्यात यावे. न्यु कॅब्रिक हायस्कुल, कस्तुरी पार्क ३,००,०००/- हेमलता पाठक एज्युकेशन ट्रस्ट, नवघर रोड ३,००,०००/- व अव्हर लेडी ऑफ फातीमा हायस्कूल, मिरा रोड ३,००,०००/- ह्या शाळांचा देखील समावेश करून घेण्यात यावा.

**रतन पाटील :-**

शाळेत जाणाऱ्या मुलांकडे बघा, त्या मुलांच्या पायात चपला नसतात. शिक्षणाचा दर्जा बघा आपल्याला जर आपल्या शिक्षणाचा दर्जा सुधरवायचा असेल तर त्या शाळा सुधरवायला पाहिजे. जे पब्लिक ट्रस्ट आहे त्या पब्लिक ट्रस्टचा विचार करावा.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण या शाळांचा समावेश करणार अशी आपण रूलिंग द्या.

**मा. महापौर :-**

ह्या शाळांचा समावेश करण्यात येईल.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की माझी एक सूचना आहे. याठिकाणी अनुदान देणेबाबतचा जो विषय आणलेला आहे सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील अनुदान संस्थांना देण्याचा जो विषय आहे ही आनंदाची बाब आहे की, ज्या शाळांना आपण अनुदान देतो आणि शैक्षणिक शाळेला मिरा भाईंदर मध्ये उत्तेजन देण्याचा कार्यक्रम या ठिकाणी राबविलेला आहे. त्याबद्दल तुमचे अभिनंदन. परंतु, हे अनुदान देतेवेळी आज आपण जो उदात्त हेतु ठेवला आहे, त्या विषयाच्या अनुषंगाने आपले जे धोरण आहे ते चांगले आहे. परंतु, हा विषय स्थायी समितीमध्ये दि. ३०/०७/०५ रोजी झाला. त्यानंतर आठ महिने झाले. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी हा विषय आणणे ही बाब संशयास्पद निर्माण झालेली आहे आणि असे होता कामा नये. तसेच, मा. महापौर याठिकाणी जो गोषवारा आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. त्यामध्ये प्रशासनाचे मत जे काही आहे ते त्यांनी ह्या ठिकाणी स्पष्ट केलेले नाही. ते मत स्पष्ट होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे याठिकाणी ज्या कलमाचा आधार घेतलेला आहे. ६६(२१) कलम त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, कलम ६३ खंड १५ मध्ये उल्लेख केलेल्या उदिष्ट्या व्यतिरिक्त मा. शैक्षणिक उदिष्ट्य पार पाडणे व शहरातील किंवा शहराबाहेरील शैक्षणिक संस्थांना अनुदान देणे. त्यात ६३ खंड १५ मध्ये प्राथमिक शिक्षणासाठी शाळा चालवणे व त्यांना मदत देणे व त्यांच्यासाठी योग्य जागेची व्यवस्था करणे असे असताना देखिल या ठिकाणी शासन देखील मराठी माध्यमांनाच अनुदान देते. परंतु, याठिकाणी अनुदान देताना मराठी माध्यमांना झुकतं माप देणे

फार गरजेचे आहे आणि ह्या अनुशंगाने याठिकाणी विचार व्हावा. मिरा भाईंदर नगरपालिकेला शाळेमधून सातवी पास होउन मुले आठवीत जातात. ती सर्व मुले मराठी माध्यम, गुजराती माध्यम आणि हिंदी माध्यम मधील आहेत आणि त्या मुलांना भाईंदर सेकंडरी स्कुल राजेशिवाजी विद्यालय, नित्यानंद ज्ञान प्रबोधिनी, अभिनव असे आपल्या मराठी माध्यमांच्या ज्या शाळा आहेत ह्या शाळा नेहमी त्या मुलांना सामावून घेतात आणि महापालिकेचे जे काही उपक्रम असतात त्या उपक्रमामध्ये ज्या शाळा सहभाग घेतात त्याच शाळांना अनुदान देण्याचा विचार या ठिकाणी व्हावा आणि ज्या शाळा प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांकडून हजारो रूपये डोनेशन आणि लाखो रूपये वर्षाला डोनेशन जमा करतात. त्या शाळांना आपण याठिकाणी अनुदान देउन त्यांना फार मोठा आर्थिक दृष्ट्या गब्बर करतो असे या ठिकाणी दिसुन येते. आपण ज्यावेळी शिक्षण क्षेत्रात कामगिरी करणारे जूने कर्मविर होउन गेले. कर्मविर भाउराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रिबाई फुले ह्यांनी लोकांकडून वर्गणी घेउन शाळा उभ्या केल्या आणि खऱ्यापद्धतीने त्यांनी शैक्षणिक संस्था आणि शाळा चालवल्या. परंतु, आता जे शिक्षण सम्राट झालेले आहेत व जे ए.सी. च्या गाड्यांमधून फिरतात. त्यांचे ऑफिस देखिल ए.सी. चे आहे आणि अशा शाळांना आपण अनुदान देतो. त्यामुळे मी याठिकाणी सांगतो की, इंग्रजी माध्यमांना अनुदान देण्यापेक्षा मराठी माध्यमांना अनुदान देउन नियमाप्रमाणे ज्या शाळा आहेत. प्राथमिक शाळेतून, प्राथमिक शाळांना उत्तेजन देणार. ह्या शाळा फक्त शैक्षणिक स्त्रोत आहेत. कोणत्याही मंडळांना अनुदान देऊ नये. जे धार्मिक संस्था, मंडळे आहेत त्यांना अनुदान देणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन करण्यासारखे आहे. त्यामुळे ह्या सर्व गोष्टीचा विचार व्हावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, शहरामध्ये जर एखादी संस्था इंग्रजी माध्यमाकरिता काम करत असेल तर त्यात चुकीची गोष्ट काही नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य बोलत आहेत त्यांना कृपया बोलू द्या नंतर सभागृह नेत्यांनी बोलावे.

**प्रकाश दुबोले :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील (दादा) ह्यांनी जो मुद्दा मांडला आहे ह्या गोष्टीचा देखील विचार व्हावा अशी मी सुचना मांडतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मेरी एक सुचना है की, २६ नंबर कॉलम मे गुजराथी समाज, मिरा भाईंदर लिखा है। उसमे गुजराथी सेवा संघ किया जाए। क्योंकि, गुजरात के हर जाती के लोग उस संघ मे आ सकते है। वहाँ सिर्फ गुजराथी समाज लिखा है, वहा गुजराथी संघ किया जाए। दुसरा, सिनिअर सिटीजन का अनुदान बढाया जाए, क्योंकि हमारे सन्मा. सदस्य खान साहब है, मा. महापौर मॅडम है, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेब है, सन्मा. सदस्य आसिफ पटेल साहब जब सिनिअर सिटीजन के कार्यक्रम मे जाते है तब आप बडी बडी बाते करके आते है। सिनिअर सिटीजन के लिए इसमे जो किया है, वह बराबर उपलब्ध नही किया है।

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, आपण ज्या ज्या शाळांचा उल्लेख केलेला आहे व ज्यांना आपण अनुदान पास केलेले आहे, त्याच्यामध्ये महानगरपालिकेचा कोटा किती राहणार ह्याचा खुलासा व्हावा. कारण बऱ्याच अशा शाळा आहेत, ज्यांना आपण अनुदान देतो. पण ज्या वेळेस नगरसेवक आपल्या महानगरपालिकेचे नगरसेवक जेव्हा एक पत्र त्या शाळेस पाठवतात तर त्या वेळेला त्या नगरसेवकांचे पत्र धुडकावले जाते व त्या पत्राचा काही मानसन्मान होत नाही आणि मुलांना भरमसाठ डोनेशन घेऊन ॲडमिशन दिले जाते. डोनेशनशिवाय ॲडमिशन दिले जात नाही. त्याच्यासाठी महानगरपालिकेला किती कोटा हे लोक उपलब्ध करुन देणार आहेत त्याचा खुलासा व्हावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, दोन ठराव आलेले आहेत. त्या ठरावांवर कार्यवाही होऊ द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर मे काफी स्कुल ऐसी है की, जिसने लोनपर स्कुल किया हुआ है। उसके स्कुल को सिल लगाया है। ऐसे स्कुलको भी समावेश किया जाए। मिरा भाईंदर मे ऐसी काफी स्कुल है की, लोन पे मकान लेकर स्कुल खोला गया है वहा बच्चे है और वहा बॅंकवाले आकर उस संकुल को सिल मारते है। आठ-आठ दिन तक स्कुल बंद करता है। उसके लिए भी कुछ अनुदान दिया जाए। ऐसी काफी स्कुल है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याकडे दोन्ही ठराव आलेले आहेत. आपल्यासमोर ठराव मांडलेला आहे.

**केशव घरत :-**

मॅडम, चेना येथील शाळा पाडून आज दोन महिने झाले. चेनाची शाळा पाडून तिथे नविन इमारत बांधण्यासाठी आज दोन महिने झाले. परंतु, तिथे काम सुरु झालेले नाही. येत्या पवसाळ्यापर्यंत जर शाळा पुर्ण झाली नाही, तर विद्यार्थ्यांची बसण्याची व्यवस्था होणार नाही. कारण तात्पुरती व्यवस्था श्री. वेलकर शेठ ह्यांनी केलेली आहे आणि जर मुलांना पावसाळ्यात बसण्याची पाळी आली तर त्याची संपूर्ण जबाबदारी ही प्रशासनावर राहील.

**रतन पाटील :-**

आपण सर्व विद्यार्थी महापालिकेच्या आवारात आणून बसवू. आम्ही आपल्या जोडीला आहोत.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझा दुसरा प्रश्न आहे की, राजे शिवाजी विद्यालयाने दोन वर्गाची मागणी केलेली आहे. सध्या बसण्यासाठी जागा नाही. शाळेकडे पैसे नाही की, त्यांनी आणखीन वर्ग बांधावे. जर आम्हांला ते दोन वर्ग जुनपर्यंत म्हणजे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करुन मिळावेत अशी मी आपणांस विनंती करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण आपल्या सत्ताधारी नगरसेवकांची व्यथा ऐकून घ्या आणि आपण एक कोटी रुपयाचे अनुदान वाटत आहोत ही शरमेची बाब आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आपण ज्या संस्थांना अनुदान देत आहोत त्यांचे संस्थापक कोण आहेत ते सांगण्यात यावे.

**केशव घरत :-**

मॅडम, माझ्या प्रश्नावर रुलिंग द्या.

**मिलन पाटील :-**

मॅडम, सन्मा. सदस्य केशव घरत ह्यांनी विचारलेल्या प्रश्नावर आपण रुलिंग द्या.

**केशव घरत :-**

शाळा पूर्ण होईल की, नाही? मला स्थायी समितीमध्ये असे सांगण्यात आले की, शाळा पूर्ण होईल.

**शुभांगी नाईक :-**

एकीकडे आपण अनुदान देत आहोत आणि एकीकडे आपल्या शाळा रिपेअरिंग होत आहेत. ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपण अनुदान देत आहात आणि महापालिकेची शाळेच्या परिस्थिती आपण काय बघता? एक कोटी रुपये आपण देतोय. महापालिकेचे नगरसेवक......

**शुभांगी नाईक :-**

महापालिकेची शाळा दुरुस्तीला चालली आहे. ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे आणि एकीकडे आपण अनुदान देत आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपण ह्याचा विचार करा. घरातली लोकं अशीच आहेत आणि आपण बाहेरच्या लोकांना अनुदान देतो.

**केशव घरत :-**

मॅडम, माझ्या प्रश्नावर रुलिंग द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, ठराव आलेला आहे आणि ठरावावर आपण मतदान करावे नंतर सन्मा. सदस्यांना रुलिंग द्यावे.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी, मी बोलत आहे ना. मला माझ्या प्रश्नावर रुलिंग येऊ द्या. आपण बोलत असतांना आम्ही बोलत नाही ना. मा. महापौर मॅडम ह्यांना माझ्या प्रश्नाचे उत्तर तर देऊ द्या.

**मा. महापौर :-**

चेना येथील सुरु असलेल्या शाळेचे बांधकाम लवकरात लवकर पावसाळ्याच्या अगोदर पूर्ण करुन घेण्यांत यावे. तसेच, राजे शिवाजी विद्यालयाला आवश्यक असलेले वर्ग दोन खोल्या लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

**केशव घरत :-**

मॅडम, शाळा पुर्ण होईल असे प्रशासनाचे आश्वासन आहे. दोन महिने राहिले आहे, तर दोन महिन्यात शाळा पुर्ण होईल का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, एक कोटी रुपये महापालिकेची असलेली सेवा हे आकडे धरले जाणार नाही. आपण पहिले काम सुरु करा. आपले एक कोटी रुपये त्याच्यात इन्व्हेस्टमेंट करा.

**केशव घरत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, ज्या ठेकेदाराने दोन महिन्यात काही केले नाही तो ह्या दोन महिन्यात शाळा बांधेल का?

**मा. महापौर :-**

चेना गावातील जी शाळा आहे. त्या शाळेचे काम ज्या ठेकेदारला दिलेले आहे त्याच्यावर बांधकाम विभागाने पाहणी करुन दोन महिन्यात बाहेरील काम पुर्ण होईल आणि मुलांची बसण्याची व्यवस्था होईल असे बांधकाम विभागाने पुर्ण माहिती काढून आणि ह्या शाळेचे बाहेरील काम दोन महिन्यात पुर्ण होईल अशा प्रकारे ती माहिती त्या ठेकेदाराकडून मागवून घ्या आणि सदरचे काम स्वतःच्या निदर्शनाखाली पाहणी खाली पुर्ण करावे.

**केशव घरत :-**

जर ते काम झाले नाही तर प्रशासनाने विद्यार्थ्यांची बसण्याची व्यवस्था करावी.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, आत्ता सन्मा. सदस्य श्री. प्रकाश दुबोले ह्यांनी सांगितले की, भाईंदर सेकंडरी संस्था ही अशी एकमेव जुनी संस्था आहे आणि त्या संस्थेमधील कमीत कमी साठ ते सत्तर टक्के नगरसेवक त्या शाळेचे विद्यार्थी आहेत आणि त्या शाळेमध्ये आपली भाईंदरची जी १६ व १७ नंबरची शाळा आहे या शाळेतले ऐंशी टक्के, नव्वद टक्के विद्यार्थ्यांना आम्ही त्या शाळेमध्ये प्रवेश देतो. तर अशा ज्या शाळा आहेत, त्या शाळांमध्ये प्रवेश देतो. तर अशा ज्या शाळा आहेत अशा शाळेला सहा लाख रुपये एकदम नाममात्र आहेत. तर कमीत कमी दहा लाख रुपये द्यावे अशी मी मा. महापौर मॅडमना विनंती करतो. कारण त्या शाळेने दोन मेरिट लिस्टमध्ये विद्यार्थी आणलेले आहेत. इतके मोठ्या नगरसेवकांना आणले. म्हणजे त्या शाळेची पात्रता किती चांगली आहे ते बघा. तसेच, त्या शाळेमध्ये गुजराथी, हिंदी माध्यम सुद्धा आहे आणि मराठी माध्यम असे तीन माध्यमामध्ये ती शाळा चालते. मा. महापौर मॅडम, मी तुम्हांला विनंती करतो की, कमीत कमी दहा लाख रुपये अनुदान आपण त्या शाळेला द्यावे. त्या शाळेची आर्थिक परिस्थिती फार गरीब आहे, बिकट आहे. शाळा दुरुस्त करण्याकरितासुद्धा त्या शाळेकडे पैसे नाही आणि मी आपल्याला विनंती करतो की, कमीत कमी दहा लाख रुपये अनुदान द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ठराव दिलेला आहे. ठरावानंतर धोरण ठरले पाहिजे. नंतर एक कोटी रुपये जसे वाटायचे आहे तसे वाटा. पहिल्यांदा आम्ही ठराव दिलेला आहे. ठरावात वाटू नये असे आहे. पहिल्यांदा आपण धोरण ठरवा, धोरण ठरल्यानंतर मग वाटा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया की अनुमती से बोलना चाहता हू की, मैं पहिली बार धन्यवाद देना चाहता हूँ। मैं कम से कम पहिले महानगरपालिका को धन्यवाद देना चाहता हू । पहिली बार एक करोड रुपय का शिक्षण संस्था के अनुदान दिया। साथ मे ऐसी संस्थाओ को भी अनुदान दिया। जो जादा बोल रहे है उनको कही ना कही थोडा बहुत तो मिला है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जभी तो विरोध कर रहे है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मैं बताना चाहता हू, अग्रवाल सेवा समिती बराबर दस साल से पाणी पिलाती, आज उसको पैसा मिला है। लालूरामजी गाडोदिया बीस साल से सेवा कर रहे है और आज उनको भी पैसा मिला है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यह निधी बाटनेके लिए नही है। कायदे से बाटो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

गुजराती संस्था को किसी नगरपालिकेने इतना बडा अनुदान दिया हो। तिसरी बात को, मै धन्यवाद देना चाहता हू। कल्पना चावला ट्रस्ट।

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

आम्ही जो ठराव दिलेला आहे त्या ठरावावर मतदान घेण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बोलता असतांना पुर्ण सभागृह आपले म्हणणे ऐकून घेत असते. त्यामुळे आपणही दुसऱ्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्या. सन्मा. सदस्य आपण खाली बसावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, सर्व संमत से यह ठराव को पास करना चाहिए। जिससे की, अगले वर्ष इनको एक करोड नही, इतकी सारी इच्छाए पुरी हो जाए। मुझे लगता है की, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी की इच्छा पुरी हो जाए। अग्रवाल सेवा समिती को एक लाख रुपये अनुदान दिया जाए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमने बीस लाख रुपया खर्चा किया है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मेरा कहनेका तात्पर्य यह है की, अपने मिरा भाईंदर महानगरपालिकाने अच्छा काम किया है। ऐसा काम करे स्कुल को संतुष्ट किया जाए। लेकिन सब स्कुल को एक साथ तो संतुष्ट नही कर सकते। उसमे एक दो स्कुल रह जाती है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चौहाण साहब, अग्रवाल सेवा समितीने बीस लाख रुपया खर्च किया है, समझे क्या आप?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारे सदस्य मिलन पाटीलजी संतुष्ट नही है। स्थायी समिती मे रहकर भी आप संतुष्ट नही है तो.........

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, अग्रवाल सेवा संस्था जो है वह रजिस्टर्ड है। प्लस शिक्षण संस्था के हिसाब से पच्चास से सौ बच्चो को हरसाल अनुदान देती है। सब स्कुल मे जाते है, उनसे आप पुछो। आपने पच्चास हजार रुपया दिया है और............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चौहाण साहब, आप ऑडीट रिपोर्ट देखो। अग्रवाल सेवा समितीने हर साल पाच लाख रुपया का अनुदान बच्चो को बाँटा है। आप का पच्चास हजार रुपये से कुछ होता नही। हमने पाच लाख रुपया बाँटा है और हरसाल बाँट रहे है, बच्चो को अनुदान और जो अच्छे काम किए है वह बताओ। सिर्फ पच्चास हजार रुपया बाँटा वह बता रहे हो। पाच लाख रुपया हमने बाटा वह बोलो ना।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, एक एकाने बोलावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, निर्मल निकेतन म्हणून संस्था आहे. ती गेली दहा वर्षे सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कामे करीत आहे. त्या संस्थेलासुद्धा आपल्यातर्फे अनुदान देण्यांत यावे आणि आपण जे पंचवीस अजार म्हणालात तर कमीत कमी एक लाख रुपये त्यांना अनुदान देण्यांत यावे अशी मी विनंती करते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाला मी मा. महापौरांच्या परवानगीने विनंती करतो की, जोपर्यंत अनुदान देण्याचे धोरण आपण निश्चित करत नाही. तोपर्यंत आपण हा जो काही निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी करायला फार अडचणी येतील. म्हणून कायद्यातल्या ज्या तरतुदी आहेत त्या तरतुदीप्रमाणे जे काही महापालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे किंवा महापालिकेचे जे स्वेच्छाधिन निर्णय आहेत. जे महापालिकेने घ्यायचे आहेत. त्याच्यासाठी जे निकष असतील, तर पहिल्यांदा निकष ठरवायला पाहिजे की, अनुदान देतांना कुठला कुठला क्रायटेरिया वापरायला पाहिजे. शासनाची अनुदान देण्याची जी पद्धत आहे किंवा शासनाने जे काही धोरण ठरवले आहे ते धोरण आपण स्विकारायचे की, आपण आपले वेगळे धोरण ठरवायचे. आपण आपला निकष ठरवला पाहिजे. जिथपर्यंत आपण निकष ठरवत नाही, तोपर्यंत आपल्याला ह्या ठरावाची अंमलबजावणी करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी जे निवेदन केले, सभागृह नेते आपण खाली बसा. मला या विषयावर बोलायचे आहे. आपण ह्यांना खाली बसायला सांगा. मी अजुनपर्यंत बोललेलो नाही. ठराव ठेऊन झालेला आहे. आत्ता फक्त चर्चा आहे. आयुक्तांनी सभागृहामध्ये जे निवेदन केलेले आहे.........

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. मिलन म्हात्रे, मला फक्त सभागृहाची दोन मिनिटेच पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

मला ऑलरेडी असे स्पष्ट करायचे आहे की, स्थायी समितीला दि. ३०/०७/२००५ रोजी.......

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये ठराव दिलेला असतांना मी सभागृहाला सांगू इच्छितो की........

**मिलन म्हात्रे :-**

दिलेला कालावधी पुर्ण झालेला आहे. त्यानंतर गेल्या आठ महिन्यापासून आयुक्तांनी आपली भुमिका स्पष्ट करुन.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, सभागृह नेते बोलत आहेत. त्यांचे बोलणे झाल्यानंतर आपण बोला. आत्ता आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सभा संपल्यानंतर आम्ही बोलायचे का? मी येथे उभा आहे, अर्धा तास झाला. मला ह्या विषयावर बोलायचे आहे. त्यांना नंतर बोलायला सांगा. त्यांनी ठराव ठेवलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलण्याकरिता परमिशन दिली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, मी बोलत होते. आपण त्यांना खाली बसायला सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, मी जो ठराव मांडला आहे त्या ठरावामध्ये दुरुस्ती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला बोलायचे आहे. त्यांचे बोलणे संपलेले आहे. आपण माईक बंद केला तरीही मी बोलत राहीन. असे चालायचे नाही. आपण त्यांना खाली बसायला सांगा. आत्ता आयुक्तांचे ह्या विषयावर जे निवेदन झालेले आहे त्यावर मला बोलायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर साहेबा, आजच्या मा. महासभेमध्ये ज्या ज्या संस्थांना अनुदान देण्याबाबत जो ठराव झालेला आहे त्यामध्ये सन्मा. आयुक्त साहेबांनी सभागृहापुढे कथन केले की, धोरण निश्चित करायला पाहिजे. मी सभागृहाच्या वतीने दोन-तीन मुद्दे आयुक्त महाशयांना आणि आपल्या समोर मांडतोय. सर्वप्रथम आपण ज्या ज्या संस्थांना अनुदान वाटप करण्याचे निश्चित केले आहे. ती संस्था सर्वप्रथम मिरा भाईंदर शहरातील असावी. दुसरे, सदर संस्थेने मिरा भाईंदर महापालिकेचे जे काही कर असतील, हाऊस टॅक्सच्या रुपाने असो, पाणीपट्टीच्या स्वरुपाने असो जे काही कर असतील त्या सर्व कराचा भरणा केलेला असावा. म्हणजे कोणतीही संस्था थकबाकीदारामध्ये नसावी. तिसरे, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने आपण ज्या संस्थांना अनुदान देण्यासाठी संस्थेच्या नावाची शिफारस केलेली आहे, प्रशासनाच्या वतीने सदर संस्थेवर कोणत्याही प्रकारची कायदेशिर कार्यवाही केलेली नसावी. त्याच्या नंतर सदर संस्थेचा किमान मागील तीन वर्षाचा ऑडीट (ताळेबंद) रिपोर्ट, फायनान्शिअल रिपोर्ट, मागील तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट सदर संस्थेचा पुर्ण असावा. अशा प्रकारच्या ह्या तीन-चार महत्त्वाच्या ज्या बाबी आहेत, त्या ठरावामध्ये अंतर्भुत करुन मा. महासभेने ज्या संस्थेचे धोरण निश्चित केलेले आहे, अनुदान देण्याचे तर वरील कामी मा. आयुक्त साहेबांनी या सर्व बाबी कायदेशिर पडताळून सदर संस्थेला अनुदान वाटप करावे असा मी ठराव मांडतो.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, मनपाचा कोटा आपण ह्या ठरावामध्ये समाविष्ट करुन घेण्यांत यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, ज्या तीन-चार गोष्टी मी आपणांसमोर मांडल्या आहेत त्यामध्ये सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर ह्यांनी एक सुचना सभागृहासमोर विनंती केली होती ती सुचनादेखील त्या ठरावामध्ये अंतर्भुत करण्यांत यावी.

**मुक्ता रांजणकर :-**

मनपाचा कोटा किती राहिल? तो मनपाचा कोटाही समाविष्ट करण्यांत यावा. नगरसेवकाने शिफारस केलेल्या विद्यार्थ्याला ॲडमिशन घेतांना तो कोटा लागू होईल.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्या शाळांची थकबाकी आहे व त्यांच्यावर केसेस आहेत आणि तिथे ज्या शाळा चालू आहेत त्यांनासुद्धा अनुदान देण्यांत येऊ नये.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी जे निवेदन केलेले आहे त्याबद्दल मला बोलायचे आहे. आयुक्तांनी गोषवारा दि. ३१/०३/२००६ ला सादर केलेला आहे. या गोषवाऱ्यामध्ये आयुक्तांची स्वतःची स्वाक्षरी आहे. या स्वाक्षरीच्या खाली त्यांनी हद्दीतील संस्थांना अनुदान वितरित करणेबाबतचे धोरण निश्चित करणे. आयुक्त साहेबांचा गोषवारा काय आहे तो आपण नीट बघा. गोषवाऱ्यामध्ये पहिल्यांदा तुमचे धोरण निश्चित करायचे आहे आणि त्यांनतर अनुदान मंजुरीचा निर्णयास्तव सादर करणे. गोषवाऱ्यानुसार तुमचे जे धोरण आहे ते नक्की करायचे आहे. हा जो स्थायी समितीचा ठराव झाला हा ठराव होण्याच्या आठ महिन्या

अगोदर जर आयुक्त साहेबांना वाटले असते तर आयुक्त साहेब हे मिरा भाईंदर शहराच्या काही बाहेर नव्हते. ते आपल्या कार्यालयात दररोज कार्यरत आहेत. दि. ३०/०७/२००५ नंतर आयुक्तांनी स्थायी समितीच्या ठरावानंतर धोरणाकरिता हा विषय मा. महासभेपुढे आणायला हवा होता. तर त्यांनी तो विषय आणला नाही. आज सत्ताधाऱ्यांच्या वतीने जे म्हटले जात आहे की, आम्ही हा ठराव दिला आहे ते आयुक्तांनी कायद्याचे वगैरे बघायचे आणि द्यायचे. म्हणजे नाच नाचे बंदर, और माल खाये मदारीवाला. हिसाब किताब झाला. सरळ आहे आणि तेच आहे. नाचायचं आणि ह्यांनी माल खायचा. ह्याच्यामध्ये ज्या संस्था दिल्या आहेत, तुमच्या शिक्षण विभागाकडे त्या संस्थांची अजुनपर्यंत माहिती आलेली नाही. ती माहिती आमच्या गोषवाऱ्यामध्ये नाही. ज्या संस्था, मित्रमंडळ वगैरे आहेत, त्यांचे लेखे अजून गेल्या तीन वर्षाचे तुमच्याकडे आलेले नाहीत. जे ऑडीट आपण मागवता तेसुद्धा आलेले नाही आपले अजुन धोरण ठरलेले नाही. संस्थांची ऑडीट आलेली नाही. ज्या संस्था आपल्या मिरा भाईंदरमध्ये आहेत, त्यांची माझ्याकडे लिस्ट आहे. या लिस्टमध्ये बऱ्याचशा लोकांचे पत्ते नाही अणि मी फॉलोअप केल्यानंतर त्या एज्युकेशन विभागाने मला माहिती दिली. त्याच्यामध्ये जवळजवळ सात ते आठ संस्था आहेत. ह्यांचा ॲड्रेस निरंक लिहिले आहे. हे तुमच्या शिक्षण अधिकाऱ्यांच्या खाली सह्या आहेत आणि हे माझ्याकडे ऑथेन्टिकेटेड शिक्षण अधिकाऱ्याच्या सहीचे कागदपत्र आहेत. ह्यावर आपण काय भाष्य करणार आहात का? ज्या संस्थांची पत्ते तुमच्या शिक्षण विभागाकडे निरंक लिहिलेले आहेत अशा संस्थांना आपण अनुदान वाटप करत आहात. दहा हजारापासून पन्नास हजार रुपये या सभेमध्ये माझे असे स्पष्ट मत आहे की, भाईंदरच्या काही नामवंत जुन्या ज्या शाळा आहेत, त्यांच्या पडद्यामागे अनेक ज्या बोगस संस्था आहेत, ते विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयाचे डोनेशन घेतात. त्या संस्थेच्या ट्रस्टींच्या स्वतःच्या गाड्या आहेत. शाळांची काही वाहने आहेत. बरेच काही आहे. मी काय काय बोलू? पण अशा ज्या काही शाळा आहेत त्या ह्या ज्या जुन्या शिक्षण संस्था आहेत, जसे सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी सांगितले की, भाईंदर सेकंडरी, मी त्या शाळेचा माजी विद्यार्थी आहे आणि आम्ही गेल्या दिड वर्षामध्ये सतरा लाख रुपये इतके डोनेशन गोळा करुन दिले आहे. एक वर्षात ह्या, ह्या जुन्या शहरांचा पदर आडवा करुन ह्या ज्या काही शाळा आणि संस्था आहेत, त्या शाळा आणि संस्था आपल्याकडून जे काही पैसे वगैरे काढायचा प्रयत्न करतात, १७ तारखेला मी माझे पत्र दिले आहे. त्या पत्रामध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. आपले धोरण ठरलेले नाही. त्यामध्ये स्थायी समितीला तेवढ्या पॉवर्स नाही. जे सुचक, अनुमोदक आहेत ते ह्याच्यामध्ये लाभार्थी आहेत असेही असतांना जर आपण प्रस्ताव आयुक्तांनी जे निवेदन दिले आहे ते चुकीचे आहे आणि आत्ता हे आयुक्तांवर ढकलत आहेत. कुठलेही धोरण नक्की न होता एखादा ठराव स्थायी समितीमध्ये पास होतो. त्यानंतर तो मा. महासभेकडे येतो. प्रशासन ह्याच्यामध्ये सत्ताधाऱ्यांच्या हाताला हात धरुन चालले आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे आणि हे जे वर्तमानपत्र आहे, आपण या सभेचे पिठासिन अधिकारी आहात. आम्हांला नोटीस तुमच्या पेपरवर २४ तारखेची दिली आहे आणि प्रसिद्धी ही २५ तारखेची आहे. ही प्रसिद्धी २३ तारखेची पाहिजे. आम्हांला मिळाले आहे. मला २५ पेक्षाही नंतर मिळाले आहे आणि आपले जे शुद्धीपत्रक आहे ते आपल्या माणसाने एक सिंगल पेपर आणून दिला. माझ्याकडे अजूनपर्यंत आयुक्त साहेबांचा गोषवारासुद्धा आलेला नाही. त्याच्यावर लिहिले आहे का बघा, गोषवारा आणि शुद्धीपत्रक मिळाले. सही आहे का बघा? एक सिगल पेपर आणून दिला आहे. ह्याच्यामध्ये २५ तारखेची आणि हे २८ मार्च २००६ चे पत्र आहे. शुद्धीपत्रक वगैरे ह्याच्यामध्ये दिलेले आहे आणि हे सात दिवसाच्या आतमध्ये पुर्ण कालावधी न घेता सभा बोलावलेली आहे. सभा अनधिकृत आहे असे आमचे म्हणणे आहे. पण या सभेमध्ये मी दि. २५/०५/२००६ चे पेपर आपल्याकडे सबमिट करतो आणि एक २८ मार्चचा पेपर. तसेच, शुद्धीपत्रकसुद्धा आम्हांला सात दिवसांच्या अगोदर मिळायला पाहिजे होते. या शिक्षण संस्थेचे जे कोण मालक आहेत. त्यांचा इतर हा कागद मी तुम्हांला देत आहे. हा कागद आम्हांला ॲक्च्युअल सभागृहाच्या माहितीकरिता द्यायला पाहिजे होता. त्या शैक्षणिक संस्था रजिस्टर आहेत का? हे गोषवाऱ्यामध्ये कुठेही दिलेले नाही. ही मित्रमंडळ आहेत, ती कार्यरत आहेत का? अधिकृत, अनधिकृत तो भाग निराळा. चॅरेटी कमिशनकडून आम्हांला नंतर त्याची सगळी माहिती येईल. ही माहिती आपल्या सभागृहापुढे जोडलेली नाही. जी माहिती माझ्याकडे त्याच्यावर शिक्षण प्रशासन अधिकारी म्हणून शिक्षण अधिकाऱ्यांची सही आहे. ती माहिती आपणाकडे मी पाठवतोय. या संपुर्ण ठरावाला माझा विरोध आहे आणि माझा विरोध मी माझ्या या संभाषणामध्ये कागदपत्रांसकट नोंदवतोय, त्याची नोंद घ्यावी. आयुक्त साहेब, आपण आणि ह्यांनी जे सांगितलेले आहे की, प्रशासनाची, तुमची जी भुमिका आणि आपल्या गाईडलाईन्स किंवा धोरण ह्याबद्दल आपले काही धोरण ठरलेले आहे की, नाही आणि जर धोरण ठरलेले नसेल तर स्थायी समितीचा ठराव योग्य की अयोग्य आहे? मा. महासभेपुढे आपण आणलेला गोषवारा योग्य की, अयोग्य आहे? ह्याचे आपण मला रुलिंग द्यावे. माझी एवढीच आपल्याला विनंती आहे.

**सुरेंद्रप्रसाद तिवारी :-**

मै समर्थन कर रहा हुँ।

**नगरसचिव :-**

खास सभेला तीन दिवसाची नोटीस असते.

**मिलन म्हात्रे :-**

हे झाले तुमच्या टायमिंगचे. धोरण निश्चित झाले आहे की नाही एवढेच सांगा. धोरण ॲडव्हान्स झालेले आहे का?

**नगरसचिव :-**

मी फक्त खास सभेच्या मिटींगच्या अजेंड्याबद्दल.......

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेचे सोडून द्या. ते झाले. धोरण ठरलेले आहे का? आपल्याकडे धोरण निश्चित झाल्याबाबतचा ठराव आलेला आहे का? त्याचा उल्लेख या गोषवाऱ्यामध्ये नाही.

**नगरसचिव :-**

माझा संबंध फक्त अजेंड्यापुरताच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण गोषवारा दिलेला आहे. त्या गोषवाऱ्याशी तुमचा संबंध आहें.

**नगरसचिव :-**

गोषवारा प्रशासनाकडून असतो. गोषवारा सचिवांकडून नसतो.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने आपल्याला धोरणाचा ठराव दिला का?

**नगरसचिव :-**

प्रशासनाने जो गोषवारा दिला तो मी सदस्यांपुढे सदरच्या सभेत ठेवला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये धोरणाचे आहे की नाही एवढेच सांगा. बाकी काही नको. फक्त धोरण ठरण्याचा गोषवारा आला का? साहेब, आपण प्रशासनाच्या वतीने क्लेरिफिकेशन द्यावे. आयुक्त साहेब आपण खुलासा करावा. त्याच्यावर आपली सही आहे आणि आपण कुठेच लिहिलेले नाही. धोरण ठरलेले नाही. उलट धोरण ठरायचे आहे असे आपण बोलता. हा ठराव सभेपुढे आलाच नाही पाहिजे.

**मोहन पाटील :-**

मा. महासभेपुढे जेव्हा विषय येतो. त्यावेळेला त्याच्या गोषवाऱ्याविषयी जे धोरण ठरवायचे आहे त्या धोरणाचा ठराव ठरवून आपल्याकडे दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन विषय पाहिजे. हे खिरापत वाटण्याचा विषय आहे. आणि विषयपत्रिकेवर धोरणाचा विषयच नाही. तो विषय अगोदर पाहिजे. त्याच्यावर ठराव झाला पाहिजे आणि त्याच्यानंतर अनुदानाचा विषय आला पाहिजे. आपण करता ते सगळं योग्य आहे. आम्ही कुठे म्हणतो अयोग्य आहे असे. ते योग्य की अयोग्य हे आम्ही आपल्याला नंतर सांगू. प्रशासनाच्या वतीने खुलासा देण्यांत यावा. धोरण ठरले आहे की नाही. ॲडव्हान्स म्हणजे स्थायी समितीचा विषय यायच्या अगोदर. दि. ३०/०७/२००५ च्या अगोदर आपले अनुदानाबाबत धोरण ठरले आहे की नाही आणि जर धोरण ठरले नसेल तर स्थायी समितीचा ठराव आपल्या डी.एम.सी.ने कसा करु दिला? साहेब, आज एक करोड रुपयाचा विषय आहे. प्रश्न एक करोड रुपयाचा आहे. प्रशासनाने कृपा करुन ह्याच्यावर खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी आत्ता जो काही प्रश्न विचारलेला आहे. त्या बाबतीमध्ये मघाशी जे निवेदन केलेले आहे त्या निवदेनामध्ये स्पष्ट सांगितलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे अनुदान वाटप होणार आहे. आज ३१ तारखेपर्यंत सगळा अनुदान वाटप होणार. बरोबर की नाही? आपण हात असे करु नका. हो किंवा नाही बोला. मी बोलतोय ना, मी हातवारे करत नाही. साहेब, आपण प्रशासन आहात. आम्हांला तुमच्याकडून होय किंवा नाही असे उत्तर पाहिजे. ही कॅश विड्रॉ होणार की नाही? मला बाकी काही सांगायचे नाही. हो की नाही. ठराव झाला म्हणजे होणार.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, मा. महासभेमध्ये जो निर्णय होतो त्या निर्णयाची प्रत नगरसचिवांकडे आल्यानंतर..........

**मिलन म्हात्रे :-**

धोरण ठरल्यानंतर जर धोरण ठरले नाही तर नियम सुद्धा लागू दिला नव्हता. मा. महासभेने धोरण ठरवल्यानंतर धोरण लागू झाला.

**रोहिदास पाटील :-**

ह्या वर्षाचे एक कोटी रुपये महापालिकेच्या शाळेसाठी वापरावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या महापालिकेच्या शाळेसाठी हे पैसे वापरा ना.

**रोहिदस पाटील :-**

आम्ही है पेसै दुसऱ्या ठिकाणी फिरवायला सांगत नाही. कोणाला द्या म्हणून सांगत नाही. कायदेशिर/बेकायदेशिर नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये आम्हांला बोलण्याची परवानगी द्यावी.

**रोहिदास पाटील :-**

आपण आजच्या ह्या सभेमध्ये धोरण ठरवा.

**मिलन म्हात्रे :-**

आज आपण विड्रॉव्हल करणार आहात का? ३१ तारीख आल्यावर विड्रॉव्हल आज होणार की नाही एवढेच आम्हांला सांगा. ठराव करा, विड्रॉव्हल करा. आम्ही कुठे नाही म्हणतोय.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, या विषयावर आम्हांला बोलण्याची परवानगी मिळावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आपणांला या विषयावर ठराव दिलेला आहे. ठरावावर मतदान घ्या आणि पुढे सभा चालवा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मला या विषयवर बोलायचे आहे. आपण मलाही बोलायला संधी द्यावी.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय की, मा. महापौर साहेबा आणि संपुर्ण सभागृह.......

**मिलन म्हात्रे :-**

येथे धोरण राहिले बाजुला, भ्रष्टाचाराचे तोरण बांधता तुम्ही ते बोला.

**लिओ कोलासो :-**

आपल्या विचाराशी सहमत होऊन बोलतोय. परंतु, आपले सगळेच विचार सत्ताधारी पक्ष स्विकारणार असे होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला कायदा स्विकारायचा आहे. नियम स्विकारायचा आहे. आमचे धोरण नाही. नियम स्विकारायचे आहे, धोरण बनवायचे आहे. मग ते विड्रॉव्हल करा.

**लिओ कोलासो :-**

सत्ताधारी पक्ष कायद्यातले सगळे नियम आणि सत्ताधारी पक्षाची भुमिका असे एकत्रिकरण करुन सभागृहामध्ये प्रस्ताव आणलेला आहे आणि ती सभागृहाची प्रथा आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी ऑफीस ऑफ प्रॉफिटचा उल्लेख केला. स्पष्ट ते अधिक विस्तारपुर्वक बोलले नाही. परंतु, एक प्रकारची दहशत आहे की, सन्मा. केंद्रामध्ये आत्ता जे काही ऑफीस ऑफ प्रॉफिटच्या बद्दल जो प्रश्न निर्माण झाला त्याचे सर्व राजकिय आणि प्रशासकीय क्षेत्रामध्ये बरेचसे प्रश्न प्रतिबिंबीत झाले. महापालिका कायद्यामध्ये सेवाभावी संस्थांना अनुदान देण्याचे रितसर प्रोव्हिजन आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

नाही. ओन्ली प्रायमरी एज्युकेशन.

**लिओ कोलासो :-**

आहे आणि त्यामुळे या महापालिकेकडे अनुदान वाटपाचा हा नविन विषय आलेला आहे, असे काही होत नाही. या महापालिकेचा आणि नगरपालिकेचा इतिहास जर आपण बघितला व मागील प्रोसिडींग जर आपण बघितली तर सरसकट आपण महापालिका चांगल्या संस्थांना, चांगले कार्य करणाऱ्या संस्थांना, सेवाभावी संस्थांना, शैक्षणिक संस्थांना अनुदान देत आहे. आत्ता प्रश्न राहिला की, आयुक्त साहेब आपल्याकडे निर्देश करण्यांत आलेला आहे की, आपण जी टिपणी दिलेली आहे त्याच्यामध्ये काय म्हटलेले आहे, होय किंवा नाही? एवढे होय किंवा नाही क्रॉस एक्झाम नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे क्रॉस एक्झाम आहे. आपल्याला २३० कोटी रुपये आहे. येथे १ कोटी रुपयाचा सवाल आहे. आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थी विदाऊट चप्पलांनी फिरत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांकडे सॅन्डल नाही. तुमच्याकरिता हा विषय महत्त्वाचा नाही. आमच्याकरिता फार महत्त्वाचा विषय आहे. जनतेचा विषय महत्त्वाचा आहे. आमचे म्हणणे आहे की, हे एक करोड रुपये महापालिकेच्या २९ शाळांना मिळावे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

२९ शाळांना अनुदान मिळावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण बसून घ्या. दुसरे सदस्य बोलत असतांना आपण बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

होय किंवा नाही बोला ना. तिकडे बघून बोला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेबांना होय किंवा नाही बोलू द्या ना.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्याचा धोरणात्मक निर्णय सांगा. एक कोटी रुपये अनुदानाकरिता महापालिकेच्या जवळ आहेत. आपण निकालच लावा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, ह्या ठरावामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, धोरण ठरवा आणि अनुदान देण्याचा निर्णय घ्या. महापालिकेचे धोरण सन्मा. सभागृह नेत्यांनी वाचून दाखवलेले आहे आणि ते ठरलेले आहे आणि त्यामुळे अनुदान वाटप करतांना अडथळा येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते धोरण गोषवाऱ्यामध्ये लावलेले नाही. धोरण काय आहे ते वाचून दाखवा. सुचना दिल्या आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदय, या ठिकाणी धोरण निश्चित करण्याबाबतचे नियम आपल्याला सांगितले. सभागृह नेत्यांनी याबाबतचे धोरण निश्चित केलेले आहे व मा. महापौरांना सुपुर्द केले आहेत. सभागृहामध्ये दोन ठराव आलेले आहेत. आपण ते दोन्ही मतदानाला टाका.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण या ठिकाणी नाकाडी साहेबांना बोलायला सांगा.

**मोहन पाटील :-**

मॅडम, दोन्ही ठराव आपण मतदानाला टाकावे. स्वयंस्पष्ट टिपणी प्रशासनाकडून आली होती. धोरण निश्चित करुन निर्णयास्तव आलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह धोरण निश्चित करने के लिए सभा नही बुलाई है। यह अनुदान बाँटने के लिए सभा बुलाई गई है।

**मोहन पाटील :-**

मॅडम, आपण मतदानाची कार्यवाही करावी. दोन्ही ठराव मतदानाला टाकावे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीने केलेला ठराव हा मा. महासभेला शिफारस होती. त्यांनी केलेला ठराव हा अंतिम नव्हता. त्यामुळे त्याच्यामध्ये दुरुस्ती करुन आपण मा. महासभेला अंतिम निर्णय घेतलेला आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव आलेले आहेत. आपण कृपया दोन्ही ठराव मतदानाला टाकावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, मला बालू द्या. पहिल्यांदा बोलतोय आणि शेवटचे बोलतोय.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण भरपुर बोलाणार आहात. माझा फक्त एकच विषय आहे आणि आपण शेवटचे बोलू नका. अजुन दिड वर्ष बाकी आहे. ऑफीस ऑफ प्रॉफीट म्हणून मी बोललो असे आत्ताच माझे मित्र सन्मा. लिओ कोलासो साहेबांनी सांगितले. स्वतः शिक्षक असल्यामुळे त्यांना विशिष्ट त्या गोष्टीचे ज्ञान आहे. मी मागच्या तीन टर्ममध्ये नगरसेवक असल्यामुळे काही नगरसेवकांनी अशा तऱ्हेचा या महापालिकेचा फायदा उचललेला आहे. शाळा काढल्या, सहा महिन्यामध्ये अदृश्य झाल्या. पैसे घेतले, महिलांच्या शाळा काढल्या, मुकबधिरांच्या शाळा काढल्या, कोणाकोणाच्या शाळा काढल्या, त्या शाळा कुठे आहेत? आणि ह्या शाळांना अनुदान देतांना ह्या शाळा अदृश्य होणार नाही त्याची खात्री कोण देणार? मघाशी सांगितले की, ऑफीस ऑफ प्रॉफिट, कायदा जरा वाचून घ्या. बरेचसे मासे गळाला अडकतील, मोठमोठे अडकतील. कारण आपण नगरसेवक आहांत म्हणून स्वतःसाठी कसा फायदा उकळवायचा हाच तो

कायदा आहे. सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब, नियम हाच आहे. आपण त्याच्यामध्ये अडकणार नाही. नियम वाचून घ्या. मला माहिती आहे.

**लिओ कोलासो :-**

नियमामध्ये तसे आहे. नगरसेवकांसाठी डायरेक्ट बेनिफिशअली नाही असे होऊ शकत नाही.

**जयंत पाटील :-**

डीसक्वॉलिफिकेशन ॲक्ट जो आहे तो आपण बघून घ्या. त्याच्यामध्ये कसा लाभार्थ मिळवायचा म्हणजे माझ्या पदाचा उपयोग करुन मी कसे पैसे घ्यायचे हा तो नियम आहे. आपण घेतो की नाही ह्याचा प्रत्येकाचे विचार करायचा आहे. ती कायदेशिर बाब आहे आणि आत्ता लोकसभेमध्ये त्याची चर्चा चालू आहे. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, ज्या महापालिकेच्या मराठी शाळा आहेत, गुजराथी, हिंदी माध्यमाच्या शाळा आहेत, त्या शाळेचा विद्यार्थी सातवी पास झाल्यानंतर विदाऊट डोनेशन आपल्या विद्यार्थ्यांना जर ते प्रवेश देणार असतील. आत्ता ते धोरण ठरवतील त्याच्यामध्ये हा विषय टाका. त्यांनाच आपण अनुदान द्या.

**मिलन पाटील :-**

त्यामध्ये भाईंदर सेकंडरी शाळा ही पहिलीच आहे.

**जयंत पाटील :-**

विदाऊट डोनेशन त्यांना ॲडमिशन मिळाले पाहिजे. नाहीतर, त्याच्यात नियम ठेवा की, ते डोनेशन परत मागण्याचा अधिकार महापालिका राखून ठेवण्यांत येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी जी सुचना मांडली आहे ती त्यामध्ये अंतर्भूत करावी आणि मा. आयुक्त साहेबांना मी विनंती करेन की, संबंधित संस्थेकडून आपण जसे लेखी हमीपत्र घ्या. म्हणजे प्रश्न उरणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, पहिल्यांदा आणि शेवटचे बोलतोय. आजचा विषय हा एकूण धोरण ठरवण्याचा आणि अनुदान वाटपाचा विषय आहे. या ठिकाणी मला पहिल्यांदा आपले अभिनंदन करावेसे वाटते की, गेल्या वर्षी आम्ही मागणी करुनसुद्धा शैक्षणिक अनुदान दिले नव्हते. परंतु, ह्या वर्षी आपण बजेटमध्ये त्याची तरतुद केली आणि वर्ष अखेर का होईना, अनुदान देण्यासंबंधी आपण हा विषय आज पटलावर आणला. विषय बघितल्यानंतर विषयामध्ये काही संस्था आहेत, त्या संस्था बघून काही नगरसेवकांचे वेगवेगळे समज झालेले आहेत. या ठिकाणी जर आपण निश्चितपणे धोरण ठरवले तर त्या संबंधित संस्था त्याच्यात बसतील की नाही ही गोष्ट स्पष्ट होऊन जाईल. ह्यांच्या संबंधी शासनाचा एक जी.आर. आहे. आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की, आपण त्या जी.आर.चे अवलोकन करावे हे पहिले धोरण आणि दुसरे धोरण असे आहे की, जशी अभिनव शेतकरी शिक्षण मंळ अशी आमची एक संस्था आहे. तर त्याच्या नावतच शिक्षण आहे. पण एखादी अशी संस्था आहे की, मिरा भाईंदर कला क्रिडा महोत्सव समिती, आत्ता ह्यांच्या नावामध्ये कुठेही शिक्षणाचा उल्लेख नाही. पण ज्या दोन्ही संस्था आहेत त्या चॅरीटेबल ट्रस्टखाली रजिस्टर्ड आहेत. जेव्हा एका कायद्याखाली सर्व संस्था रजिस्टर्ड झाल्या असतील तेव्हा त्या त्या कायद्याच्या तरतुदी लागु होतात. आमचे धोरण असे आहे की, ती विश्वस्त संस्था असेल व त्यांच्या नावामध्ये शिक्षणाचे नांव लिहिले नसेल परंतु, ते शैक्षणिक कार्य करतात. जसे कला क्रिडा महोस्तव दरवर्षी होतो. ते सगळे आपल्या विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळावा म्हणून होतो ना? परंतु, त्याच्यामध्ये शैक्षणिक असे कुठलेही नांव नाही म्हणून ही संस्था काय बाद होणार नाही. तर असे करतांना पहिल्यांदा, ज्या ज्या संस्था या ठिकाणी आलेल्या आहेत, मग त्याच्यामध्ये शैक्षणिक असे नांव नसले तरी ती संस्था धर्मदाय आयुक्तांकडून रजिस्टर्ड झालेली आहे की नाही, त्या चॅरिटी ट्रस्टखाली हे बघणे महत्त्वाचे अहे. ते आपण बघणार आहोत. हे धोरणात्मक विषय, हे असेच धोरण आहे. पहिजे एक शासनाचा जी.आर., दुसरा शैक्षणिक संस्था किंवा इतर सामाजिक संस्था म्हणून त्या धर्मदाय कायद्याखाली रजिस्टर्ड आहेत की नाही. तिसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, जर आपल्याला असे वाटत असेल की, काही मित्र मंडळ आहेत, ते आपले उगाच बोगस संस्था उभ्या करुन काम करत आहेत. तर त्यांना कसे अडवता येईल. जर त्यांचे ऑब्जेक्टिव्ह प्रत्येक संस्थेचे ऑब्जेक्टिव्हज् असतात. एखादी संस्था शैक्षणिक कार्य करत नसेल तरीसुद्धा त्यांच्या संस्थेचे ऑब्जेक्टिव्हज् काय असतात की, गरीब मुलांना, गरीब विद्यांर्थ्यांना मदत करणे, सहकार्य करणे. शाळांना अनुदान देणे, म्हणजे गरीब शाळांना तर अशा प्रकारे ज्यांची उद्दीष्टे त्यांच्याच घटनेमध्ये आहेत. या संस्थासुद्धा या ठिकाणी पात्र होतात. मग त्या शैक्षणिक संस्था असल्याच पाहिजे अशातला काही भाग नाही. म्हणजे धोरणानुसार आपल्याला हेही बघितले पाहिजे की, त्या संस्थेच्या घटनेमध्ये समजा, एखादा मित्र मंडळ आहे, मग त्यांच्या घटनेमध्ये तसा ऑब्जेक्टिव्ह आहे का? तर आहे. शैक्षणिक अनुदान देणे, विद्यार्थ्यांना सहकार्य करणे, मदत करणे हे जर असेल तर ती शैक्षणिक कार्य करते. ह्याच्यामध्ये पाचवी बाब अशी महत्त्वाची आहे की, जेव्हा आम्ही ६६(२१) कायद्याचा विचार करतो तेव्हा त्या कलमामध्ये असे स्पष्ट लिहिले आहे की, ६३ च्या १५ मध्ये प्रयमरी एज्युकेशन देणे ही महानगरपालिकेची आवश्यक जबाबदारी आहे. हे फक्त आपल्याच कायद्यात आहे असे नाही भारताच्या संविधानामध्ये सरकारवर

आणि महापालिकांवर प्रायमरी शिक्षण देण्याची पुर्ण जबाबदारी आहे. म्हणून एक आवश्यक बाब म्हणून आपण आपल्या प्राथमिक शाळा चालवित आहोत. आता ते वगळून त्या शाळा चालवण्याची सगळी आर्थिक जबाबदारी आपली असताना त्याच्या व्यतिरीक्त शैक्षणिक उद्दीष्टांना ६३ च्या २१ कलमामध्ये दोन विषय मांडले आहेत त्यात एक विषय आसा आहे की, शैक्षणिक उद्दीष्ट पार पाडण्यसाठी आणि दुसरे शैक्षणिक संस्थांना मदत करणे. शैक्षणिक संस्था म्हणजे ज्या नावाने खरोखर शैक्षणिक संस्था आहेत त्यांना मदत करणे आणि शैक्षणिक उद्दीष्ट पार पाडणे म्हणजे जे इतर आहेत त्यांच्या नावावर शैक्षणिक कार्य करतात आणि म्हणून या दोन्हीसाठी अनुदान देण्याची ह्याच्यामध्ये स्पष्ट तरतुद केलेली आहे तर या ठिकाणी मी आपल्याला एवढेच सांगतो की, जर एखादी संस्था रजिस्टर्ड असेल, धर्मदाय कायद्याखाली, तर ती संस्था पात्र ठरते व त्यांच्या घटनेमध्ये असा उल्लेख असेल की, हे शैक्षणिक कार्य करतात. तरी ती संस्था पात्र होते. त्याच्या व्यतिरीक्त आपण तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट मागवलेले आहे. जेव्हा मागच्या तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट आपण मागवता तर त्या ऑडीट रिपोर्टमध्ये शैक्षणिक खर्च या सदराखाली त्यांनी किती खर्च केला आहे. हे जर आपल्याला माहिती झाले असते तर ती संस्था शंभर टक्के पात्र होणार आहे आणि जर हेच निकष लावले तर मला वाटत नाही की, कुठल्याही नगरसेवकाला ह्याच्या संदर्भात कुटलाही वेगळा विषय मांडायची गरज पडेल. त्याही पलीकडे आपल्याकडे शंकर नारायण कॉलेज आहे. आपण त्याचा विसर केलेला आहे. राजकीय सोडून द्या. परंतु, ते एक चांगले कॉलेज आहे. त्याचे नावसुद्धा या ठिकाणी समाविष्ट करून घ्या. कारण संस्था ह्या प्रामाणिक पणे शैक्षणिक कार्यात काम करतात आणि महपालिका जेव्हा देते तर खरोखर आपण एक प्रकारचा गौरव करता असे याठिकाणी माझे म्हणणे आहे. कृपया तशा पद्धतीने त्या धोरणामध्ये बदल करावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला असे विचारायचे आहे की, आपल्या शिक्षण अधिकाऱ्यांना विचारायचे आहे की, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये किती इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत? मराठी, हिन्दी, गुजराती असे किती माध्यमांच्या शाळा आहेत हे आपण मला सांगू शकाल का?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

इंग्रजी माध्यमांच्या जवळ जवळ ११० शाळा आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या मिरा भाईंदर नगरपालिकेच्या इंग्रजी मध्यमाच्या किती शाळा आहेत?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमांची एकही शाळा नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्यामध्ये चक्क २१ इंग्रजी शाळांना अनुदान देत आहोत असे आहे. २१ इंग्रजी शाळांना अनुदान देत आहात तर तिथे अपली मुले सातवीनंतर शिकायला जाणार आहेत का?

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

खाजगी संस्थेची शाळा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग त्यांना आपण सातवी नंतर आठवीमध्ये इंग्रजी माध्यमातून शिकवणार आहोत का?

**रतन पाटील :-**

शासनाचे धोरण काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

२१ इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अनुदान देणेबाबत आहे.

**श्री. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

२१ संस्थांच्या शाळा आहेत आणि मनपाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमाची एकही शाळा नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग आपण ह्यांना कसे काय अनुदान देता? कारण काय?

**रतन पाटील :-**

शासनाचे धोरण काय? अनुदान शासन देते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जी. आर. ने इंग्रजी शाळेला अनुदान द्यायला सांगितले पण जी. आर. आपण त्याचा जो उल्लेख केलेला आहे. प्रत्येक शासनाने इंग्रजीच्या कुठल्याही शाळेला अनुदान देता येत नाही. हे पण तसेच आहे आणि जे २१ शाळा आहेत त्या इंग्रजी माध्यमाच्या आहेत.

**लिओ कोलासो :-**

तो जी.आर. जो आहे तो शासनातर्फे मंजुर होणाऱ्या शाळांसाठी आहे. इंग्रजी शाळा आहेत ज्या स्वायत्त संस्था आहेत तर त्या संस्थेला असे अनुदान देण्याचा अधिकार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ठराव दिलेला आहे. ठरावावर मतदान घ्या. मग बघू कोर्टात कोण जाईल आणि नाही.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासनाने ही ह्याच्यात लक्ष घालावे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही कोणाच्या मधे बोलत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही प्रश्न दिलेला आहे आणि तीन महिने झाली तरी प्रशासनाने आम्हाला उत्तर दिले नाही आणि अशाप्रकारे आजची ३१ तारिख जेव्हा वर्ष संपते त्यावेळी आपण हा प्रस्ताव आणता आणि प्रशासन मुकपणे बसलेले आहे. ही गंभीर आहे. कोर्टात आम्ही या प्रभारी अधिकाऱ्यांना सुद्धा नेणार आहोत. आपण येथे लेखापरिक्षक नेमलेले आहेत ते एवढे मोठे ऑडीट करतात आणि हे एक कोटी वापर करताना त्यांची कुठल्याही प्रकारची टिपणी येथे नाही. ही फार गंभीर बाब आहे, या सभागृहासाठी.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हापासुन महत्वाचा मुद्दा चालला आहे की, आता ह्याच्यामध्ये ऑफिस ऑफ प्रॉफिट असा लाभार्थी विषय झाला. शिक्षण संस्थांना अनुदान देण्याविषयीचा विषय स्थायी समितीमध्ये आला होता आणि सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांनी मला बोलले की, मॅडम तुम्ही काय बोलत नाही. तुम्ही अनुमोदन दिले म्हणून बोलत नाही. मॅडम, कुठल्याही विषयाला अनुमोदन देणे हे चुकीचे नसते. मी स्वतः एक शैक्षणिक संस्था चालवत आहे. त्याचे नाव निर्मला निकेतन आहे. आमच्या संस्थेचे उद्दीष्ट सर्वांना माहिती आहे. ह्यापुढे आम्ही असे आणणार आहे की, महिन्याची दिडशे रूपये फी आणि शंभर रूपये ॲडमिशन फी पहिली ते दहावी पर्यंत असे आम्ही लोकांना कॉल दिलेले आहे. तरीपण लाभार्थी म्हणून श्रीम. सोनिया गांधीवर जेव्हा विरोधकांकडून दोषारोपण झाले तेव्हा त्यांनी स्वतःहून आपल्या पदाचा राजीनामा दिला तर सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी माझ्यावर जो आरोप केला की, आपण अनुमोदन दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शहा आरोप नाही.

**रिटा शहा :-**

आपण माझे ऐकून घ्या.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्या रिटा शहा मॅडम हे आपल्याला उगाच घाबरवत आहे. असे काही होणार नाही. आपल्याला हे मुद्दामुन घाबरवत आहे आपण घाबरू नका.

**रतन पाटील :-**

आम्हाला कोणाला घाबरवायच नाही. घाबरवायचा प्रश्न येत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

घंगाळेच्या प्रकरणामध्ये असेच झाले होते. घंगाळेचा ठराव आम्ही रद्द करून दाखवला आहे.

**रिटा शहा :-**

मॅडम, आता पुष्कळ चाललेले आहे. सर्व बोलले, आम्ही कोणाच्या मध्ये बोलत नाही. सभागृहाने सर्वांचे ऐकून घ्यावे अशी नीतीमत्ता बाळगायला पाहिजे. सर्वांना बोलायची संधी द्यायला पाहिजे मागून त्यांनी सांगितले लाभार्थी म्हणून असे श्रीम. सोनिया गांधी ह्यांनी राजीनामा दिला. तर निर्मला निकेतन म्हणून मी एक संस्था चालवते. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये तीन निवडणूका झाली आणि त्या तिन्ही निवडणूकांमध्ये नगरसेविका म्हणून मी या सभागृहामध्ये बसलेली आहे आणि तिन्ही सभागृहामध्ये मागचे दोन वर्ष सोडून आपण हे अनुदान देत आहात. त्याच्यामध्ये मुख्यत्व अभिनव स्कुल, जे.एच. पोद्दार स्कुल, नाझरेथ स्कुल, सरस्वती विद्या मंदिर ह्या चार पाच मोठ्या मोठ्या शाळा आहेत. त्या शाळांना आपण नेहमी अनुदान दिलेले आहे. शंकर नारायण ट्रस्ट जे कॉलेज आहे तर त्यावेळी गिल्बर्ट मेन्डोन्सा साहेब हे नगराध्यक्ष होते तेव्हा त्यांनी त्या कॉलेजला चार लाख रूपये दिले होते. अशा सर्व शैक्षणिक संस्थांना आपण अनुदान दिलेले आहे. नगरपालिका असताना आणि आज महानगरपालिका असताना हे पहिल्यांदा चालले आहे. पण आता नेमका ह्याच्यामध्ये असा भाग निर्माण झालेला आहे की, पेपरामध्ये ही आले आणि सहारा न्युजमध्ये ही रिटा शाहचे नाव घेतलेले आहे की, रिटा शाहने अनुदान मागितले आहे. आम्ही काय खोट बोलत नाही आणि चोऱ्या करत नाही. आमची संस्था चालते आणि बेधडक चालते आणि आम्ही चांगले काम करतो. हे आम्ही ठामपणे सभागृहात सांगतो आणि गरीब मुले आमच्याकडे आल्यावर त्यांची आम्ही मदतही करतो परंतु रिटा शाह ची शाळा आहे आणि त्याच्यामध्ये माझा काही लाभ आहे किंवा प्रॉफिट आहे व मी नगरसेविका आहे म्हणून

मुद्दामुन मी माझ्या स्वतःचा वशीला लावून करून घेतला आहे असे काय साबित होत नाही आणि जर असे साबित हो असेल तर येथे रिटा शाह पहिल्यांदा अनुदान मागायला आली आहे आणि नगरपालिका असताना ही आम्ही अनुदान मागितले आहे. तेव्हा आम्हाला २५ हजाराचे साधे अनुदान मिळाले होते. परंतु, २५ हजार मोठे नसते तर संस्था मोठी असते. त्याच्यामध्ये हजारो विद्यार्थी आमच्याकडे शिकतात. परंतु, अभिनव शेतकरी मंडळाची संस्था, जे. एच. पोद्दारची संस्था, अव्हर लेडी ऑफ नाझरेथ संस्था ह्यांना जो काही अनुदान मिळणार आहे तो नगरसेवकांना मिळणार नाही किंवा ते त्यांच्या घरी घेउन जाणार नाही. त्या संस्थेमध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी त्याचा वापर होणार आहे. ते अनुदान दिल्यानंतर त्या संस्थेकडून आपण परत ऑडीट रिपोर्ट मागवणार आहोत. त्यांनी दिलेल्या पैशाचे विनियोग कुठे केला ते त्यांनी सादर करावयाचा आहे आणि पुढे त्यांनी विनियोग सादर केले नाही तर पुढच्यावेळी जेव्हा अनुदान देणार आहे तेव्हा त्यांना लॅप्स करायचे आपल्याकडे नगरपालिका असताना पासुनचे चालू आहे. परंतु, आजच्या महापालिकांमध्ये आपण असे चित्र उपस्थित करण्याचे ठरविले आहे की, सर्व नगरसेवक मिळून एक करोड रूपये जे अनुदानाचे आहे ते आपण भेटून - कुठून कसेही आपल्या घरी न्यायचे आहे असे चित्र निर्माण झालेले आहे. तर या हिशोबाने मी संस्था चालवते आणि माझ्यावर दोष येउ नये म्हणून त्या निर्मला निकेतन संस्थेला आपण जे अनुदान जाहिर केलेले आहे. ते अनुदान रद्द करा अशी मी मागणी करत आहे आणि येथे बसणारे नगरसेवक जे ऐक मेकांवर असे दोष लावतात त्यांनी सुद्धा अशी डेरींग करावी की, आम्ही या संस्थेशी संलग्न आहोत. तर आमचेही अनुदान रद्द करा अशी मी स्वतःहून चेअरपर्सन म्हणून मागणी करत आहे. दुसरे आता येथे एक मुद्दा उपस्थित झाला की, मराठी माध्यम, गुजराथी माध्यम, हिंन्दी माध्यम, इंग्रजी माध्यम आज येथे ऐंशी नगरसेवक बसलेले आहेत आणि जेवढे नगरसेवक बसलेले आहेत त्यांची मला वाटते की, जास्तीत जास्त सर्वांची मुले इंग्रजी शाळेत जाउन शिकतात. इंग्रजी म्हणजे इंटरनॅशनल भाषा झाली. मराठी म्हणजे महाराष्ट्रीयन भाषा झाली, हिंन्दी म्हणजे राष्ट्रीय भाषा झाली आणि गुजराती म्हणजे गुजराती लोकांची मातृभाषा झाली. कुठल्या भाषेमध्ये शिक्षण घेतले हे महत्वाचे नसते. साधे गुजराती माध्यमामध्ये शिकलेला माणूस ही इंजिनिअर होतो. मराठी/हिंदी माध्यमात शिकलेला माणूसदेखील इंजिनियर होतो. म्हणजे आपण भाषेचा जो दुजाभाव काढलेला आहे ते चुकीचे आहे. शिकलेल्या माणसाला हे शोभा देत नाही की, ह्या भाषेचे शिक्षण आहे म्हणून त्याला अनुदान द्यायचे आणि इंग्रजी भाषेचा असेल तर त्याला अनुदान द्यायचे नाही. शिक्षण हे शिक्षण असते आणि आपण येथे जे काय बोलतो ते विचार करून बोलायला पाहिजे आणि श्रीम. सोनिया गांधी ह्यांना लाभार्थी म्हणून हे केले आहे. भारतातील राजकारणामध्ये त्यांनी उदाहरण स्पष्ट केलेला आहे. त्या आमच्या श्रीम. सोनिया गांधीचे मी येथे अभिनंदन व्यक्त करते आणि माझे वक्तव्य संपवते. धन्यवाद.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, साहेब, मघाशी मी आपणाला असा प्रश्न उपस्थित केला होता की, आपल्याला प्रशासनाला आपल्या नियमामध्ये अनुदान देता येते की नाही. त्याचा आपल्याला खुलासा करायला सांगितला होता. त्याचा जर खुलासा केला असता......

**मिलन म्हात्रे :-**

धोरण, खुलासा नाही.

**रतन पाटील :-**

धोरण.

**परशुराम पाटील :-**

माझा प्रश्न तोच आहे अनुदान देता येईल की, नाही. हा खुलासा आपण जर केला असता तर हा एवढा आपल्याला ठरावाचा प्रश्न आलाच नसता. माझे मत असे आहे की, आपण थोडक्यात खुलासा करावा. अनुदान देता येईल की नाही. मग हा ठराव असो किंवा नसो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तीन महिन्यापुर्वी तोच प्रश्न विचारलेला आहे. अजून उत्तर देत नाही.

**परशुराम पाटील :-**

आपल्याला शाळेला अनुदान देता येईल की, नाही. कोणत्या शाळेला अनुदान देता येते? प्राथमिक शाळांना देता येते की, हायस्कुलला देता येते? आपल्याला नियमानुसार अनुदान देता येईल का?

**मा. आयुक्त :-**

शैक्षणिक संस्थांना अनुदान देण्याकरिता कायद्यामध्ये तरतुद आहे.

**परशुराम पाटील :-**

म्हणून सांगतोय, साहेब आपण त्याचा खुलासा करा. हा ठराव आहे, तो ठराव आहे. हा ठराव मंजुर करा, हे करा, असा प्रश्न उपस्थित झालाच नसता. नियम सांगा. बाकीचे काही नको.

**शिवप्रकाश भुदेका :-**

विरोधी पक्ष नेता, अनुमोदन देने से पहिले आपको आयुक्त साहब को यह पुछना चाहिए था।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर व सन्मा. सदस्या रिटा शहा ह्यांनी मांडलेला ठराव फेटाळण्यात येत आहे. तसेच सन्मा. सदस्य रोहीदास पाटील व सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी मांडलेला ठराव मतदानाला घेण्यात यावा.

**नितिन ठाकुर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो, मॅडम मतदानापुर्वी दोन शब्द बोलायचे आहे. आज सभागृहामध्ये आपण जो विषय अनुदानाचा आणलेला आहे. त्याबद्दल मी तुम्ही सर्व सभागृहाचे जे सदस्य आहेत त्यांचे अभिनंदन करतो. आज सर्व सभासद जागृत आहेत माझ्या मते मिरा भाईंदर शहरातील विद्यार्थ्यांसाठी हा विषय आहे. शहरातील विद्यार्थी प्रत्येक वेगवेगळ्या संस्थेमध्ये, शाळेमध्ये जाउन शिक्षण घेत आहेत. त्यांचा भार कमी होण्याकरिता आपण त्यांना मदत करत आहोत आणि ती आपल्या शहरातील मुले आहेत.त्यांच्याकरिता आपण हा खर्च करणार आहोत जे अनुदान असेल ते व प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी आहे. त्याच्या करिता आपण सगळे जागृत आहोत. पण गेल्या दोन तीन वर्षापासून आपल्या शहरामध्ये स्टेट लेव्हलला तायक्वांदो स्पर्धा होते, महापौर चषक होतो त्याला आपण १५ ते २० लाख रूपये खर्च करतो. तो खर्च स्टेट लेव्हलचे जे खेळाडू आहेत त्यांच्यावर होतो. तेव्हा कोणी सदस्य त्याची चौकशी करत नाही आणि आपल्या येथील जी स्थानिक मुले आहेत त्यांना चांगले शिक्षण मिळावे. ज्या संस्था आहेत त्या फायनान्शियली विक आहेत त्यांना हे अनुदान मिळून ते व्यवस्थित कॅपेबल होउन त्या मुलांना व्यवस्थित शिक्षण मिळावे ही सभागृहाची भावना आहे. आपण तेव्हा तिथे बोलतो, आपसामध्ये बोलतो, आपल्या मुलांकरिता आपण बोलतो. तर माझे म्हणणे असे आहे की, आपल्या सर्व सदस्यांनी जागृत व्हायला पाहिजे की, आपण हा जो खर्च करतो तो आपण स्टेट लेव्हलच्या खेळाडूंवर न करता आपण लोकल लेव्हल वर स्पर्धा घ्याव्यात. त्यांच्यावर खर्च करावा. आपली मुले येथे पुढे येउ द्या. त्याना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांच्यावर आपण १५ - २० लाख रूपये खर्च करा. आपण जो महापौर चषक भरवतो तर त्याबाबत माझी अशी सुचना आहे की, ह्या वर्षी आपण स्टेट लेव्हल न घेता मिरा भाईंदर शहरातील मुलांकरिता घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, आम्हाला नगरसचिवांनी खास महासभासंबंधी जे सुचना पत्रक देण्यात आले त्याबद्दल मी आपणाला सांगू इच्छितो की, खास महासभेमध्ये एकच विषय ठेवण्यांत आला आहे. मी परत परत सांगू इच्छितो की, ही सरन्डेर कम्पलिट नाही. यासंबंधी मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सी. जे. ठक्कर साहेबांनी स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये सरन्डेर क्लिअर म्हणजे क्लिअर नोटीस म्हणजे काय? त्यावेळी देखील अभय योग नावाचे वकील त्या केसमध्ये उपस्थित होते. ही ठाणे महानगरपालिकेची केस आहे आणि महाराष्ट्र लॉ जनरलमध्ये ही केस रिपोटर झालेली आहे. आज श्री. अभय योग साहेब देखील मुंबई हायकोर्टामध्ये जज आहे तरी आपण कृपया सरेन्डेर क्लिअर नोटीस नाही व ह्या विषयपत्रिकेवर हा विषय आणलेला आहे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. तरी देखील आमच्या नगरसचिव साहेबांनी आम्हाला एक शुद्धीपत्रक पाठवलेले आहे. परत त्याचे शुद्धीपत्रक करण्यात आले व त्याठिकाणी शैक्षणिक हा शब्द वापरण्यात आलेला आहे. पण मा. आयुक्त साहेबांच्या गोषवाऱ्यामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये, शेवटच्या लाईनमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील संस्थांना त्याठिकाणी मात्र त्यांनी शैक्षणिक हा शब्द वापरलेला नाही. मी आपल्याला पुन्हा पुन्हा सांगु इच्छितो की, सेक्शन ६६ चा २१ कलम आपण पुन्हा वाचा. फर्दर एज्युकेशन ऑब्जेक्टस अदर दॅन दोस मेंन्टेन इन क्लॉसेस ऑफ द सेक्शन ६३ ॲन्ड मेक हीम टू द एज्युकेशनल इन्सटीट्यूशन विदीन ऑर विदाउट द सिटी हे जे बोलत होते, मिरा भाईंदर महपालिका तर महापालिकेच्या हद्दीमध्ये असे कायद्यामध्ये नाही. जर एखादी शाळा आपल्या हद्दीच्या बाहेर असेल आणि ती शैक्षणिक संस्था जर चांगले काम करत असेल तरी आपण अनुदान देउ शकतो. पण सब्जेक्ट टू ६३(१५) मध्ये त्याचा उल्लेख स्पष्टपणे आहे. मेंन्टेनिंग इन गीविंग ग्राउन्ड किंवा सहायता करणे एन्ड सुटेबली अकोमोडेटीव स्टॉक ऑफ द प्रायमरी एज्युकेशन. याठिकाणी सेकंडरी एज्युकेशनला नाही. देशाच्या संविधानामध्ये, लोकसभेमध्ये देखील हा निर्णय घेण्यात आला की मुलींना पहिले ते बारावीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात यावे. आज मिरा भाईंदर महानगरपालिकांमध्ये २९ महानगरपालिकेच्या शाळा असुनदेखिल आजपर्यंत आमच्या शाळांमध्ये संगणक नाही. त्याबद्दल आपण कधी विकास करण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घेतलेला नाही.

**लिओ कोलासो :-**

संगणकाकरिता बजेटमध्ये आता प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये दोन ठराव आलेले आहेत. त्या ठरावाच्या पुढील कार्यवाहीकरिता मा. सचिवांना आपण आदेश द्यावे.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला बोलू द्या.

**मा. महापौर :-**

सचिव ठराव मतदानाला घेण्यात यावा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी बोलत असताना सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब बोलायला उभे राहिले आता म तुमच्याकडे तक्रार केली का? मी बोलत असताना सभागृह नेते उभे राहतात.

**हॅरल बोर्जिस :-**

सन २००५-०६ या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये ५० लाख रूपये आपण आपल्या शाळांसाठी ठेवलेले आहे आणि तो निधी फक्त मा. आयुक्त साहेबांनी संगणक प्रशिक्षणासाठी आपल्या महापालिकेच्या २९ शाळांसाठी अनुदान ठेवलेले आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की मा. महापौर मॅडम आमचा जो ठराव फेटाळण्यात आलेला आहे. तर माझा आपल्यावर ठाम आरोप आहे की, अशी शैक्षणिक संस्था जी मुलांच्या आरोग्याशी खेळत आहे किंवा त्यांच्या भविष्याशी खेळत आहे. अशा लोकांना आपण सहकार्य करत आहात.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सौ. मुक्ता रांजणकर मॅडम ह्यांनी काय ठराव ठेवला. कृपया तो ठराव सभागृहाच्या पुढे वाचण्यात यावा. जर तो ठराव चांगला असेल, विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून असेल तर तो फार महत्वपुर्ण आहे. कृपया तो ठराव ही मतदानाला टाकण्यात यावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर.....

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, चॅप्टर ६ मध्ये आपण वाचा. चॅप्टर ६ काय म्हणते. याठिकाणी फक्त महापौरांनी निर्णय घ्यायचा आहे. सभागृहाने नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. मी आता बोलत आहे ना.

**रोहीत सुवर्णा :-**

महानगरपालिकेचे प्राधिकरण व महानगरपालिका प्राधिकारी अधिकारी ह्यांच्या कर्तव्यामध्ये, आमच्या कर्तव्यामध्ये ते नाही. कृपया आयुक्तांनी त्याचा खुलासा करावा की, चॅप्टर ६ हे आम्हाला लागू नाही. त्यांना लागू आहे. प्रशासनाला लागू आहे. प्रशासनाने ह्या गोष्टीचा खुलासा करावा की, शैक्षणिक संस्था आहेत की प्रत्येक संस्थांना अनुदान देणार आहेत ते क्लिअर केल्यानंतर एक धोरण ठरवा त्याच्यानंतर आपण योग्य तो निर्णय घ्यावा. अन्यथा आम्ही सगळे कोर्टात जायला तयार नाही. उद्या आम्हाला अडचणीत आणू नका. आयुक्त आज येथे आहे आणि परत कुठेतरी प्रिन्सीपल सेक्रेटरी मंत्रालयामध्ये जातील. आर.डी. शिंदे साहेबांनी सुद्धा हेच केले होते.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा कुठे जाणार नाहीत. कारण ते ठराव मांडू शकत नाही. ते ठरावाला मतदान करणार नाहीत आणि ठराव मांडू शकणार नाही. त्यामुळे आपण टेन्शन घेउ नका.

**रोहीत सुवर्णा :-**

अहो साहेब, तुमच्या मंदिराचे तीन वर्षापासून ऑडीट झालेले नाही. ज्या संस्थेचे आपण नाव दिलेले आहे त्या संस्थेचे.

**मोहन पाटील :-**

पण आपल्याला ठराव मांडायचा नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपको मतदान करनेका भी नही है।

**रोहीत सुवर्णा :-**

तुमच्या संस्थेचे ऑडीट झालेले आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते, आपण सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा ह्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे तरीसुद्धा तुमचे सदस्य का म्हणून उठतात? फक्त त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. आम्हाला बोलण्याचा अधिकार नाही का? ते असे मधेमधे का बोलतात?

**रोहीत सुवर्णा :-**

त्यांच्या स्वतःच्या संस्थेचे ऑडीट झालेले नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

कॉप सदस्य को मतदान करने का अधिकार नही है।

**नयना म्हात्रे :-**

आपण आम्हाला सांगता की, प्रत्येकाला बोलण्याची संधी देण्यात येईल आणि आम्हाला संधी दिल्यानंतर तुमचे सदस्य बोलायला कशाला उठतात?

**रोहीत सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, आपल्या संस्थेचे ऑडीट झालेले आहे का? आपण नेहमी बोलता. तीन चार वर्षापुर्वी आपण अनुदान घेतले आणि ती संस्था बंद केली. त्याचे स्वतःचे मंदिर आहे त्या मंदिरामध्ये....

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, खर बोलल की मिरची लागते. खर बोलणऱ्याला बोलू देत नाही. फक्त खोटे माणसांनी अर्धा-अर्धा तास बोलायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मुक्ता रांजणकर मॅडम ह्यांचा जो ठराव आहे. आपण फेटाळा. पण त्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. पहिल्यांदा त्यांचा ठराव आपण वाचून दाखवा. त्यांची संमती घ्या. अन्यथा असा कोणाचाही ठराव फेटाळता येत नाही. त्यांनी हरकती घेतली आहे की, आपण हा ठराव कसा फेटाळता?

**मा. महापौर :-**

ठराव फेटाळण्याचा अधिकार आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

ठराव फेटाळण्याचा अधिकार आहे पण तो ठराव का आहे तो वाचून दाखवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण डायरेक्ट सुचना फेटाळू शकतात. पण ठराव फेटाळू शकत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया आपण आपला गोंधळ बंद करा व ठराव वाचताना लक्ष द्या. म्हणजे आपल्याला व्यवस्थित ठराव ऐकायला येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ऐकतोय. आपण सूचना फेटाळू शकतात पण ठराव फेटाळू शकत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

सभागृहामध्ये एकदा ठराव आला तो तुमच्या टेबलावर आला आहे. तो ठराव सभागृहाला समजायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपल्याला मा. महासभेला ठराव फेटाळण्याचा अधिकार नाही.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने, सुचक मुक्ता रांजणकर व अनुमोदक रिटा शाह ह्यांनी जो ठराव दिलला आहे तो ठराव मा. महापौर मॅडमच्या परवानगीने वाचून दाखवतो. मा. भारती शाळा ही मुलांच्या आरोग्याशी खेळणारी व खोटे धंदे करणारी तसेच, सुनामीसारख्या प्रसंगाच्या नावाने मुलांकडून पैसे उकळणारी संस्था आहे. त्यांच्या शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नाही. तसेच, मुलांना शौचास जाण्याकरिता पाण्याची सोय नाही. भरमसाठ फी आकारून ही पावती दिली जात नाही. अशा संस्थेचे ऑडीट खोटे आहेत. असा माझा समज आहे तरी अशा शाळांचे अनुदान रद्द करून ते अनुदान मनपा शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी करण्यांत यावा असा ठराव मांडत आहे. असा सन्मा. सदस्यांचा ठराव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सुचक, अनुमोदक कोण आहे?

**नगरसचिव :-**

श्रीम. मुक्ता रांजणकर मॅडम सुचक आहेत व अनुमोदक रिटा शाह मॅडम आहेत.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, ह्याचा खुलासा मी आपल्याकडून ही मागी कारण ही चित्रफित मी तुम्हाला दाखवीली होती व ही चित्रफित आपण ही बघितली आहे. हे आपल्याला योग्य वाटते का, की अशा संस्थांना आपण अनुदान दिले पाहिजे हे आपल्याला योग्य वाटते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि त्यात उल्लेखही केला आहे की, तीन वर्षाचे ऑडीट झालेले नाही. असे किती जणांचे ऑडीट झालेले नाही. म्हणजे प्रत्येकांचा आपण ठराव फेटाळणार आहात का? आता उल्लेख केला की, तीन वर्षाचे

ऑडीट झाले नाही म्हणून फेटाळण्यात येत आहे. आयुक्त साहेब, आपण ही प्रत्येक गोष्ट विचारात घेउन निर्णय घ्यायचा आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, मनपाच्या शाळांना त्या ७५ हजार रूपयाच्या अनुदानाची गरज नाही का? ते ७५ हजार रूपये आपल्या मनपाच्या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या कामाला येतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मुक्ता रांजणकर आपण जे नियम ठरवलेले आहेत त्या नियमात जर ती शाळा बसत नसेल तर त्यांना आपण अनुदान देणार नाही. शिफारस केली आहे ती सभेपुढे आणली आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, शिफारस केली आहे व ती शिफारस सभेपुढे आणण्यात आली आहे. मी देखील तेच बोलते शिफारस केले आणि सभेपुढे आणण्यात आले तर ॲक्च्युअली सभेपुढे ही आणायला नको होते. कारण की, ह्यांनी ही चित्रफित बघितलेली आहे म्हणून मी तुमच्यापुढे ही चित्रफित आणली आहे. का, ही चित्रफित सन्मा. सभागृहाला दाखविण्यांत यावी आणि मग त्यांना ठरवू द्या की, ह्या शाळेला अनुदान देणे योग्य आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीमध्ये तो ठराव कायम झालेला आहे. त्याला जवळ जवळ अर्ध कायदेशीर स्वरूप प्राप्त झालेले आहे. स्थायी समितीमध्ये, माझ्या भाषणात बोललो की ठराव आला त्यावेळेला लिस्ट फायनल झाली. त्यावेळी प्रशासन काय करत होते? आता हा विषय संपलेला आहे. तुमचा तीर निघालेला आहे. आपण मतदान घ्या. यस-नो करा. आम्ही चाललो आमच्या घरी.

**मा. महापौर :-**

मा. भारती एज्युकेशन ट्रस्टला ७५ हजार रूपयाचे जे अनुदान ह्या ठरावात मांडलेले आहे ते कॅन्सल करण्यात यावे. सन्मा. सदस्या आपण आपला ठराव मागे घ्यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६ करिता तीन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव श्रीम. मुक्ता रांजणकर व अनुमोदक रिटा शाह ह्यांचा होता. त्यांनी त्यांचा ठराव मागे घेतलेला आहे. दुसरा ठराव सुचक रोहीदास पाटील व अनुमोदक ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा आहे आणि तिसरा ठराव सुचक हॅरल बोर्जिस...

**रोहीत सुवर्णा :-**

मॅडम, ठराव रद्द झाल्यानंतर परत मागे घेता येते का? आपण एकदा रूलिंग दिली की, सदरचा ठराव रद्द करण्यात येत आहे. परत ठराव मागे. आपण ठराव फेटाळला होता.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी ठराव स्वतःहून मागे घेतलेला आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

नंतर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपण रूलिंग दिली आणि आपण ठराव रद्द केल्यानंतर त्यांनी ठराव मागे घेतलेला आहे असे नाही. कंडीशनली असा ठराव मागे घेतला जात नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

आपण एका बाजूने ठराव फेटाळला आणि आपणच बोलता की, त्यांनी ठराव मागे घेतला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना तुम्ही तो ठराव कंडीशनली मागे घ्यायला लावला.

**रोहीत सुवर्णा :-**

त्यांनी ठराव मागे घेण्यासाठी तुमच्यावर दबाव आणला. मतदानाला ठेवू नका मग तुम्ही तो ठराव मागे घेतला. ही अशी कशी पद्धत आहे? म्हणजे आपण माँ भारती ह्या एकाच शाळेला ग्रॅन्ड देणार नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

मी कोणाच्याही दबावाखाली ठराव मागे घेतलेला नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य रोहीत सूवर्णा इतनी किसकी वकीली करने की जरूरत नही है। सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर इन्होने खुद से अपने आप से ठराव पिछे लिया है। जो उनको मंगता था वही रूलिंग मा. महापौर मॅडमने दी है।

**रोहीत सुवर्णा :-**

लेकिन अभी उन्होने कहा ना की, मै ठराव पिछे नही ले रही हूँ।

**मुक्ता रांजणकर :-**

मैने बोला के मै ठराव पिछे ले रही हूँ। मुझपर किसका कोई दबाव नही है। और मुक्ता रांजणकरने आपसे खुलासा नही मांगा । मेरी वकीली करने के लिए नही बोला है। मुक्ता रांजणकर खूद कर सकती है।

**रोहीत सुवर्णा :-**

सचिव साहेब, आपण आम्हाला सांगा की, त्यांच्या ठरावाचे काय झाले?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मुक्ता रांजणकर मॅडम आता आशा बोलल्या की, माझी कुणी वकीली करायची नाही. तर रोहीत सुवर्णांकडे वकीली शिकायला माझ्या घरी कशाला यायच्या?

**रोहीत सुवर्णा :-**

ते माझ्या घरी येत होत्या. माझ्याकडे आलेल्या आहेत.

**नयना म्हात्रे :-**

बिल्डर लोकांची कुंडली काढायला ते माझ्या घरी येत होत्या. त्याच्यामध्ये ती वकीली नाही का?

**रोहीत सुवर्णा :-**

ती वकीली नाही? मग कशाला माझ्याकडे येत होत्या?

**नयना म्हात्रे :-**

कशाला सभागृहापुढे हे ढोंग करता?

**रोहीत सुवर्णा :-**

सचिव साहेब, सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर मॅडम ह्यांनी आपल्याकडे ठेवलेला ठराव हा मा. महापौर मॅडम ह्यांनी फेटाळला. त्याच्यानंतर...

**हॅरल बोर्जिस :-**

मॅडम, आपण कृपया विषयाला धरून चालावे.

**रोहीत सुवर्णा :-**

सभागृह नेते साहेब, आपण मला हे सांगा ना.....

**नगरसचिव :-**

तिसरा ठराव सुचक हॅरल बोर्जिस व अनुमोदक परशुराम पाटील, ह्यांचा ठराव मतदानाला टाकण्यात येत आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

सचिव साहेब, सन्मा. सदस्यांचा ठराव रद्द केला की मंजुर केला की मागे घेतला? काय झाले त्या ठरावाचे ते तरी आपण सांगा. मा. महापौर मॅडमनी सांगितले की, ७५ हजार रूपये द्यायचे नाही म्हणून त्यांनी ठराव मागे घेतला की, काय? त्याचा खुलासा करा ना. त्यांचा ठराव आहे. येथे टेबलावर आलेला तो ठराव आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, त्या ठरावाला मी अनुमोदन केलेले आहे. त्या ठरावाबद्दल मी खुलासा करते.

**रोहीत सुवर्णा :-**

आपण तो ठराव मागे घेता की, काय?

**रिटा शाह :-**

हमने जो आपको ठराव दिया। वह ठराव आपने पढा। पहिले मा. महापौर मॅडम बोलल्या की, मी तो ठराव फेटाळलेला आहे. त्यानंतर सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर मॅडम ह्यांनी सांगितले की, सी.डी. आहे ते आपण बघा अशी त्यांनी रिक्वेस्ट केली, विनंती केली की, मा. महापौर मॅडम आपण ते बघा आणि शेवटी निर्णय/रूलिंग देण्याचा अधिकार आपला आहे. आम्ही तुमच्याकडे विनवणी केली की, आपण ती कॅसेट बघा आणि तुम्हाला जर वाटत असेल की, ते सर्व योग्य आहे की अयोग्य आहे आणि अजूनही आमचा ठराव तुमच्याकडे आहे. आम्ही ठराव मागे घेतला की, नाही. पण आपल्या आदेशाने, आपल्या रुलिंगचे आम्ही मान ठेवणार. आपण जो योग्य निर्णय घेणार तो निर्णय आम्हाला मान्य आहे आणि आपण निर्णय दिलेला आहे तो मान्य आहे. आपल्याला ही सी.डी. बघून वाटत असेल की, ही शाळा योग्य आहे तर आपण त्यांना अनुदान द्या किंवा आपल्याला ही सी.डी. बघून वाटत असेल की, ही शाळा योग्य नाही तर आपण त्यांला अनुदान देउ नका. शेवटी, हा निर्णय घ्यायचा मा. महापौरांचा अधिकार आहे आणि तो अधिकार आम्ही आपल्याला देत आहोत.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझे तेच म्हणणे आहे की, आपण ठराव फेटाळला की त्यांनी तो ठराव मागे घेतला आहे. काय आहे? कारण हे सर्व प्रोसिडींगमध्ये येणार आहे म्हणून मी बोलत आहे. आपण रूलिंग दिली की सदस्यांचा ठराव फेटाळण्यात आला. त्यानंतर आपण ७५ हजार रूपयांबद्दल काय बोलतात की, त्यांचे ७५

हजार रूपये त्यांना अनुदान देण्यात येणार नाही. मग त्याच्यानंतर आपण बोलतात की, त्यांनी ठराव मागे घेतला तर ठराव मागे घेतला की रद्द झाला, काय आहे? हे नगरसचिव साहेबांनी आम्हाला सांगावे.

**लिओ कोलासो :-**

त्यांनी ठराव मागे घेतला.

**रोहीत सुवर्णा :-**

सचिव साहेब, आपण सांगा ना. सचिव साहेब आपण असे सांगा की, सन्मा. सदस्यांनी ठराव मागे घेतला.असे तुम्ही सांगा ना.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांनी ठराव मागे घेतला असे त्यांनी म्हटले आहे.

**रिटा शाह :-**

नाही. साहेब, आपण चुकीचे बोलता की ........

**रोहीत सुवर्णा :-**

बघितल, बघितले. आता बोलतात की चुकीचे बोलता.

**रिटा शाह :-**

मॅडम, मी काय बोलली त्याचा त्यांना अजून समज येत नाही. पहिल्यांदा आपल्याकडे ठराव आला. त्या ठरावार आपण रुलिंग दिली की, तो ठराव फेटाळला. त्यानंतर त्यांनी तुमच्याकडे विनवणी केली की, मॅडम त्या शाळेची परिस्थिती दुःखदायक आहे आणि त्याची सी.डी. माझ्याकडे उपलब्ध आहे. त्या हिशोबाने त्या ठरावाचे अनुमोदन माझे आहे. हा अधिकार आपणाला आम्ही दिलेला आहे की महापौरांच्या हिशोबाने हा अधिकार आपला आहे. कुठल्या ठरावावर काय निर्णय घ्यायचा आहे हा अधिकार आपला आहे. त्या अधिकाराचा वापर करुन आपण जाहिर केले की, त्यांना जे ७५ हजार रुपये अनुदान दिलेले आहे ते आपण कॅन्सल केलेले आहे आणि आपण निर्णय दिल्यानंतर सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर ह्यांनी आपला ठराव मागे घेतला. तर ठराव कशाला मागे घेतला? कारण की त्यांनी जे ठरावामध्ये दिलेले होते व त्याबाबत आपण रुलिंग दिलेले आहे आणि तसे रुलिंग झाल्यामुळे त्या ठरावाचा काय अर्थ राहिला नाही. म्हणूण तो ठराव मागे घेतला आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

मॅडम, मी तेच बोललो. ठराव मागे घेतला आहे. ठराव फेटाळला.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, मी आयुक्त साहेबांबरोबर सुसंवाद साधलेला आहे. त्यांनी आपणाला वस्तुस्थितीची जाणीव करुन दिलेली आहे आणि त्या अनुषंगाने मी ठराव मागे घेतलेला आहे.

**मा. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६ साठी सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदक श्री. परशुराम पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाचे मतदानापूर्वी वाचन करत आहे.

(सदर ठरावाचे सभागृहासमोर वाचन करण्यात आले.)

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण कोणता ठराव मांडता?

**मा. नगरसचिव :-**

पहिल्यांदा दुसरा ठराव मतदानाला टाकण्यात येत आहे.

**रोहीदास पाटील :-**

आम्ही तुमच्याकडे ठराव दिला आमचा ठराव फेटाळला आणि मग तुम्ही दुसरा ठराव घ्या.

**मा. नगरसचिव :-**

शेवटचा ठराव पहिल्यांदा मतदानाला येणार.

**रोहीदास पाटील :-**

का?

**मा. नगरसचिव :-**

शेवटचा ठराव पहिल्यांदा मतदानाला घेतला जातो. नंतर आपला ठराव मतदानाला घेण्यात येईल.

**रोहीदास पाटील :-**

धोरण न करता अनुदान देता येते असा ठराव घेता?

**मा. नगरसचिव :-**

मतदानासाठी घेत आहे.

**रोहीदास पाटील :-**

तो ठराव नीट व्हायला पाहिजे. एकतर ही सभा ठरवेल की, धोरण ठरवणे आणि धोरण हे ठरलेच नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, धोरण हे निश्चित केलेले आहे.

**रोहीदास पाटील :-**

कोणत्याही संस्थेचे नाव घ्यायच्या आधी हे धोरण ठरले आहे असे होईल तर व्हॅल्यु आहे. नाहीतर, आपण हे जे अनुदान देत आपण ते बेकायदेशीर आहे. पहिल्यांदा धोरण आणि मग ज्या संस्थेला द्यायचे. मग आम्ही ठरवू ते.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा अनुदानाचा प्रश्न उद्‌भवित झाला. ते काम प्रशासनानेच केलेले आहे. जेव्हा साडेचार लाखासाठी........

**रोहीदास पाटील :-**

जेव्हा त्यांना द्यायचे असेल तरीपण त्यांचे धोरण पहिल्यांदा वाचले पाहिजे.

**रिटा शाह :-**

मॅडम, मी धोरणाबद्दलच बोलत आहे.

**मा. नगरसचिव :-**

धोरण वाचून दाखवतो.

**रोहीदास पाटील :-**

धोरणावर चर्चा होईल. तो तसा ठराव ठरेल आणि नंतर आम्ही सांगतोय की आमचा ठराव येईल.

**मा. नगरसचिव :-**

अनुदानासाठी जे धोरण दिलेले आहे. सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदक श्री. परशुराम पाटील ते धोरण पहिल्यांदा मी वाचत आहे (१) संस्था मिरा भाईंदरमधील असावी, (२) संस्थेचे सर्व प्रकारचे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कराचा भरणा केला पाहीजे, (३) मिरा भाईंदर महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कार्यवाही नसली पाहिजे, (४) संस्थेचे किमान तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट कम्पलसरी आहे, (५) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळामधून इयत्ता सातवी नंतर आठवीच्या वर्गासाठी विनामुल्य प्रवेश संबंधित संस्थांनी महापालिकेच्या विद्यार्थ्यांना द्यावा व तसे लेखी हमीपत्र अनुदान देणाऱ्या संस्थांकडून द्यावे, (६) अनुदान घेणाऱ्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी मिरा भाईंदर महापालिकेचा स्वतःचा कोटा (रिझर्व्हेशन) असावे. एवढी अशी धोरणे आहेत.

**रोहीत सुवर्णा :-**

त्या संस्थेचे संचालक आणि संस्थापक ह्यांचे कॅरेक्टर सर्टीफिकेट घेतले जावे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, इसमे जो प्रस्ताव दिया है उसमे भी एक शिक्षण संस्था का ५५ टक्का उसका रिझर्व्ह लगना चाहिए ऐसा है। ५५ टक्का से अबाव्ह।

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याच्यामध्ये आपले महत्वाचे राहिले. धर्मदाय आयुक्त हिशोबाने रजिस्ट्रेशन असायला पाहिजे. तर मान्यताप्राप्त ही शाळा असायला पाहिजे. तो महत्वाचा मुद्दा आहे. नंतर हा मुद्दा निर्माण होणार. कारण ती शाळा दहावीपर्यंत असायला पाहिजे ते ही महत्वाचे आहे आणि शाळेचा दहावीचा रिझल्ट किमान ५० टक्के तरी यायला पाहिजे आणि चौथा मुद्दा म्हणजे मेन मुद्दा उचलला तो ज्या शैक्षणिक संस्थांना अनुदान देतो.......

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, रिझल्टच्या बाबतीमध्ये संस्थेन कितीही प्रयत्न केले तरी ते त्या विद्यार्थ्यावर अवलंबून आहे की कशाप्रकारे आभ्यास करुन ते कशाप्रकारे गुण मिळवतात. प्रत्येक संस्था आपल्या परिने चांगला रिझल्ट आणण्याकरिता प्रयत्नशील असते. कोणत्याही संस्थेचे हे धोरण नसेल की आमच्या शाळेचा रिझल्ट ३० टक्के की ४० टक्के लागला पाहिजे. सगळ्यांची अपेक्षा असते की ८० टक्के, ९० टक्के, १०० टक्के रिझल्ट लागला पाहिजे. मला वाटते टक्केवारीच्या बाबतीमध्ये जे धोरण ठरवत आहात ते बरोबर नाही.

**रिटा शाह :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, मी शाळा चालवते म्हणून मला माहित आहे की, सर्व उद्दीष्ट असे असते की मुलांचा रिझल्ट चांगला असावा. परंतु, मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये काही शाळा अशा आहेत की, त्यांच्याकडे शिक्षक वर्ग ही नसतो. मग शिक्षक जर नसेल तर शाळा कशी चालणार? आणि तशी शाळा मान्यताप्राप्त असून आपल्याकडे अर्ज करणार हे बघायचे महत्वाचे आहे की, त्यांच्याकडे शिक्षक किती? शिकवणारे शिक्षक हे डी.एड. आहे की बी.एड. आहेत ते ही बघणे महत्वाचे आहे. कारण मी संस्था चालवते त्यामुळे ते मला माहित आहे. एकेका शाळांमध्ये ग्रॅज्युएट मुले आणि मुली दहावीच्या, नववीच्या मुलांना शिकवतात. त्यामुळे तो ही क्रायटेरिया आपण फिक्स करा की त्या शाळांमध्ये डी.एड आणि बी.एड शिक्षक पाहिजे आणि जेव्हा डी.एड आणि बी.एड शिक्षक असेल आणि ते शिक्षक चांगले असतील तर नक्की त्या शाळेचा रिझल्ट चांगला येणार. ५० टक्के तरी रिझल्ट यायलाच पाहिजे आणि महत्वाचा मुद्दा म्हणजे मागे सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर

मॅडम यांनी जे कोटाचे सांगितले आहे तर कोटा हा नसतो. ज्या मोठ-मोठ्या शाळा आहेत. अभिनव शाळा आहे, जे. एच. पोद्दार शाळा, सरस्वती विद्यालय, अवलेडी ऑफ नाझरेथ, सरदार वल्लभभाई शाळा, सेंट झेव्हीयर अशा मोठमोठ्या शाळा आहेत. त्यांच्याकडे जेव्हा पालक ॲडमिशनसाठी जातो तेव्हा दहा हजार आणि पंधरा हजार रुपये ते डोनेशन मागतात. तर अशा शाळांमध्ये आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमधून निवडून आलेले नगरसेवक म्हणजे लोकप्रतिनिधी जे शिफारस पत्र देतात तेव्हा ते ॲडमिशन न देता ती लोक ते शिफारस पत्र फेटाळून लावतात. म्हणून त्याच्याकरिता काहीतरी क्रायटेरिया फिक्स करा आणि जे विद्यार्थी सातवीपर्यंत मनपाच्या शाळेमध्ये आहेत ती मुले जेव्हा त्या शाळेत जातात तेव्हा त्यांना विदाऊट डोनेशनने ॲडमीशन द्यावे. असे काही तरी क्रायटेरिया फिक्स करा.

**मा. नगरसचिव :-**

धोरण वाचून झालेले आहे आणि पुढच्या यादीचे वाचन करतो.

(शाळांच्या नावाच्या यादीचे अनुदानासह वाचन केले.)

**शुभांगी नाईक :-**

आपण कुठली नाव वाचता? आम्हालाही ती लिस्ट द्यायला पाहिजे.

**मा. नगरसचिव :-**

आता ठरावात ती नावे दिलेली आहेत.

**शुभांगी नाईक :-**

आपल्याला हे अगोदर देता आले नाही का? आता का देता? आता का तुम्ही सांगता?

**मोहन पाटील :-**

सचिवजी आपल्याला ठराव दिलेला आहे. आपण तो ठराव वाचा.

**शुभांगी नाईक :-**

पहिले आम्हाला लिस्ट द्या आणि मग बोला.

**गजानन भोईर :-**

सचिव साहेब, आपण स्थायी समितीचा ठराव कॅन्सल केलेला आहे का? नविन नांवे आलेली आहेत.

**मा. नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांनी नविन ठराव मांडलेला आहे.

**गजानन भोईर :-**

स्थायी समितीचा ठराव कॅन्सल करुन मा. महासभेने नविन ठराव केलेला आहे का?

**शुभांगी नाईक :-**

म्हणजे ह्याचा अर्थ आपण हा गोषवारा चुकीचा दिलेला आहे का?

**गजानन भोईर :-**

आपण हे सांगा की, स्थायी समितीला काही किंमत नाही का?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीच्यावर मा. महासभा आहे. मा. महासभेला तो अधिकार आहे. मा. महासभेला नाव वाढवण्याचा अधिकार आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महासभेला अधिकार आहे ना. तसे लिस्ट सर्व सदस्यांना देण्याचा ही अधिकार आहे.

(मा. नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १०६ चा ठराव सभागृहासमोर वाचला.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, स्थायी समितीने केलेला ठराव रद्द केलेला आहे का? ह्याचे उत्तर देण्यांत यावे. स्थायी समितीचे सदस्य विचारत आहेत. आपण त्यांना सांगा. प्रत्येक वेळेला असे चालणार नाही.

**रोहीदास पाटील :-**

या महापालिकेमध्ये ज्यांचे नाव घेतात त्यांचे अर्ज इनव्हर्ड सुध्दा नाही. ते ही नाव तुम्ही घेता. कसे काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीचा ठराव रद्द केला आहे का? ते सांगा.

**रोहीत सुवर्णा :-**

ठराव क्र. ९० रद्द आहे का?

**शिवप्रकाश भुदेका :-**

स्थायी समितीका ठराव रद्द किया है क्या ऐसे ही रखा है।

**रोहीत सुवर्णा :-**

आपण आम्हाला जेव्हा शुध्दीपत्रक पाठवले तेव्हा तुम्ही त्या संस्थेचे नाव त्याच्यामध्ये का नाही ॲमेडमेन्ट करुन आमच्याकडे पाठवले. जेव्हा तुम्ही आम्हाला शुध्दीपत्रक पाठवले त्यावेळी ह्या सर्व संस्थांचे नाव ॲड करायचे होते.

**मा. नगरसचिव :-**

सभागृहातला ठराव सभागृहामध्ये होतो ना.

**रोहीत सुवर्णा :-**

लास्ट मुव्हमेन्टला असे कोणीही येते. शेवटच्या वेळेला कोणीही येईल.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक संस्था कार्यरत आहेत. सदर संस्था मार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, क्रिडा इ. विविध उपक्रमाद्वारे समाजास सेवा सातत्याने देऊन समाजउपयोगी कार्यक्रम राबवीत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००५-०६ या वर्षाचे अंदाज पत्रकामध्ये लेखाशिर्ष इ. अंशदाने या लेखाशिर्षानुसार रक्कम रु. १,००,००,०००/- अनुदानाची तरतूद करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर क्षेत्रातील संस्थांना त्यांनी दिलेल्या सेवेबाबत प्रोत्साहन देण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत सानुग्रह अनुदान देणेकरिता खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यांत येत आहे.

१) सदर संस्था मिरा भाईंदर मधील असावी.
२) संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व करांचा भरणा केला असला पाहिजे.
३) मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई केली नसली पाहिजे.
४) संस्थेस किमान ३ वर्षांचे ऑडीट रिपोर्ट सादर केले पाहिजे.
५) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधून इयत्ता ७वी नंतर ८वीच्या वर्गासाठी विनामुल्य प्रवेश संबंधित संस्थांनी महापालिकेच्या विद्यार्थांयाना द्यावा व तसे लेखी हमीपत्र अनुदान घेणाऱ्या संस्थांकडून घ्यावे.
६) अनुदान घेणाऱ्या संस्थेमध्ये मिरा भईंदर महानगरपालिकेचा स्वतंत्र कोटा (ड्ढद्मड्ढद्धध्ड्ढ च्ढ्ढठ्ठद्यद्म) असावा.

यांप्रमाणे धोरण ठरवून खालील संस्थांना अनुदान देण्यांत येत आहे.

**महानगरपालिका शिक्षणमंडळ मिरा भाईंदर जि. ठाणे.**

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| १ | अमरदिप शिक्षण संस्था भाईंदर (पश्चिम) | ललित विद्या निकेतन | २,७५,०००/- |
| २ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल गुजराती माध्यम | ५०,०००/- |
| ३ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल इंग्रजी माध्यम | ५०,०००/- |
| ४ | मयेकर जनकल्याण ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | मयेकर कॉन्वेन्ट स्कूल | २,००,०००/- |
| ५ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर आश्रम, उत्तन | १,५०,०००/- |
| ६ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर शाळा, उत्तन | २,००,०००/- |
| ७ | बॉम्बे मल्याळी समाज काशिमिरा | बी. एम. एस. स्कूल काशिमिरा | १,५०,०००/- |
| ८ | भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळ, भाईंदर (पश्चिम) | भाईंदर सेकंडरी स्कूल | ६,००,०००/- |
| ९ | श्री. केलवाणी मंडळ, भाईंदर (पश्चिम) | जे. एच. पोद्दार स्कूल | ४,००,०००/- |
| १० | मिरा भाईंदर शिक्षण, क्रिडा आणि सांस्कृतिक संकूल (रजि.) | सुबोध विद्यालय | १,००,०००/- |
| ११ | शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर | राजा शिवाजी हायस्कूल, घोडबंदर | ४,५०,०००/- |
| १२ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | आदर्श विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १३ | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १४ | आवर लेडी ऑफ वेलंकणी एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट | अवर लेडी ऑफ वेलंकणी | १,००,०००/- |
| १५ | अमित एज्युकेशन सोसायटी | लोकमान्य विद्यालय | २,००,०००/- |
| १६ | गंगासहाय रामप्रसाद त्रिवेदी एज्युकेशन ट्रस्ट | शारदा विद्यालय | ५,००,०००/- |
| १७ | सरीता एज्युकेशन ट्रस्ट | दि डिवाईन इमेज स्कूल | १,००,०००/- |
| १८ | संकल्प प्रतिष्ठान भाईंदर | | ५०,०००/- |
| १९ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | अभिनव विद्यालय | ७,००,०००/- |

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| २० | सरदार वल्लभभाई पटेल एज्युकेशन ट्रस्ट | सरदार वल्लभभाई पटेल विद्यालय | १,००,०००/- |
| २१ | श्री. सिद्धेश्वर सेवा संस्था | | २०,०००/- |
| २२ | बेलेन माऊली शाळा | | २,७५,०००/- |
| २३ | गितानगर सार्वजनिक मित्र मंडळ | | ५०,०००/- |
| २४ | सेन्ड ज्युडस एज्युकेशन ट्रस्ट | | ३,५०,०००/- |
| २५ | कल्पना चावला ट्रस्ट | | १०,०००/- |
| २६ | सदिच्छा ट्रस्ट | | १०,०००/- |
| २७ | मिरा भाईंदर वार्ताहर संघ | | ७५,०००/- |
| २८ | अवर लेडी ऑफ नाझरेथ हायस्कूल | | ६,००,०००/- |
| २९ | सेंट जोसफ हायस्कूल उत्तन | | ५,००,०००/- |
| ३० | सरस्वती हायस्कूल | | २,५०,०००/- |
| ३१ | श्री सत्यनारायण मंदिर विश्वस्त मंडळ खारीगांव | | २,००,०००/- |
| ३२ | नवघर ग्रामस्थ पंच मंडळ, नवघर | | १,५०,०००/- |
| ३३ | विठोबा ट्रस्ट, गोडदेव | | २,००,०००/- |
| ३४ | सेंट थॉमस हायस्कूल (मिरारोड) | | ५०,०००/- |
| ३५ | गुलामरसूल एज्यू. ट्रस्ट (इंडियन हायस्कूल) | | ३,२५,०००/- |
| ३६ | अग्रवाल सेवा समिती, भाईंदर | | ५०,०००/- |
| ३७ | सु. लादुराम गाडोदीया ट्रस्ट | | २०,०००/- |
| ३८ | मिरा भाईंदर कला क्रिडा महोत्सव समिती | | १,५०,०००/- |
| ३९ | आदर्श नागरिक सेवा समिती | डिवाईन हिम स्कूल | १,००,०००/- |
| ४० | श्री अंबिका एज्युकेशन सोसायटी | डिवाईन हिम ज्युनि.कॉलेज | १,००,०००/- |
| ४१ | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी, मिरा रोड पूर्व | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी | २,००,०००/- |
| ४२ | प्रजापती ब्रम्हकुमारी | | २,५०,०००/- |
| ४३ | जय अंबे सेवा समिती | | २,५०,०००/- |
| ४४ | प्रबुद्ध विचार मंच | | २५,०००/- |
| ४५ | धारावी मंदिर ट्रस्ट | | २,००,०००/- |
| ४६ | एन. जे. स्कुल | | ५०,०००/- |
| ४७ | सिनिअर सिटीझन, भाईंदर | | ५०,०००/- |
| ४८ | ओम श्री हनुमान मंदिर ट्रस्ट | | १,००,०००/- |
| ४९ | मारुती देवस्थान ट्रस्ट, उत्तन | | २५,०००/- |
| ५० | अंजुमन हायस्कुल, मिरा रोड | | १,००,०००/- |
| ५१ | के. बी. नरावत हायस्कुल | | २,००,०००/- |
| ५२ | न्यु कॅंब्रिक हायस्कुल, कस्तुरी पार्क | | ३,००,०००/- |
| ५३ | हेमलता पाठक एज्युकेशन ट्रस्ट, नवघर | | ३,००,०००/- |
| ५४ | अवल लेडी ऑफ फातिमा | | ३,००,०००/- |

वरील उल्लेख केलेल्या संस्थांना अनुदान देण्याबाबतचे धोरण याद्वारे निश्चित केले असून वरील अनुदान देण्याचे मंजुर करीत आहे. तरी वरील बाबतीत प्रशासनाने सर्व कायदेशिर बाबींची पडताळणी करुन वरील संस्थांना अनुदान देण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

**मा. नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, सुचक हॅरल बोर्जीस आणि अनुमोदक परशुराम पाटील ह्यांनी जो ठराव दिला होता त्या ठरावाचे मी वाचन केलेले आहे. ह्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी कृपया जागेवर उभे राहायचे आहे.

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
६) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
७) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी

८)	श्री. चिंतामण कमलाकर पाटील
९)	श्रीम. म्हात्रे संगीता विजय
१०)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
११)	श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१२)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१३)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४)	श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१५)	श्री. घरत केशव रामभाऊ
१६)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१७)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१८)	श्रीम. अनिता जयवंत पाटील
१९)	श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर
२०)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२)	श्री. आसिफ गुलाम पटेल
२३)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४)	श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२५)	श्रीम. उमा विश्वनाथ सपार
२६)	श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२७)	श्री. कोलासो लिओ इजिदोर
२८)	श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा
२९)	श्रीम. शाह रिटा सुभाष
३०)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१)	श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
३२)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
३३)	श्री. मोहन मधुकर पाटील
३४)	श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
३५)	श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३६)	श्री. पाटील मिलन गोविंदराव

**गजानन भोईर :-**

सचिव साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या की आपण तो स्थायी समितीचा ठराव कॅन्सल केला की काय केला?

**मा. नगरसचिव :-**

तो सभागृहाचा अधिकार आहे. मी कॅन्सल करणारा कोणीही नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

मग आपण ते मा. महापौरांना विचारा. मा. महापौर मॅडम त्याच्यावर काय रुलिंग देत आहेत. मा. महापौर मॅडम, स्थायी समितीचा ठराव क्र. ९० रद्द आहे का?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता जो मुद्दा उपस्थित केला की, स्थायी समितीचा ठराव रद्द केला तर असे नसते. स्थायी समितीची शिफारस ह्या विषयाकरिता होती. आपण जसे स्थायी समिती बजेट पास करतो आणि शिफारशीसाठी मा. महासभेसमोर ठेवतो आणि मा. महासभेमध्ये त्याच्या आकड्यांमध्ये फेरबदल करतो. तशाप्रकारे हे मा. महासभेमध्ये शिफारस होती आणि आपण तसे फेरबदल करुन घेतले आहे आणि बाकीच्या सदस्यांची मागणी आपण इन्क्ल्युड करुन घेतली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीने जे शिफारस केलेले होते त्याच्यामध्ये काही निर्णय पेन्डीग होते. जे काही त्याच्यामध्ये ॲडीशन आलेले आहेत ते त्याच्यामध्ये आपण दुरुस्ती केलेली होती. काही अर्ज निकाली काढायचे बाकी आहेत.

**मा. नगरसचिव :-**

या ठरावाच्या बाजूने जे सदस्य आहेत त्यांची मोजणी झालेली आहे आणि या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी जागेवर उभे रहायचे आहे.

१)	श्री. म्हात्रे मिलन वसंत
२)	श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३)	श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७)	श्री. सिंग मदन उदितनारायण
८)	श्री. रोहिदास शंकर पाटील
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११)	श्री. पाटील अशोक पांडुरंग
१२)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१३)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१४)	श्रीम. पाटील भानु भगवान
१५)	श्री. पाटील रतन कृष्णा
१६)	श्री. पाटील शरद केशव
१७)	श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१८)	श्री. जैन रमेश धरमचंद

**तटस्थ असलेले सदस्य**

१)	श्री. अनंत रामचंद्र पाटील

मोजणी झालेली आहे. कृपया बसून घ्यावे.

(मा. नगरसचिव ह्यांनी सूचक श्री. रोहीदास पाटील व अनुमोदन श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ठराव :-**

फेब्रुवारी २००५ मध्ये सन २००५-०६ सालासाठी अर्थसंकल्प सादर करतेवेळी शैक्षणीक संस्थांना अनुदान देण्यासाठी १ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. वर्षभर या अनुदानावर सत्ताधारी पक्षाने कोणताही विचार केला नाही व धोरण निश्चित केले नाही. त्याचबरोबर १ कोटी रुपयांच्या अनुदानाचा अर्थसंकल्पात तरतुद असतांना सुद्धा प्रशासनाने पाठपुरावा केलेला नाही. आयुक्तांनी नोटीस प्रसिद्ध करुन नियमानुसार अर्ज मागवायला पाहिजे होते ते त्यांनी मागविले नाही. आज वर्ष अखेरच्या दिवशी दि. ३१/०३/२००६ रोजी हा ठराव आणुन सत्ताधारी पक्ष आपल्या संबंधीत हितसंबधीयांना १ कोटी रुपयांचे बेकायदेशीर वाटप करण्याचा प्रयत्न करत आहे व यास प्रशासन प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष पाठींबा देत आहे. यापूर्वी महापालिकेने कोणतेही शैक्षणिक अनुदान दिले नाही. त्याचप्रमाणे सन २००५-०६ साली अर्थसंकल्पात केलेली १ कोटी रुपयांची तरतुद आज महापालिकेच्या ताब्यातील अनेक प्राथमीक, माध्यमीक शाळा दुर्लक्षीत आहेत त्यांच्या विकासासाठीच वापरावा व पुढील वर्षासाठी धोरण ठरवावे असा आम्ही ठराव मांडत आहोत.

**मा. नगरसचिव :-**

या ठरावाच्या बाजूने जे सदस्य आहेत त्यांनी उभे राहायचे आहे.

१)	श्री. म्हात्रे मिलन वसंत
२)	श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३)	श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७)	श्री. सिंग मदन उदितनारायण
८)	श्री. रोहिदास शंकर पाटील
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११)	श्री. पाटील अशोक पांडुरंग
१२)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१३)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१४)	श्रीम. पाटील भानु भगवान
१५)	श्री. पाटील रतन कृष्णा

१६)	श्री. पाटील शरद केशव
१७)	श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१८)	श्री. जैन रमेश धरमचंद

**मा. नगरसचिव :-**

या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी जागेवर उभे रहायचे आहे.

१)	श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२)	श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे
३)	श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४)	श्री. पाटील परशुराम दामोदर
५)	श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
६)	श्रीम. उर्मिला कोमल भामरे
७)	श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
८)	श्री. चिंतामण कमलाकर पाटील
९)	श्रीम. म्हात्रे संगीता विजय
१०)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
११)	श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१२)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१३)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४)	श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१५)	श्री. घरत केशव रामभाऊ
१६)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१७)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१८)	श्रीम. अनिता जयवंत पाटील
१९)	श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
२०)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२)	श्री. आसिफ गुलाम पटेल
२३)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४)	श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२५)	श्रीम. उमा विश्वनाथ सपार
२६)	श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२७)	श्री. कोलासो लिओ इजिदोर
२८)	श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा
२९)	श्रीम. शाह रिटा सुभाष
३०)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१)	श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
३२)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
३३)	श्री. मोहन मधुकर पाटील
३४)	श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
३५)	श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३६)	श्री. पाटील मिलन गोविंदराव

**तटस्थ असलेले सदस्य**

१)	श्री. अनंत रामचंद्र पाटील

**मा. महापौर :-**

सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन श्री. परशुराम पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३६ मत, विरोधात १८ मत व तटस्थ १ मत आहे. तसेच सुचक श्री रोहीदास पाटील अनुमोदन श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात ३६ मत, ठरावाच्या बाजूने १८ मत आणि तटस्थ १ मत यामुळे सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन श्री. परशुराम पाटील ह्यांनी मांडलेला ठराव वाचून बहुमताने कायम करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, या दोन्ही ठरावाच्या सत्यप्रती सर्टीफाय करुन आम्हाला ताबडतोब देण्यात यावी.

**प्रकरण क्र. १०६ :-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षात शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणेबाबत.

**ठराव क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक संस्था कार्यरत आहेत. सदर संस्था मार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, क्रिडा इ. विविध उपक्रमाद्वारे समाजास सेवा सातत्याने देऊन समाजउपयोगी कार्यक्रम राबवीत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००५-०६ या वर्षाचे अंदाज पत्रकामध्ये लेखाशिर्ष इ. अंशदाने या लेखाशिर्षानुसार रक्कम रु. १,००,००,०००/- अनुदानाची तरतूद करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर क्षेत्रातील संस्थांना त्यांनी दिलेल्या सेवेबाबत प्रोत्साहन देण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत सानुग्रह अनुदान देणेकरिता खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यांत येत आहे.

१) सदर संस्था मिरा भाईंदर मधील असावी.

२) संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व करांचा भरणा केला असला पाहिजे.

३) मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई केली नसली पाहिजे.

४) संस्थेस किमान ३ वर्षांचे ऑडीट रिपोर्ट सादर केले पाहिजे.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधून इयत्ता ७वी नंतर ८वीच्या वर्गासाठी विनामुल्य प्रवेश संबंधित संस्थांनी महापालिकेच्या विद्यार्थांयाना द्यावा व तसे लेखी हमीपत्र अनुदान घेणाऱ्या संस्थांकडून घ्यावे.

६) अनुदान घेणाऱ्या संस्थेमध्ये मिरा भईंदर महानगरपालिकेचा स्वतंत्र कोटा (ङ्ख्नङ्कद्धध्ङ्क च्ह्वध्र्ड्ढद्म) असावा.

याप्रमाणे धोरण ठरवून खालील संस्थांना अनुदान देण्यांत येत आहे.

**महानगरपालिका शिक्षणमंडळ मिरा भाईंदर जि. ठाणे.**

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| १ | अमरदिप शिक्षण संस्था भाईंदर (पश्चिम) | ललित विद्या निकेतन | २,७५,०००/- |
| २ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल गुजराती माध्यम | ५०,०००/- |
| ३ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल इंग्रजी माध्यम | ५०,०००/- |
| ४ | मयेकर जनकल्याण ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | मयेकर कॉन्वेन्ट स्कूल | २,००,०००/- |
| ५ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर आश्रम, उत्तन | १,५०,०००/- |
| ६ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर शाळा, उत्तन | २,००,०००/- |
| ७ | बॉम्बे मल्याळी समाज काशिमिरा | बी. एम. एस. स्कूल काशिमिरा | १,५०,०००/- |
| ८ | भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळ, भाईंदर (पश्चिम) | भाईंदर सेकंडरी स्कूल | ६,००,०००/- |
| ९ | श्री. केलवाणी मंडळ, भाईंदर (पश्चिम) | जे. एच. पोद्दार स्कूल | ४,००,०००/- |
| १० | मिरा भाईंदर शिक्षण, क्रिडा आणि सांस्कृतिक संकूल (रजि.) | सुबोध विद्यालय | १,००,०००/- |
| ११ | शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर | राजा शिवाजी हायस्कूल, घोडबंदर | ४,५०,०००/- |
| १२ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | आदर्श विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १३ | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १४ | आवर लेडी ऑफ वेलंकणी एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट | अवर लेडी ऑफ वेलंकणी | १,००,०००/- |
| १५ | अमित एज्युकेशन सोसायटी | लोकमान्य विद्यालय | २,००,०००/- |
| १६ | गंगासहाय रामप्रसाद त्रिवेदी एज्युकेशन ट्रस्ट | शारदा विद्यालय | ५,००,०००/- |
| १७ | सरीता एज्युकेशन ट्रस्ट | दि डिवाईन इमेज स्कूल | १,००,०००/- |
| १८ | संकल्प प्रतिष्ठान भाईंदर | | ५०,०००/- |
| १९ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | अभिनव विद्यालय | ७,००,०००/- |
| २० | सरदार वल्लभभाई पटेल एज्युकेशन ट्रस्ट | सरदार वल्लभभाई पटेल विद्यालय | १,००,०००/- |
| २१ | श्री. सिद्धेश्वर सेवा संस्था | | २०,०००/- |
| २२ | बेलेन माऊली शाळा | | २,७५,०००/- |
| २३ | गितानगर सार्वजनिक मित्र मंडळ | | ५०,०००/- |

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| २४ | सेन्ड ज्युडस एज्युकेशन ट्रस्ट | | ३,५०,०००/- |
| २५ | कल्पना चावला ट्रस्ट | | १०,०००/- |
| २६ | सदिच्छा ट्रस्ट | | १०,०००/- |
| २७ | मिरा भाईंदर वार्ताहर संघ | | ७५,०००/- |
| २८ | अवर लेडी ऑफ नाझरेथ हायस्कूल | | ६,००,०००/- |
| २९ | सेंट जोसफ हायस्कूल उत्तन | | ५,००,०००/- |
| ३० | सरस्वती हायस्कूल | | २,५०,०००/- |
| ३१ | श्री सत्यनारायण मंदिर विश्वस्त मंडळ खारीगांव | | २,००,०००/- |
| ३२ | नवघर ग्रामस्थ पंच मंडळ, नवघर | | १,५०,०००/- |
| ३३ | विठोबा ट्रस्ट, गोडदेव | | २,००,०००/- |
| ३४ | सेंट थॉमस हायस्कूल (मिरारोड) | | ५०,०००/- |
| ३५ | गुलामरसूल एज्यू. ट्रस्ट (इंडियन हायस्कूल) | | ३,२५,०००/- |
| ३६ | अग्रवाल सेवा समिती, भाईंदर | | ५०,०००/- |
| ३७ | सु. लादुराम गाडोदीया ट्रस्ट | | २०,०००/- |
| ३८ | मिरा भाईंदर कला क्रिडा महोत्सव समिती | | १,५०,०००/- |
| ३९ | आदर्श नागरिक सेवा समिती | डिवाईन हिम स्कूल | १,००,०००/- |
| ४० | श्री अंबिका एज्युकेशन सोसायटी | डिवाईन हिम ज्युनि.कॉलेज | १,००,०००/- |
| ४१ | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी, मिरा रोड पूर्व | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी | २,००,०००/- |
| ४२ | प्रजापती ब्रम्हकुमारी | | २,५०,०००/- |
| ४३ | जय अंबे सेवा समिती | | २,५०,०००/- |
| ४४ | प्रबुद्ध विचार मंच | | २५,०००/- |
| ४५ | धारावी मंदिर ट्रस्ट | | २,००,०००/- |
| ४६ | एन. जे. स्कुल | | ५०,०००/- |
| ४७ | सिनिअर सिटीझन, भाईंदर | | ५०,०००/- |
| ४८ | ओम श्री हनुमान मंदिर ट्रस्ट | | १,००,०००/- |
| ४९ | मारुती देवस्थान ट्रस्ट, उत्तन | | २५,०००/- |
| ५० | अंजुमन हायस्कुल, मिरा रोड | | १,००,०००/- |
| ५१ | के. बी. नरावत हायस्कुल | | २,००,०००/- |
| ५२ | न्यु कॅब्रिक हायस्कुल, कस्तुरी पार्क | | ३,००,०००/- |
| ५३ | हेमलता पाठक एज्युकेशन ट्रस्ट, नवघर | | ३,००,०००/- |
| ५४ | अवल लेडी ऑफ फातिमा | | ३,००,०००/- |

वरील उल्लेख केलेल्या संस्थांना अनुदान देण्याबाबतचे धोरण याद्वारे निश्चित केले असून वरील अनुदान देण्याचे मंजुर करीत आहे. तरी वरील बाबतीत प्रशासनाने सर्व कायदेशिर बाबींची पडताळणी करुन वरील संस्थांना अनुदान देण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

**ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
६) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
७) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
८) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
९) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
१०) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
११) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१२) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ

१५)	श्री. घरत केशव रामभाऊ
१६)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१७)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१८)	श्रीम. अनिता जयवंत पाटील
१९)	श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
२०)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२)	श्री. आसिफ गुलाम पटेल
२३)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४)	श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२५)	श्रीम. उमा विश्वनाथ सपार
२६)	श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२७)	श्री. कोलासो लिओ इजिदोर
२८)	श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा
२९)	श्रीम. शाह रिटा सुभाष
३०)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१)	श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
३२)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
३३)	श्री. मोहन मधुकर पाटील
३४)	श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
३५)	श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३६)	श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१)	श्री. म्हात्रे मिलन वसंत
२)	श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३)	श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७)	श्री. सिंग मदन उदितनारायण
८)	श्री. रोहिदास शंकर पाटील
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११)	श्री. पाटील अशोक पांडुरंग
१२)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१३)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१४)	श्रीम. पाटील भानु भगवान
१५)	श्री. पाटील रतन कृष्णा
१६)	श्री. पाटील शरद केशव
१७)	श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१८)	श्री. जैन रमेश धरमचंद

**तटस्थ सदस्य**

१)	श्री. अनंत रामचंद्र पाटील

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य | - | ३६ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | - | १८ |
| तटस्थ सदस्य | - | ०१ |
| ठरावाच्या वेळी एकुण उपस्थित सदस्य | - | **५५** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, शोकप्रस्ताव है। हमारे उपमहापौर चंद्रकांत वैती साहब के काका का देहांत हुआ है इसके लिए मै ठराव मांडता हूँ।

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी आपल्या भागातील स्वातंत्र सैनिक, नवघर येथे राहणारे रामचंद्र पांडूरंग पाटील याचे वृध्दापकाळामुळे निधन झालेले आहे. तसेच इतर बाबतीत हा शोकप्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

**केशव घरत :-**

उपमहापौर वैती साहेब ह्यांचे काका धनाजी वैती ह्यांचे निधन झाले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मी मांडत आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मुर्धा खाडी येथे राहणारे ओमप्रकाश गौतम राम ह्यांचे नवघर येथील फॅक्टरीमध्ये काम करत असताना ऑन ड्युटी एक्सीडंट होऊन ते त्या ठिकाणी मेले. त्यांना देखील या ठिकाणी श्रध्दांजली देण्यात यावी.

**मा. नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली वाहण्याकरिता सभागृहामध्ये दोन मिनिटे जागेवर उभे रहायचे आहे.

**दु:खवटा ठराव क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती ह्यांचे काका श्री. धनाजी वैती आणि नवघर येथे राहणारे स्वातंत्र सैनिक श्री. रामचंद्र पांडुरंग पाटील ह्यांचे वृद्धापकाळामुळे निधन झालेले आहे. तसेच मुर्धा खाडी येथे राहणारे श्री. ओमप्रकाश गौतम राम ह्यांचे नवघर येथील फॅक्टरीमध्ये ॲक्सीडंट होऊन निधन झालेले आहे. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दु:खात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. चंद्रकांत मोदी.** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून आपणा सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.२० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**